
साप्ताहिक

# माणूस

२१ जाने.८४ / दोन रुपये.

महागाई,
वाढत्या किंमतीवरील चर्चा
फक्त १८ खासदार उपस्थित

## संसदेची ढासळत चाललेली प्रतिष्ठा



पुण्यातील रिक्षा-संप

# रिक्षावाले, पोलीस, आपण



साप्ताहिक

# माणूस

□

वर्ष : तेविसावे

अंक : चौतिसावा

□

२१ जानेवारी १९८४

किंमत : दोन रुपये

□

संपादक

श्री. ग. माजगावकर

□

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

□

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

□

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

□

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

□

मुखपृष्ठ

संजय पवार



## मुंबापुरी

गुरुवारी सकाळी तीन वाजता महापौर मनमोहनसिंग बेदी बारा दिवसांच्या दौऱ्यासाठी योकोहामाला रवाना झाले. दोन्ही शहरांचे परस्पर संबंध वृद्धिगत व्हावे ह्यासाठी ही भेट असावी असा महापालिकेतील राजकीय निरीक्षकांचा अंदाज आहे.

ह्या भेटीच्या निमित्ताने इंडोजापनीज असोसिएशनने महापौरांचा ओबेरॉय शेरेटन हॉटेलात गेल्या शनिवारी जंगी सत्कार केला. महापौरांनी योकोहामाच्या मुलांना हत्ती भेट म्हणून द्यायचे ठरविले आहे. ह्या १४० नगरसेवकांची आठवण म्हणून त्यांनी खरं पहाता पांढरा हत्तीच भेट द्यायला पाहिजे.

□

नवे वर्ष सुरू होऊन चक्क दहा दिवस उलटून गेले तेव्हा कोठे कांबळयांनी पत्रकारांना चहापानाचे आमंत्रण केले. पाच वाजताच्या चहापानाला हे कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सहा वाजता हजर झाले !

आल्याआल्याच त्यांनी वाहतूक-उपआयुक्त सरदार पसरीचा ह्यांच्यावर तोंडसुख घेतले. पसरीचांचा नवा चक्रव्यूह अभिमन्यूलाही गोंधळात टाकणारा आहे यात शंका नाही; परंतु आपल्या चुकीसाठी दुसऱ्याला दोष देणे कांबळयांना शोभत नाही. चहा थंड झाला म्हणून किती गरम व्हावे माणसाने ?

पण इतके तापलेले कांबळे शालिनीताईंचे नाव निघताच थंड पडले. पत्रकारांनी अधिक खोचून विचारताच बाईंच्या बंगलोर-भेटीची आपण गभीर दखल घेऊ असे म्हणण्याचे त्यांनी धाडस केले; पण आता ताईंनी हे ऐकले की त्याच कांबळयांची गंभीर दखल घेतील. त्यामुळे आता आदिकांचे घोंगडे पांघरूनही कांबळयांना हुडहुडी भरायची थांबायची नाही.

ता. क. बॅरिस्टर बाबासाहेब भोसल्यांनी तर आजकाल चहाचा इतका धसका घेतला आहे की साधे इराण्याकडे चहाला बसले तरी गल्ल्यावर वसंतदादा बसल्याचा त्यांना भास होतो. असो. चहाची सवय मुळात वाईटच !

□

एस. के. जैन ह्या कलकत्ता येथील बिर्ला कंपनीच्या अधिकाऱ्याचा खारच्या सी रॉक हॉटेलमध्ये झालेल्या खुनाचे रहस्य आता अधिकाधिक गूढ बनत चालले आहे. सुरुवातीस पोलिसांनी बाईच्या प्रकरणातून हा खून झाल्याचा दावा केला. जैन ह्यांच्या खोलीत लांब केस आणि सेंट सापडल्याचेही त्यांनी सांगितले. मग अचानक दोन-चार दिवसात हा समलिंगी संभोगाच्या प्रकरणातून झालेला खून आहे असा त्यांना साक्षात्कार झाला !

आता मात्र पोलिसांचा असा दावा आहे की, हा खून सराईत गुंडांकडूनच झालेला आहे. (सराईत सज्जनांनी खून केल्याचे आमच्या एकण्यात नाही !) यासाठी त्यांनी समदखान नावाच्या एका गुंडाला आणि त्याच्या टोळीतील काही लोकांना अटक केली आहे. पोलिसांचे असे म्हणणे आहे की, ह्या गुंडांना दुसऱ्याच्याच खुनाची सुपारी देण्यात आली होती; परंतु जैन ह्यांचा मात्र चुकून बळी गेला. म्हणजे कमालीचे वेंधळे खुनी असावेत हे !

यातच पोलीसकमिशनर रिबेरीओंनी ही बातमी केवळ टाइम्स ऑफ इंडियाला प्रथम दिल्याने इतर वृत्तपत्रे त्यांच्यावर नाराज आहेत. याचा परिणाम असा झाला आहे की, ह्या खुनाबद्दल वेगवेगळ्या बातम्या वृत्तपत्रांत प्रसृत होत आहेत.

□

### सगळं ठीक........!

'नो न्यूज इज गुड न्यूज' हे एरवी ठीक आहे हो; पण इथं पानं भरायला रोजच्या

रोज मजकूर लागतो. त्यामुळं गावात सगळं सामसुम असलं की आमच्या डोळ्यां-समोर काजवे दिसतात.

तस पाहता मुबईत सगळं ठीक चाललंय. ठीक म्हणजे की दौत–टाक घेऊन मुद्दाम काही लिहायला बसावं अशा आशादायी घटना घडत नाहीयेत. नाही म्हणायला फिल्मोत्सवाचा झमेला आहे; पण तेही सगळं कोमटच आहे. आता फिल्मोत्सवाच सूप वाजल्यानतर काही अंतस्थ उखाळ्या–पाखाळ्या निघाल्या तर मग मजा येईल ! दुसऱ्याच्या दु:खात आपणही सहभागी व्हायला पाहिजे या भगवान झरतुष्ट्राच्या सदुपदेशाचा ततोतंत अंमल पत्रकार करतील आणि फिल्मोत्सवाच्या फिरक्या सुरू होतील.

बोरिवलीच्या साहित्यसंमेलनाचं वस्त्र-हरण जोरात चालू आहे रमेश मत्री, तर्कतीर्थ आजि उमाकात ठोमरे याच्या नावाचा डंका रोज पहिल्या पानावर वाजतोय. पैकी उमाकात ठोमऱ्यांनी स्वागताध्यक्षपदाचा राजीनामा देऊन तमाम साहित्य–वर्तुळाला तसल्ली देऊन टाकली आहे. मत्र्याना (रमेश मत्री यांना) खुर्चीचा मोह पडलाय अस वाटतय. हा मजकूर छापून येण्याअगोदर ( किंवा नंतर चालेल ) रमेश यानीही आपला अध्यक्षपदाचा राजीनामा देऊन टाकला तर 'खुर्चीचा मोह नसलेला पहिला मंत्री' अशी नोद दप्तरी होईल !

□

महापालिका–निवडणुकाची लठ्ठालठ्ठी सुरू होतेय. राजकीय पक्षाचा हा हुतुतू-सामना रंगात येणार यात शंका नाही. निवडणुका घेतल्या तर कॉंग्रेस (आय)ला जड जाईल हे खरं; पण पुढे ढकलल्याने वातावरणात काही खास फरक पडेल असही नाही. त्यामुळं खरा गोंधळ उडालाय तो आयवाल्यांचा. विरोधी पक्षीयाना काय, काहीही चालेल. निवडणुका घेतल्या तरी बरं, नाही घेतल्या तर त्याहूनही बरं. म्हणजे गांधी-प्रणीत सत्याग्रहाचा मार्ग चोखाळायला मोकळे. मुंबई पेटवायला पाच पक्ष पुरे आहेत. विरोधी पक्ष कोण-तीही खेळी खेळायला तयार आहे. दादांनी पानं पिसली पाहिजेत !

□

भारतीय जनता पार्टीच्या विनोद गुप्तानी एक चांगला उपक्रम हाती घेतला आहे. 'सावधान' या त्याच्या संस्थेतर्फे ते वेश्याव्यवसायात अडकून पडलेल्या मुलींची सुटका करून त्याची लग्नं लावतात. योजना स्तुत्य आहे; पण या विवाहसमारभाच्या निमत्रणपत्रिकेवर चंद्रकात त्रिपाठी, विलास-राव देशमुखाच्या सह्या कशाला ? केवळ ते मंत्री आहेत म्हणून ? कोणतीही समाज-सेवेची कामे मंत्र्याच्या मेहेरबानीवर अवलबून असता कामा नयेत अस भाजपवाले निक्षून सांगतात.

यासाठीच मुद्दाम गुप्ताजीच्या या मत्री-प्रेमाकडे लक्ष वेधतो आहोत. बरं, दुसर अस, 'सावधान'च्याच तत्त्वावधानाखाली गुप्ताजीनी सुटका केलेल्या तुलसा या नेपाळी मुलीचं काय झालं ? गुप्ताजी तुलसाला दत्तक घेणार होते, त्याचं काय ? कायेय की, खूपशी काम अंगावर घेतली की विसरायला होत. तेव्हा गुप्ताजीनी एकदा सांगून टाकाव की, या तुलसाचं काय झाल ? त्या शीला बारसेही बहुधा विसरल्या वाटतं.

—विष्णू जयदेव

पुणे वार्ता

# रिक्षासंप : चौकशी

प्रत्येक शहराचं स्वतःच असं काही व्यक्ति-मत्त्व असतं. उदा. मुंबईची गर्दी, चौपाटी, भेळ, नागपूरचा कडक उन्हाळा आणि टिपि-कल वऱ्हाडी हेल, कोल्हापूरचा आणखी एक वेगळा ठसका !

पुण्याच्या बाबतीत तर 'पुणेरी' पणा पासून 'पुणेरी भामटा' इथपर्यंतचे वेगवेगळे स्तर पुण्याच वेगळं अस्तित्व टिकवून आहेत.

त्यातूनही पुण्यातल्या गणपती, मारुती याच्याहून अधिक दाट असलेलं सायकल आणि रिक्षांचं जाळं. या जाळ्याचा अनुभव पुण्याबाहेरून आलेल्या पाहुण्यांना तर घ्यावा लागतोच; पण पुण्यातल्या लोकांनाही घ्यावा लागतो !

पुण्याला जायला कोणी निघालं की त्याचे घरचे, मित्रमडळी त्याला दहादा बजावतात, 'बघ...नीट जा, नाही तर रिक्षावाले गोल गोल फिरवत बसतील !' हा सल्ला आता इतका जुना झालाय तरी लोक तो देतच असतात. (आणि द्यावा लागतोच !)

तर सागायचा मुद्दा असा की तुम्ही पुण्या-तले असा की, पुण्याबाहेरचे, तुमचं स्वत.चं वाहन असो वा नसो. पुण्याच्या रस्त्यावर आपल्या प्रवासाची कुंडली माडली तर पी. एम टी. आणि रिक्षा हे दोन राहू–केतू हमखास असणार इतके ते अविभाज्य आहेत आणि त्यामुळेच मागे पी.एम.टी.चा सप झाला तर उपमहापौरापर्यंतचे लोक स्वत· पी. एम. टी चालवायला रस्त्यावर आले होते ! शेवटी पी. एम. टी. महापालिकेचचं अपत्य असल्यानं असं करणं भागच होतं; पण मागच्या रविवारी दि. ८ च्या मध्यरात्री १२ वाजता आपल्या २५ मागण्यांसाठी रिक्षा-वाल्याचा बेमुदत संप सुरू झाला, तरी सर्व-सामान्य लोकसुद्धा तसे थंडच होते !

कधी वेळेवर न धावणाऱ्या पी. एम. टी. वेळेवर आणि (त्यामानाने) भरपूर येत होत्या. लोकाची थोडी गैरसोय होत होती; पण रिक्षासंपाला मात्र सहानुभूती शून्य !

त्यातूनही नेमका कुठल्या मागण्यासाठी संप सुरू झाला याची पुरेशी माहितीही सर्वसामान्य लोकांना नव्हती. बऱ्याच जणाचा समज असा होता की, त्याना भाडे वाढवून हवे आहे; पण २५ मागण्यांत ही मागणी किंवा हिला पूरक अशी कुठलीही मागणी नव्हती !

जवळपास दहा हजार रिक्षा आणि २० ते २५ हजार ड्रायव्हर बेमुदत सपावर जातात, तरीही शहर शात राहते. या शातते-मागचा खदखदणारा असतोष खोदून काढल्या-शिवाय सापडणारा नव्हता. त्यामुळेच याबाबत रिक्षासंघटना, पोलीस आणि सामान्य लोक यांच्याशी सवाद साधण्याचे ठरवले. त्याप्रमाणे भेटी–गाठी घेतल्या आणि जे काही ऐकल, ते इथे आशय तोच ठेवून सक्षिप्त स्वरूपात देत आहे.

**रिक्षावाले । रिक्षा युनियन्स**

दि. ८ जाने. ८४ रात्री–मध्यरात्री सुरू झालेला जवळपास १०,००० रिक्षामालक ।

चालकांचा बेमुदत संप हा कुठल्याही एका युनियनच्या झेंड्याखाली झालेला नव्हता तर रिक्षावाल्यांच्या ज्या छोट्या-मोठ्या (म्हणजेच १ स्टॅन्डची १ युनियन हे प्रमाण. अशा ५०।६० युनियन्स असतील.) सघटना आहेत त्यातल्या प्रतिनिधींची मिळून एक कृतिसमिती तयार करण्यात आली आणि या पुणे ऑटोरिक्षा संघटना कृतिसमितीने संपाचा आदेश दिला. या कृतिसमितीत अध्यक्ष, सेक्रेटरी, सभासद असे जवळजवळ १६ पदाधिकारी आहेत आणि त्यानीच सर्व रिक्षावाल्यांचं प्रतिनिधित्व केलं. या कृतिसमितीत असणाऱ्या वेगवेगळ्या सघटनांपैकी आशीर्वाद(पुणे कॅन्टोन्मेंट ऑटोरिक्षा संघटना) ही एकमेव संघटना ट्रेड युनियन अॅक्टखाली रजिस्टर झालेली संघटना आहे. या संघटनेचे जवळपास ५०० सभासद आहेत. 'सावकाश', 'रामकृष्ण हरी', 'दर्शन', 'शनिपार' या संघटनाची सभासदसंख्याही लक्षणीय आहे. या सगळ्यांचे प्रश्न काय आहेत, मागण्या काय आहेत हे ऐकून घेण्यासाठी जेव्हा फिरत होतो, तेव्हा एक जाणवलं. सुट्या-सुट्या रिक्षाड्रायव्हरला एकूण नक्की मागण्या किती, त्या कोणत्या याविषयी पूर्ण माहिती होती असं नव्हतं; पण लढण्याचा जोर मात्र सार्वत्रिक होता आणि म्हणूनच शेवटी कृतिसमिती-सेक्रेटरी श्री. ठकसेन पोरे आणि सदस्य अरविंद बकरे यांच्याशी थोडी चर्चा केली. या चर्चेतून नेमक्या मागण्या काय आहेत, लोकांबद्दल त्यांची व त्यांची लोकांबद्दल मतं काय आहेत, पोलीस, आर. टी. ओ. इ चा त्रास नेमका कसा होतो इ. इ. प्रश्नावर थोडा-फार प्रकाश पडला.

सर्वसाधारण लोकामध्ये असं समजलं जात होतं की, रिक्षावाल्यांना भाड वाढवून पाहिजे; पण वस्तुस्थिती तशी नव्हती.

आर. टी. ओ व पोलीस याच्याकडून मिळणाऱ्या वागणुकीविरुद्ध आणि काही नव्या नियमांविरुद्ध हा सप होता. एकूण २५ मागण्यांपैकी सगळ्यात महत्त्वाची मागणी अशी होती की, 'किरकोळ रिपेअरिंगला मीटरसील तोडण्यास सक्ती नसावी.'

याबाबतच स्पष्टीकरण करताना श्री. पोरे म्हणाले की- मीटरमधला साधा स्क्रू निसटला तरी सकाळी ८ च्या आधी गाडी आरटीओ ऑफिसला न्या, तिथे रांगेत उभे राहून कागदपत्र तयार करा. नंतर मग आरटीओ सील तोडणार. हे झाल की गव्हर्नमेन्ट सील तोडायला इजिनियरिंग कॉलेजकडे जा. तिथे नंबर. वाट पहाणे. त्या त्या दिवसात झालं तर ठीक नाही तर मग दुसऱ्या दिवशी हे झाल की पुन्हा पासिंग. पासिंग करायला आळदीरोडला तिथे पुन्हा रांग, तोकडा वेळ. दिवस दिवस थांबा कटाळून थोडे पाय मोकळे करावेत तर तेवढ्यात साहेब हजर आणि मग 'हाजिर तो वजिर' या न्यायाने तुमचा नंबर बाद! विनवण्या करायात तर 'कुठे गेला होता......?' अशी खाकी भाषा! या सगळ्या प्रकारात जे दोन तीन दिवस जाणार त्या दिवसांत जे उत्पन्न बुडत त्याला जबाबदार कोण?

ही मागणी अधिकाऱ्यांनी वाटघाटीच्या वेळी तत्त्वतः मान्य केलीय असं ते म्हणाले.

दुसरी जी एक मागणी नुकसानभरपाईची होती त्यावर चर्चा झाली.

२६ डिसें. ८३ रोजी. १.८० हा नवा दर जाहीर करण्यात आला. ३१ तारखेला शनिवार. त्यामुळे व १ तारखेला रविवार सुट्टी. यामुळे आरटीओ बंद!

२ ता. सकाळी ९ वा. काही रिक्षा १.५० या जुन्या दराने पास केल्या जातात आणि त्याच दिवशी ११ वा. रिटेस्टमध्ये १.५० ऐवजी १.८० च मीटर हवं म्हणून मीटरसील तोडा म्हणतात! म्हणजे पासिंगसाठी झालेला १०० रु. खर्च हवेतच! एकाच कार्यालयातील दोन खात्यात नसलेलं कम्युनिकेशन. पण त्याचा भूर्दंड मात्र रिक्षाड्रायव्हर। मालक यांना. याबाबत वाटाघाटीच्या वेळी मात्र अमुक फाइल गेली नाही, तमुक कागद आला-आला नाही त्यामुळे झालं, यापुढे होणार नाही, अशी ग्वाही मिळाली.

आणखी एक मागणी होती रिक्षावालकाचे लायसन्स पी. एस. आय. रँकच्या खालील कर्मचाऱ्याने जप्त करता कामा नये. ही मागणी पूर्णतः मान्य झाली.

आर. टी. ओ. चे खटले आर. टी. ओ. ने निकालात काढावेत व ट्रॅफिकचे खटले ट्रॅफिकने निकालात काढावेत. ही मागणी तत्त्वतः मान्य करण्यात आली आहे, असे पोरे म्हणाले; पण मला वाटते त्याची अंमलबजावणी होते का? हेच महत्त्वाचे आहे आणि त्याला वेळ जावा लागणार आहे.

या काही प्रमुख मागण्यांबरोबरच प्रवाशाशी सबधित जी एक मागणी होती, तिचा सहानुभूतिपूर्वक विचार करण्यात आला आहे.

यापूर्वी अस असे की, कुणाही नागरिकाने एखाद्या रिक्षावाल्याने वाहतूकनियमाचा भंग केल्याची तक्रार पत्राद्वारे जरी वाहतूकअधिकाऱ्याना कळवली तरी रिक्षाचालकाला। मालकाला दंड होत असे. प्रवाशाची। नागरिकाची केवळ लेखी तक्रार पूर्णपणे ग्राह्य धरली जात असे. दंड-आकारणीच्या वेळी तो उपस्थित नसला तरी चाले. म्हणजे या न्यायात फिर्यादीला घरी बसून न्याय आणि आरोपीला बचावाचा पवित्राच नाही!

ही पद्धत बंद करून. ज्याने तक्रार केली असेल त्यालाही, म्हणजे फिर्यादीलाही केसला हजर राहणे क्रमप्राप्त राहणार आहे. यामुळे 'बोगस केसेस' कमी होतील असा रिक्षावाल्यांचा विश्वास आहे.

आजवर वेटिंगचा दर हा २ मिनिटाला १० पैसे होता. तो २ मिनिटाला २० पैसे करून मिळावा ही मागणी ४ मिनिटाना २० पैसे हा तोडगा देऊन पूर्ण करण्यात आली.

त्याचबरोबर आरटीओ ऑफिसमधील कामाची गती वाढवावी, रिक्षाचालकास सन्मानाने वागवावे, पोलिसांचा त्रास कमी व्हावा, या व अशा प्रकारच्या इतर मागण्या परस्पर सामंजस्याने सोडवण्यात आल्या. अधिकाऱ्यांच्या बदल्या इ. मागण्या 'कक्षेत'ल्या नसल्याने त्यांचा विचार करण्यात आला नाही, पण अधिकाऱ्यांना रिक्षावाल्यांच्या भावना 'पोचवण्यात' आल्या. इतरही, आय. एस. आय. स्पेसिफिकेशन मार्कप्रमाणे लवचिकता (मीटर स्लो-फास्ट करण्यात) मिळावी, गाडीची कागदपत्रे। पासिंगची मुदत इ. तांत्रिक मागण्यांवरही सन्माननीय तोडगे काढण्यात आले, तर रिक्षास्टँडसाठी रिक्षावाल्यांनी जागा सुचवाव्यात. त्या महापालिकेच्या सहाय्याने मिळविण्याचा प्रयत्न केला जाईल अशा भरघोस चर्चा, आश्वासनं यांची कार्यवाही केली जाईल. या एकत्रित आश्वासनानंतर हा सप सपल्याचे सोमवारी रात्री कृतिसमितीने जाहीर केले.

परंतु दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात 'संप मागे घेतला' या शब्दावरून काही सभा-

सदांनी नाराजी व्यक्त केली, गैरसमज पसरले आणि मंगळवारी सकाळी रिक्षा अडवण्याचे प्रकार झाले व वर्तमानपत्रांतील बातम्यांमुळे सभासदांची जी दिशाभूल झाली त्याबाबत कृतिसमितीने स्पष्टीकरण दिले आणि या एकजुटीला जो थोडा विस्कळितपणा ज्या बातम्यांमुळे आला, त्यांचा निषेध म्हणून मंगळवारी रात्रीपर्यंत पुन्हा एक दिवसाचा संप कृतिसमितीने यशस्वी केला आणि बुधवारी सकाळपासून पुण्याच्या रस्त्यावर १० हजार काळे पिवळे ठिपके पूर्वीसारखेच सरपटायला लागले !

या संपूर्ण चर्चेत श्री. पोरे व बकरे आणि जे काही सुटे सुटे रिक्षावाले भेटले त्यांनी हे मान्य केलं की, या संपाला प्रवाशांची सहानुभूती नव्हती. प्रवाशांच्या मनात रिक्षावाल्यां बद्दल घृणा आहे. जवळ आणि लांब अंतरावरची भाडी नाकारण, सुट्टे पैसे न देणं किंवा अडवून धरणं अर्वाच्य भाषा वापरणं, बेगुमान ड्रायव्हिंग करणं या सर्व गोष्टी वस्तुस्थितीत आहेत. परंतु याचं प्रमाण किती ? व्यवस्थित युनिफॉर्म, बिल्ला, लावून वाहतुकीचे नियम पाळून काम करणारेही रिक्षाचालक आहेत. प्रामाणिकपणाने राहिलेलं सामान पत्त्यावर पोहचवणारे आहेत. लहान मुलांना शाळेत नेणारे, माया लावणारे रिक्षाड्रायव्हर आहेत. पण वर्तमानपत्रात या गोष्टी येत नाहीत. आलंच तर वाचकांच्या पत्रव्यवहारात एखादं पत्र. मोठी बातमी येते; पण कशाची ? तर–रिक्षावाल्याने महिलेवर बलात्कार केला !

## आरटीओ । ट्राफिक पोलीस


१०,००० रिक्षाचालकांनी ज्यांच्याशी संबंधित मागण्यांसाठी संप केला ते आरटीओ ट्राफिकपोलीस यांचं या संबंधात काय म्हणणं आहे म्हणून वाहतूक-पोलिसांशी थोडी चर्चा केली. नेहमीप्रमाणेच सुरवातीला 'कायदा व सुव्यवस्था' हे शब्द ऐकायला मिळाले आणि त्यापुढे रिक्षावाल्यांनी केलेल्या गुन्ह्यांचे पाढे !

सगळ्यात प्रथम म्हणजे काही नागरिकांकडूनच मीटर फास्ट असल्याच्या तक्रारी आल्या आणि मग तपासणी सुरू झाली. त्यात ३५० ते ४०० रिक्षांचे मीटर २० ते ६० पैसे इतके फास्ट केलेले आढळले ! याचाच पुढचा भाग म्हणून मीटररिपेरर्सवर धाडी घालण्यात आल्या. त्यात २७ मीटर्स जप्त करण्यात आले. आरटीओ–प्रमाणित असे फक्त ५ मीटररिपेरर्स आहेत; पण पोलिसांच्या म्हणण्यानुसार अनधिकृत रिपेरर्स यांची संख्या मोठी आहे आणि ४०० फास्ट मीटर्स हा काही दिवसांच्या तपासणीतला आकडा आहे. प्रत्यक्षात १०,००० रिक्षात हे प्रमाण ४,००० पर्यंत जाणं सहज शक्य आहे !

पी. एस. आय. रँकखालील कर्मचाऱ्याचे लायसेन्स जप्त करणे हे अधिकारात बसत नाही हेही त्यांनी मान्य केलं; पण त्यांचं म्हणणं रिक्षावाल्याने युनिफॉर्म घालून, बॅच लावून, लायसेन्स जवळ बाळगून, वाहतुकीचे सर्व नियम पाळले तर हे प्रकार होतीलच कशाला ?

रिक्षावाल्यांनी पोलिसांवर जो भ्रष्टाचाराचा आरोप केलाय त्याबद्दल बोलताना ते म्हणाले, हा आरोप कोणत्याही सरकारी अधिकाऱ्यावर होऊ शकतो आणि हा भ्रष्टाचार कुठल्याही पातळीवर होऊ शकतो.

त्याही पुढं त्यांचं म्हणणं असं की, पोलीस अडवतो, दंड सांगतो तर प्रवासी किंवा रिक्षाचालकच तडजोडीची भाषा सुरू करतो आणि भ्रष्टाचाराला सुरुवात होते आणि प्रत्येक अधिकारी कर्तव्यनिष्ठ असेलच असे नाही आणि बदलती सामाजिक परिस्थिती, नीतिमूल्ये या सगळ्यातलाच तो एक घटक आहे. फक्त त्याच्या अंगावर गणवेश असल्यानेच तो तेवढ्यापुरता पोलीस असतो !



कृतिसमितीच्या मागण्या खुद्द रिक्षावाल्यांनाही माहीत नाहीत....

मध्यंतरी रिक्षावाल्यांवर बलात्काराचे जे आरोप झाले त्याबद्दल बोलताना असं बोललं गेलं की, 'बलात्कार' कुणीही करू शकतो. रिक्षावाल्यापासून ते पोलिसांपर्यंत कुणीही. कारण ती एक प्रवृत्ती आहे किंवा एका विशिष्ट मानसिक अवस्थेतील ती एक क्रिया आहे. त्यामुळे सगळेच रिक्षावाले तसे असतात असं गृहीत धरणं म्हणजे इतरांवर अन्याय करणं आहे. उदा. शाळेत मुलं पोचविणारे रिक्षावाले हे अतिशय प्रामाणिक असतात. ते मुलांचा गृहपाठ उतरवून घेण्यापासून ते शिक्षक-पालक-निरोप पोहचविण्यापर्यंत सर्व कामे करतात. आजवर अशा रिक्षावाल्यांच्या नावावर एकही अपघात नाही आणि त्यामुळेच ६ मुलं नेण्याची परवानगी असतानादेखील १२/१२ मुलं नेली जातात तरी त्यांच्यावर गुन्हा दाखल केला गेलेला नाही !

अशी विश्वासार्हता जर इतरांनीही मिळविली तर ?

वाहतूकनियम भंग होतो. बऱ्याचदा सूचना वेळेवर मिळत नाहीत किंवा वाहतूकनियंत्रण होत नाही याला कारण पुण्याची नगररचना. पुण्यात लक्ष्मीरोडवर कुंटेचौकापासून सिटीपोस्टापर्यंत आणि वसंतटॉकीज ते मंडई एवढ्या टापूत बाजारपेठ, थिएटर, शाळा इ. इ. सर्व गोष्टींचं केंद्रीकरणच

झालय. त्यात अरुद रस्ते, बोळ जुन्या इमारती, नवी नगररचना घरमालकाच्या स्टेमुळे फायलीतच धूळ खात पडते. आता पादचारी-मार्ग (झेब्रा क्रॉसिंग) रंगविणे हे मनपाच्या कक्षेतल काम; पण मनपाने अजून ८१ चं टेंडरच पूर्ण केलेल नाही ! सिग्नल आमच्या कक्षेत; पण मेंटेनन्स मनपाकडे ! अशा प्रकारे आम्हीसुद्धा या प्रचंड यत्रणेतील एक भाग आहोत आणि तेही नियमाचे ताबेदार ! त्यामुळे गणवेश अगावर आला की, मानवतावादी दृष्टिकोन कमी होत जातो किंवा करावा लागतो. कारण या पेशात भावनाशीलता टिकत नाही !

अशा प्रकारे ट्रॅफिक पोलिसानी आपली बाजू ऑल क्लियर केली होती. बऱ्याच गोष्टी त्याच्या हातात नसतात आणि ज्या हातात असतात त्या 'कायदेशीर' असतात आणि कायद्याची अंमलबजावणी करणे हे त्याचे कर्तव्य. तेव्हा आपण काय बोलणार ?

### आपण–तिसरा घटक

तर अशा या दोन बाजू एकून घेतल्यानंतर सर्वसामान्य माणसाच्या पातळीवरून या गोष्टीचा विचार करू लागलो तेव्हा लक्षात आलं, पोलीस आणि रिक्षावाले या दोघामध्ये आपण आहोत. मुळात पोलीस या प्रकाराबद्दल भीतियुक्त आदर व तिरस्कार. त्यातूनही ट्रॅफिक पोलिसाचे चौकाचौकातले अनुभव हे काही फारसे सुसह्य नाहीत. रिक्षावाल्याबद्दलही तेच; पण तरीही हे दोन घटक आपल्या दैनंदिन व्यवहारातून पूर्णपणे सुटे करता येतातच असे नाही. त्यामुळेच या सदर्भात जेव्हा काही होतं तेव्हा उदासीनता दाखवून चालणार नाही. आपल्या वाहनावरून जाताना आपली चूक झाली तर वाहतूक–पोलिसानी ती चूक क्षुल्लक समजून सोडून द्यावे ही अपेक्षा असते तर रिक्षावाला आपल्यावर धडकला तर पोलिसाने त्याला कडक शासन करावे ही अपेक्षा ! पोलिसाला कसं चुकवल याचं कॉलेज–कॅन्टिनमध्ये होणारं ग्लोरिफिकेशन आणि ५ रु. टेकवले आणि सुटलो हे फुशारकीतील म्हणणं व आरटीओ–ऑफिसात पैसे खातात म्हणून बोब मारत सुटणे, ही सगळी परस्परविरोधी कृती आहे. नियम आपणच बनवायचे, आपणच अंमलबजावणी करायची व आपणच मोडायचे. फक्त परिस्थितीनुरूप आपण त्यातून सुटायचे ! ही एकूणच बदलत्या समाजव्यवस्थेतील नीतिमूल्याची वाईट पायाभरणी आहे.

तिला 'चेकने पैसे घेतो' अशी राजमान्यता आहे.

आणि त्यामुळेच 'घेणारी' यंत्रणा बदनाम होते व 'देणारी' व्यवस्था मूल्याच्या नावाने बोब मारत सुटते.

अर्थात यात ज्याच्याकडे अंमलबजावणी आहे त्यांच्या प्रामाणिकतेची। कर्तव्यनिष्ठेची कसोटी आहे, देणारा कितीही देवो, मी घेणार नाही ही वृत्ती हवी.

त्याच वेळी मी शक्यतो नियमाचे पालन करीन हे व्रत अंगी बाणवणारी समाजव्यवस्था हवी, नाही तर मग शहराच्या दळणवळणाचा एक प्रमुख भाग असलेल्या दहा हजार रिक्षा बंद राहतात तरी नागरिक थड राहतात ! ते रिक्षावाल्याना, रिक्षावाले पोलिसाना आणि पोलीस या दोघाना दोष देत राहतात. याचाच अर्थ असा की, आमच्या सार्वजनिक जीवनातला सवाद कमी होत चाललाय. ही तीन पायाची शर्यत. पोलीस। रिक्षावाले। प्रवासी यात कुणीही एक कमी पडलं तरी शर्यत हरू आपण. त्यामुळेच कुणा एकाकडे पूर्वग्रहदूषित नजरेनं पहाणं सोडून सुजाण नागरिक म्हणून प्रत्येक प्रश्नात लक्ष घालून त्यावर सर्वमान्य तोडगा काढायला हवा. मग तो पी. एम. टी. चा संप असो, पोलीस-अत्याचार असोत की रिक्षाचा सप !

—संजय पवार

# फिल्मोत्सव–८४

## मूड जमलाय; उत्साह बेताचाच ! आठवड्यानंतर मरगळ !

यंदाचा फिल्मोत्सव मुबईत होणार हे गेले कित्येक महिने सतत कानावर पडत होत. बऱ्याच कालावधीनतर (१९७६ नतर) मुंबईत पुन्हा फिल्मोत्सव होत असल्यान सयोजक कसून फिल्मोत्सवाच्या तयारीसाठी झटत होते आणि त्याच्या बातम्या सर्व प्रसिद्धीमाध्यमांतून वेळोवेळी मिळत असल्यानं 'फिल्मोत्सव' प्रकरण चागलच गाजत होत. फिल्मोत्सव जवळजवळ येऊ लागला तसतशा फिल्मस्ट्रिपच्या वलयात बसलेला गणपती– हे यंदाच्या फिल्मोत्सवाचं प्रतीक असलेली पोस्टर्स, 'फिल्मोत्सव ८४' या दिमाखदार अक्षराची पोस्टर्स, फिल्मोत्सवात दाखवल्या जाणाऱ्या देशी–विदेशी चित्रपटाची रंगीबेरंगी पोस्टर्स, अशा मुबापुरीच्या विविध भागात खुणा उमटायला लागल्या. या फिल्मोत्सवाचं स्वागत म्हणून की काय; पण सुदैवानं मुबापुरीला निसर्गाचीही साथ लाभलीय. नेहेमीच्या प्रचंड उकाड्याला आणि घामाला मुबईनं रजा दिलीय. साहजिकच फिल्मोत्सवाचा मूड तर चांगला जमून आलाच; पण मुंबईच्या उकाड्याचा धसका घेतलेली परदेशी पाहुणेमंडळीही या काहीशा उबदार वातावरणावर भलतीच खूष आहेत आणि उत्साहान फिल्मोत्सवात सामील झाली आहेत.

देशी–विदेशी निवडक चित्रपट एकाच वेळेस बघायला मिळण हे फिल्मोत्सवाच मुख्य आकर्षण. साहजिकच पत्रकार, समीक्षक, चित्रपटमाध्यमाशी सबधित व्यक्ती याच्याबरोबरच चित्रपटसृष्टीतील कलाकारानाही फिल्मोत्सवाच अप्रूप असेल अशी एक भाबडी अपेक्षा होती; पण फिल्मोत्सवाला येणाऱ्या शशीकपूर, शबाना आझमी, गुलजार, गोविंद निलहानी, ओम पुरी, अमरीश पुरी वगैरे चित्रपटसृष्टीतील चार–दोन डोक्याचा अपवाद वगळता बाकी बहुताशी मंडळीना चित्रपटसृष्टीच माहेरघर असलेल्या मुंबापुरीत फिल्मोत्सव सुरू आहे हे तरी माहीत असावं की नाही, याची शंका यावी इतपत शुकशुकाट आहे !

व्यावसायिक चित्रपटांत निरर्थक भूमिका करून खोऱ्यानं ओढलेला पैसा कलात्मक चित्रपटांच्या निर्मितीसाठी वापरणारा शशीकपूर

तितक्याच इमानेइतबारे फिल्मोत्सवास अगदी पहिल्या दिवसापासून उपस्थित आहे. पांढऱ्या शुभ्र पोशाखातला शशीकपूर, खांद्याला झोळी अडकवून फिरणारा ओम पुरी 'मेट्रो' प्रेक्षागृहाच्या बाल्कनीत ठराविक जागाच पकडून बसणारे आणि जोडीजोडीनं हिंडणारे गोविंद निहलानी, अमरीश पुरी... वगैरे काही मंडळी फिल्मोत्सवाचे 'पर्मनंट मेम्बर्स'! जवळजवळ प्रत्येक चित्रपट आवर्जून बघणं, त्यावर उत्साहानं चर्चा करणं वगैरे गोष्टीही रंगात येऊन चाललेल्या असतात.

## नट-नटयांची गर्दी कमीच

सर्वसाधारणपणे कोणत्याही कलाकाराला बाहेरच्या जगात मोकळेपणान वागायची चोरीच होऊन बसलेली असते. कारण हे कलाकार जरा मोकळयावर यायचाच अवकाश की, गुळाच्या ढेपेला मुगळे ज्या वेगानं चिकटतात, त्याच वेगान चित्रपटशौकिनांची त्यांच्या आवडत्या कलाकाराभोवती गर्दी जमते; पण इथ मात्र शशीकपूर येऊ दे, नाही तर गुलजार येऊ दे... त्याच्याभोवती जीवघेणी गर्दी जमत नाही, की त्यांच्या येण्याची मुद्दाम दखलही घेतली जात नाही. साहजिकच ही मंडळी फिल्मोत्सवाला येणाऱ्या अनेकांपैकीच एक अशी होऊन जात होती आणि त्यामुळे आपोआपच मिळणारं मोकळेपणही ही मंडळी चागलंच उपभोगून घेत होती.

व्होल्कर स्क्लोएनड्रॉफ या जर्मन दिग्दर्शकाच्या पत्रकारपरिषदेस शशीकपूर आवर्जून उपस्थित राहला होता आणि स्क्लोएनड्रॉफची पत्नी मार्गारेट फॉन ट्रोटा (जी दिग्दर्शिका आणि पटकथालेखकही आहे) हिन 'या पत्रकारपरिषदेस मी दिग्दर्शिका म्हणून नाही तर स्क्लोएनड्रॉफची पत्नी म्हणून उपस्थित राहिले आहे' अस सांगितलं. तेव्हा शशीकपूरनं जोरजोरात टाळया वाजवून तिच्या वाक्याचं स्वागत केलं; पण बाकीच्या कोणीच त्याला प्रतिसाद न दिल्यानं त्याच्या एकटयाच्याच टाळीचा आवाज संपूर्ण हॉलमध्ये घुसला. स्वतः एक कलाकार आहोत, याचा बाऊ न करता इतरामधलेच एक या भावनेतून फिल्मोत्सवात वावरणारा शशीकपूर तर काही काळ 'मेट्रो'त येऊन जास्तीत जास्त लोकांचं लक्ष आपल्याकडे कसं वेधून घेता येईल, याचा प्रयत्न करणारा ऋषीकपूर. या दोघाच्या दोन तऱ्हा तर रणधीरकपूरची तऱ्हा आणखीनच निराळी. राजकपूरच 'बोट' धरून 'मेट्रो'च्या मुख्य दरवाजातून रणधीरला आत शिरताना पाहून जरा आश्चर्यच वाटलं. म्हटलं, राजकपूरन जरा कानपिचक्या दिल्या असतील म्हणून सुधारलेला दिसतोय; पण त्याच्याविषयी निर्माण झालेल्या साऱ्या कल्पनाना बेटयानं चागलाच सुरुंग लावला. आल्यापासून हा पठ्ठया 'मेट्रो'च्या प्रमुख दरवाजापाशीच असलेल्या खाण्यापिण्याच्या काउंटरलाच जो चिकटला तो चिकटलाच! जेव्हा पाहावं तेव्हा रणधीर तिथंच. एकीकडे खात खात आणि दुसरीकडे आजूबाजूच्या लोकांशी गप्पा मारत रणधीरन आपली बैठक चांगलीच जमवली होती. दिवसेंदिवस फुगत चाललेल्या रणधीर कपूरला या वेगानं म्हाताऱ्याच्या भूमिका मिळायला वेळ लागणार नाही, अशी लक्षणं दिसू लागली आहेत. रणधीर त्या दिवशी दिसला तेवढाच. परत काही फिल्मोत्सवाकडे फिरकला नाही!

*'वो सात दिन' या गेल्या वर्षी यशस्वी* ठरलेल्या चित्रपटामुळे फॉर्मात आलेला अनिलकपूरही नटूनथटून आलेला दिसला; पण त्याच्याकडे फारसं कुणाचच लक्ष न गेल्यानं हिरमुसलेला अनिलकपूर एका कोपऱ्यातल्या कोचावर आपल्या मोठया भावाशी बोनीकपूरशी शातपणे गप्पा मारत बसला. तेव्हा एका फोटोग्राफरनं अनिलकपूरला पाहलं आणि फोटोसाठी पोझ देण्याची विनंती केली. आजूबाजूच्या ऐनगर्दीत त्यांचं हे फोटोग्राफी सेशन रगात आलेलं असतानाच अनिलकपूरकडे सगळयाचं लक्ष गेलं. त्यामुळं कळी खुललेला अनिलकपूर उत्साहानं गप्पात सामील झाला. नंतर 'मेट्रो'च्या आवारात अनिलकपूर सह्या देण्यात दग झाला होता.

मराठीतली अशोक सराफ-रंजना ही जोडी फिल्मोत्सवात पारव्याच्या जोडीगत फिरत होती. याशिवाय ('फिल्मोत्सवात कॉमेडी चित्रपट आहेत का हो?' म्हणून प्रकाश भेंडे विचारत होते, अशी कुजबुज कानावर आली.) उमा भेंडे (ही बाई लग्नाला जाताना नटावं तशी नखशिखांत नटून आली होती), अरविंद-देशपांडे-सुलभा देशपांडे, रामदास फुटाणे वगैरे मंडळीही फिल्मोत्सवात सामील झाली होती रोहिणी हट्टंगडी आणि अमोल पालेकर उद्घाटनसमारंभानंतर फिल्मोत्सवातून गायबच झाले; पण जयदेव हट्टगडी आणि चित्रा पालेकर ही त्याची 'अर्धांगं' (अनुक्रमे) फिल्मोत्सवास प्रामाणिकपणे हजर आहेत.

फिल्मोत्सवासाठी अनेक परदेशी पाहुणेही आले आहेत. या पाहुण्याची आणि हजारो भारतीय प्रेक्षकाची गाठभेट घालून देण्याची जबाबदारी दूरदर्शननं स्वीकारली आहे आणि 'मेट्रो' प्रेक्षागृहाच्या बाजूच्याच लॉबीत मुंबई दूरदर्शननं आपल तात्पुरत युनिट टाकलेल आहे. पत्रकार-परिषदाना येऊन भराभरा फिल्मिंग करण, परदेशी पाहुण्यांच्या मुलाखती घेणं, सध्याकाळच्या रिपोर्टिंगसाठी व फिल्मोत्सवाच्या निमित्तानं होणाऱ्या निरनिराळया कार्यक्रमाचं शूटिंग करण...वगैरे कामं दूरदर्शनची मंडळी बाकीच्या कुणाशी आपला संबंध नाही, अशा थाटात भराभरा हातावेगळी करताना दिसतात.

## खरा उत्साह नंतरच

यावर्षीच्या महोत्सवात 'गरमागरम' चित्रपटाविरुद्ध सरकारन मोहीम उघडल्यानं असे मसालेदार चित्रपट महोत्सवात फारसे नाहीतच आणि 'दी बिग ब्लॉन्ड', 'दी बॅलड ऑफ नारायमा', 'मेकिंग लव्ह' वगैरे चित्रपट फिल्मोत्सवात सामील असूनही केवळ सेक्स आणि व्हायोलन्सचा अतिरेक म्हणून दाखवले जाणार नाहीत—अशी एक हूल उठली होती; पण प्रत्यक्षात मात्र हे चित्रपट प्रदर्शित व्हायचं निश्चित झालं, तेव्हा आधीच्या प्रसिद्धीचा या चित्रपटाना चागलाच फायदा झाला आणि या चित्रपटाना झाडून सगळे उपस्थित राहिले. बहुतेक चित्रपटांना 'मेट्रो' प्रेक्षागृहातल्या बऱ्याच खुर्च्या रिकाम्या राहात असताना या चित्रपटाच्या वेळेस मात्र 'मेट्रो' प्रेक्षागृह ठेचाठेच (अगदी खालच्या-वरच्या जागा आणि मधल्या पायऱ्यांसकट) भरलं होतं.

'मेट्रो' चित्रपटगृह फक्त पत्रकार आणि निमंत्रितांसाठी राखीव असलं तरी 'आकाशवाणी' 'स्ट्रँड' याच्याबरोबरच इतरांसाठीही खुली आहेत. त्यामुळे तिथल्या गर्दीची मजाही काही औरच आहे. तिकि-

टाचे महागडे दर खिशाला गळती लावत असूनही मोठ्या सख्येनं प्रेक्षकवर्ग येतो आहे. मर्यादित जागामुळे अनेकाची निराशा झालीय. चित्रपटगृहावर तिकिटाचा काळा बाजारही मोठ्या प्रमाणावर होताना दिसतो. आयत्या वेळेस तरी कर्मधर्मसयोगानं तिकिट मिळालं तर बघावं म्हणून कित्येक जण बाहेर उभ राहून आत जाणाऱ्याना 'एक्स्ट्रॉं है क्या भाई?' म्हणून हटकत होते. 'आदि शकराचार्य' बघायला दोन साधूसारख्या दिसणाऱ्या व्यक्ती आल्या होत्या आणि त्याही चित्रपटाची तिकिट मिळवण्याची खटपट करताना आढळल्या.

'मेट्रो'तले एकापाठोपाठ एक होणारे चित्रपट आणि पत्रकार-परिषदाना उपस्थित राहून दमल्या-भागलेल्या मंडळीवर फिल्मोत्सवाच्या पहिल्या आठवड्याच्या शेवटी शेवटी काहीशी मरगळ आली असली तरी 'खरा फिल्मोत्सव दुसऱ्याच आठवड्यात सुरू होतो' असं म्हटलं जात असल्यानं पुन्हा उत्साहानं ही मडळी दुसऱ्या आठवड्यासाठी सज्ज झाली आहेत.

— शुभदा रानडे

फिल्मोत्सव–८४

# दाँताँचा वारसा चालविणारे क्रांतिकारक सर्वत्र असेच बळी पडतात का?

१७७० मध्ये फ्रान्समध्ये राज्यक्राती झाली. अगदी 'बास्टिलच्या उठावा'सकट शालेय टेक्स्टबुकातून परिचित असलेल्या या क्रातीनतर फ्रान्समध्ये अनेक उलथा-पालथी झाल्या. राजघराण्याची बेबदशाही सपुष्टात आणणाऱ्या व 'रिपब्लिक' स्थापन करू इच्छिणाऱ्या या क्रातिकालात अनेक बडे, उठाव झाले. गटबाजी, कट-कारस्थाने याना ऊत आला.

सुरुवातीच्या काळात 'प्रजासत्ताकाची उभारणी चालू होती. अनेक सार्वजनिक समित्या स्थापन झाल्या होत्या 'असेम्बली' जन्माला आली होती. सरकारी कारभाराला घटनेचे अधिष्ठान दिले जात होते. लोकांचे सरकार लोकाचे प्रतिनिधी चालवत असल्याचा देखावा माडला जात होता. 'स्वातंत्र्या'चा उद्घोष तर चालूच होता. नवी वृत्तपत्रे निघत होती. त्यातून नवे विचार माडले जात होते. मवाळ, जहाल, अतिजहाल असे विविध राजकीय छटा व हितसंबध असलेले गट अस्तित्वात आले होते. त्याच्यात सत्तास्पर्धा, आरोप-प्रत्यारोप, टीका-प्रतिटीका चालू होत्या.

याच काळात स्वातंत्र्याचा फायदा किंवा गैरफायदा घेऊन विविध वर्ग नव्या जोमाने आपले हितसबध जोपासण्यास सरसावले होते. त्यात शेतकरी, बँकर्स, छोटे-मोठे व्यापारी, मध्यमवर्गीय होतेच; शिवाय सरदार, उमराव, जमीनदार, श्रीमत व नवश्रीमतही होतेच. एकीकडे प्रजासत्ताक उभारले जात होते तर दुसरीकडे ते कोणाच्या हितासाठी यावर वाद चालू होता. यातील काही जुन्याच विचाराना मुलामा देऊन 'मोनर्की'चे समर्थन करत होते तर काही क्रांतीच्या अतिरेकी कल्पना माडत होते.

राजकीय रंगमंचावर हे नाट्य घडत असतानाच फ्रान्सला युद्धाची भीती होती. विशेषत: यादवी युद्धाची. शिवाय राज्यात दुष्काळ पडला होता. महागाईने जनता हैराण झाली होती. सर्वदूर फ्रान्समध्ये हे घडत असताना क्रातीची सूत्रे जिथून हलत त्या पॅरिसमध्ये सत्तापिपासू राजकारणी वेगळाच कट शिजवत होते. रोबेस्पिअर या निष्ठुर नेत्याच्या नेतृत्वाखाली तेथील सत्ताधाऱ्यानी ५ सप्टेबर १७९३ मध्ये 'दहशतवाद' सुरू केला. त्यामुळे तुरुग भरले जात होते. सैन्य वाढले होते. विरोधकांना नेस्तनाबूत करण्यासाठी 'गिलोटिन' खाली दिले जाते. दहशतवादाने परिसीमा गाठली होती.

अशा या जुलमी परिस्थितीत एक नेता लोकप्रिय होता. 'प्रजासत्ताक' मजबूत करण्यासाठी वाट्टेल ते मोजायची त्याची हिंमत होती. दहशतवादाच्या दाट छायेतही तो स्वातंत्र्याचा उद्घोष करत होता, ज्याचा लोकशक्तीवर विश्वास होता. त्याच्या शब्दात लोकमत बदलण्याची, ते काबूत ठेवण्याची धमक होती. तो नेता म्हणजे जॉर्ज जॅक्युस् दांतॉं!

फ्रेंच राज्यक्रातीने अनेक लोकनेते, विचारवंत, कलावत, तत्त्वज्ञ, हुकुमशहा एवढेच काय नोकरशहा अजरामर केले; पण या सम हाच म्हणून ज्याचा उल्लेख करावा लागेल तो दांतॉंच! एक रसरशीत, रांगडा आणि बुद्धिमान नेता. खऱ्या अर्थाने 'मानवी चेहरा' असलेला क्रातिवीर. काळाचा ठोका ओळखून लोकाची नाडी उमजणारा. त्याचे अवघे व्यक्तितत्वच क्रातिमय

फ्रान्समधील उलथा-पालथीत झालेल्या अगणित घडामोडींच्या काळात फुललेला, बहरलेला हा लोकोत्तर पुरुष ५ एप्रिल १७९४ मध्ये त्या दहशतवादी राजवटीच्या इशाऱ्यावर चालणाऱ्या 'गिलोटिन' ला बळी पडला. आज हाच 'दांतॉं' सिनेमाच्या पडद्यावर जिवत झालाय आणि त्याचा जन्मदाता आहे आंद्रे वाज्दा हा पोलिश दिग्दर्शक!

□

पोलडमधील सद्य.कालीन राजकीय मानसिकता ओळखून आपले चित्रपट निर्माण करणाऱ्या या वादग्रस्त दिग्दर्शकाने नेमक्या वेळी दांतॉला सिनेमाच्या पडद्यावर जिवंत केले आहे. १७७९ ते १७९४ या काळात अत्यत वेगाने धावणाऱ्या दांतॉंच्या राजकीय कारकीर्दीतील त्याच्या अखेरच्या काळाचे

चित्रण वाज्दा आपल्या चित्रपटात करतो. विशेषत: त्याचे शिरकाण होण्यापूर्वीचे आठ दिवस चित्रपटात अधिक दिसतात.

स्वत:च लादून घेतलेल्या अज्ञातवासानंतर दाँतों नोव्हेंबर १७९३ मध्ये पॅरिसमध्ये आला. तेथे चित्रपट सुरू होतो. त्या वेळी पॅरिसमध्ये रॉबेस्पिअर आणि कपूची दहशत असते तर पॅरिसची भुकेकगाल जनता ब्रेड-साठी रांगेत ताटकळत असते!

आपले आगमन झाल्यानंतर लगेचच दाँतों सार्वजनिक सुरक्षा समितीचा सदस्य या नात्याने रक्तपात टाळण्यासाठी फ्रान्सच्या सीमेवरील शत्रूशी वाटाघाटी करण्याचे सत्ताधाऱ्यांना आवाहन करतो, तर देशात शांतता राखण्याची मोहीम उघडतो. यामुळे रॉबेस्पिअरच्या नेतृत्वाखाली समितीच्या सदस्यांना चांगलाच हादरा बसतो. त्यांना संपूर्ण विजय हवा असतो.

क्रांतिकाळात एके काळी आपला सहकारी मित्र असलेला दाँतों– त्याचे मन आपण वळवू शकू असे रॉबेस्पिअरला वाटत असते; पण ती आशा फोल ठरते आणि रॉबेस्पिअर दाँतोंचा सहकारी कॅमिली डेस्मोली याच्या वृत्तपत्राच्या कचेरीस सील ठोकण्यास परवानगी देतो. समितीच्या सदस्यांवर कडवी टीका करणाऱ्या या वृत्तपत्राची कचेरी गुप्त पोलीसखात्याचा मुख्य हेरॉन उध्वस्त करतो व तेथील वृत्तपत्राच्या प्रती ताब्यात घेतो.

त्या बदल्यात दाँतों हेरॉनला अटक करण्याची मागणी करतो. याच वेळी रॉबेस्पिअर आणि दाँतों यांच्यात झालेली समझौता–बैठक फिसकटते. या बैठकीत दाँतों दारूच्या अंमलाखाली जातो आणि उभयतांमधील मतभेदाची दरी अधिकच रुंदावते.

देस्मोलीचे मन वळविण्यातही रॉबेस्पिअर अपयशी ठरतो. दरम्यान तथाकथित क्रांतिकारी सरकारविरुद्ध दाँतों कट करत असल्याच्या अफवा समिती-सदस्य पिकवतात व रॉबेस्पिअरवर दबाव आणतात. त्याला बळी पडून रॉबेस्पिअर दाँतों-गटाला अटक करण्याच्या आदेशास अनुमती देतो.

आपल्या स्वत:च्या उत्स्फूर्त, वाक्चातुर्यावर उदंड विश्वास असणारा दाँतों या अटकेच्या संदर्भात बोलाविलेल्या 'कन्वेन्शन'मध्ये समितीचे पोस्टमार्टेम करतो. या अटकेची राजकीय चौकशी सुरू होते. अर्थातच या चौकशीची नोंद केली जात नाही. पत्रकारांना चौकशीचे वृत्त देण्यास मज्जाव केला जातो. साक्षीदारांना बोलाविण्याचे टाळले जाते. काय निर्णय द्यायचा हे अगोदरच ठरले असल्याने ही चौकशी म्हणजे 'फार्स' आहे हे दाँतों–गटाच्या लक्षात येते. दाँतों व त्याचे सहकारी अत्यंत उद्विग्न अवस्थेत सभात्याग करतात आणि मग त्यांच्या अनुपस्थितीत त्यांना दोषी ठरवून 'गिलोटिन'खाली त्यांचा शिरच्छेद करण्याचा आदेश निघतो. दाँतोंच्या इच्छेनुसार त्याचे शीर लोकांना दाखविले जाते. काहीसा आजारी असलेला रॉबेस्पिअर क्रांतिपूर्व फ्रान्सचा हुकूमशहा होण्याची ऑफर नाकारतो. दाँतोंच्या कारकीर्दीतील अशा मोजक्या घटनांनी विणलेला वाज्दाचा चित्रपट इथे संपतो!

## काळ सजीव झाला

त्या काळाचा केवळ आभासच नव्हे तर त्याच काळात घेऊन जाणारे वातावरण चित्रपटाच्या हरएक 'फ्रेम'मध्ये प्रतीत होते. दाँतों–रॉबेस्पिअर यांची निवासस्थाने, असेंब्लीहॉल, तुरुंग, दिंडी–दरवाजे, रस्त्यालगतच्या दगडी भिंती सारं काही त्या काळाचे 'वास्तुज्ञान' घेऊन उभे राहिलेले दिसते. ते लांब झगे, ते लांब केसांचे विग असा अगदी वेशभूषेपासून केशभूषेपर्यंत सर्व गोष्टींबाबत अगदी बारकाव्यानिशी तो काळ आणि त्या काळातल्या व्यक्तिरेखा उभ्या राहतात. राजकीय नेते-मंडळींपासून ते पॅरिसमधील सामान्य जनतेपर्यंत साऱ्यांच्याच वेशभूषेतील बारकावे नजरेत भरतात.

तसा हा चित्रपट मुख्यत: दोन व्यक्तिरेखांभोवतीच फिरतो. दाँतों आणि रॉबेस्पिअर. एके काळी क्रांतीच्या ध्येयाने पेटलेले हे दोन सहकारी क्रांतीनंतर परस्परांच्या विरोधात उभे असतात. या काळातील तसे दोघांचेही वय सारखेच. एकाचे पस्तीस तर दुसऱ्याचे छत्तीस. दाँतों रांगडा; पण दिसायला काहीसा कुरूप. शब्दांवर हुकमत असलेला उत्कृष्ट वक्ता, लोकप्रिय पण कोणत्याही पक्षाचे पाठबळ नसलेला, तसा एकाकी लढणारा. तर रॉबेस्पिअर काहीसा आजारी, त्यामुळे थोडाफार खचलेला; पण अत्यंत मुत्सद्दी, तसे खुनशी डावपेच आखणारा निष्ठुर, ब्युरोक्रॅट. शिवाय सत्ताधाऱ्यांचा सर्वेसर्वा. क्रांतिपूर्व काळात दोघांची उद्दिष्टे–ध्येये वेगळी. एक स्वातंत्र्याचा, शांततेचा पुरस्कर्ता, तर दुसरा दहशतवादाला गोंजारणारा. अशा परस्परविरुद्ध प्रवृत्तीचे, विशिष्ट राजकीय ठेवण असलेले हे दोघे पडद्यावर साक्षात उभे केले आहेत. फ्रेंच अभिनेता जेरॉर्ड देर्पेद्यु ( Gerard Depardieu ) ( दाँतों ) व पोलिशअभिनेता वॉजेक प्सेझोनिक (Wojcaiech Pszoniak) (रॉबेस्पिअर) या दोघांनी. ही दाँतोंची शोकांतिका असली व आपला कल दाँतोंकडे जात असला तरी दोघांच्या अभिनयात डावे–उजवे करणे शक्य होत नाही, यातच त्यांच्या उत्तुंग अभिनयाची साक्ष पटते.

मात्र 'दाँतों'च्या शोकात्मिकतेची मदार केवळ याच गुणावर नाही. या गुणामुळे त्याला भरीवपणा आला आहे. त्यातील नाटय अधिक उठावदार बनले आहे; पण केवळ तो 'पॉवर पॅक्ड कास्च्युम ड्रामा' झालेला नाही, तर ही शोकात्मिका अधिक भेदक बनली आहे ती वाज्दाच्या चाणाक्ष दिग्दर्शनामुळे व संवादांमुळे. वाज्दाचे काही मार्मिक, काही सूचक बारकावे, तपशील बरेच काही सांगून जातात तर संवाद आपले कान ताब्यात घेतात.

दाँतों पॅरिसमध्ये दाखल होतो या पहिल्या दृश्यापासून वाज्दाचे दिग्दर्शनकौशल्य दिसू लागते. दाँतों बग्गीतून येत असतो त्या वेळी 'गिलोटिन' जेथे ठेवण्यात आलेला असतो त्या चबुतऱ्याची सावली संपूर्ण परिसरात पडलेली असते. जणू काही दहशतवादच पसरलेला असतो. त्याच्या पाठोपाठच एक दृश्य येते ते रॉबेस्पिअरच्या घराचे. तेथे रॉबेस्पिअरच्या पाच–सहा वर्षांच्या पुतण्याकडून त्याची आई 'स्वातंत्र्य-समता–बंधुत्वाची मूलतत्त्वे' पाठ करून घेत असते. तो चुकत असतो, अडखळत असतो. म्हणून त्याला ती शिक्षाही देत असते. वाज्दाने हेच दृश्य सिनेमाच्या अगदी शेवटीही घेतले आहे. दाँतोंचा शिरच्छेद केल्यानंतर रॉबेस्पिअर अंथरुणावर पडलेला

असतो. त्या वेळी त्या पुतण्याची मुलतत्त्वे पाठ झाल्याचे त्याची आई मोठ्या आनदाने त्याला सागते आणि तोही घोकपट्टी केल्यासारखी ती मूलतत्त्वे म्हणून दाखवितो.

दाँतों आणि रॉबेस्पिअर यांची उंच व्यक्तिमत्त्वे दाखविण्यासाठी वाज्दा यांनी त्या वेळच्या शिल्पकार आणि चित्रकारांचा उपयोग केला आहे. दाँतोंला अटक केल्यानतर रॉबेस्पिअर शिल्पकाराकडे आलेला दिसतो. रॉबेस्पिअर हुकुमशहा कसा दिसेल यासाठी शिल्पकार त्याला सजवत असतो;' पण तो काही हुकुमशहा वाटत नसतो. त्याचा आविर्भाव उसनाच वाटतो तर दाँतोंला 'गिलोटिन'खाली देण्यासाठी नेण्यात येत असते त्या वेळी चित्रकार दाँतोंचे शेवटचे चित्र चितारत असतो. त्याचे हात कापत असतात. तरी पण तो चित्रकार दाँतोंच्या चेहऱ्यावरील ते 'मानवीपण' जोखण्यासाठी जिवाचे रान करत असतो. एकीकडे त्याच्यातील दाँतोंबद्दलची आत्मीयता तर दुसरीकडे त्याची 'क्रिएटिव्हिटी' अशी तडफड त्याच्या चेहऱ्यावर दिसत असते.

### कापत जाणारे संवाद

दाँतोंच्या तोडचे सवाद तर अक्षरशः आपल्याला कापत जातात. कदाचित दाँतों जे बोलला तेच वाज्दाने तसेच ठेवले असावे. कसबी तिरंदाजाप्रमाणे त्याचे शब्द आपल्या काळजाचा ठाव घेतात त्या शब्दात जशा भावनेचा ओलावा असतो तसेच सत्ताधाऱ्यांना ते ओरबाडणारे असतात. अटक झाल्यानंतर दाँतों आपल्या सहकाऱ्यांना म्हणतो, Better to be guillotined than gullotine.' तेव्हा आपले कान बधिर होतात.

दाँतोंच्या या शब्दाना खरी धार येते ती पोलिटिकल ट्रायलच्या वेळी. या ट्रायलच्या सुरुवातीलाच त्याला प्रश्न विचारण्यात येतो, 'रिपब्लिक नष्ट करण्यासाठी आणि पुन्हा 'मॉनर्की' स्थापन करण्यासाठी फरेन्च लोकांविरुद्ध तू कट केला आहेस का ?' दाँतों आत्मविश्वासाने उत्तर देतो I was republican even under the tyranny.' I shall die

## दहशतवाद की क्रांती

फ्रेंच राज्यक्रांतीच्या संदर्भात वाज्दाने 'दाँतों' हा चित्रपट काढून फटाक्याच्या कारखान्यात बाँब फेकल्यासारखीच गत करून टाकली. फरान्स सरकारच्या सहकार्याने काढण्यात आलेला हा चित्रपट गतवर्षी प्रदर्शित झाला तेव्हा त्यावर बरेच वादळ उठले. फरेंच इतिहाससंशोधकांनी वाज्दाच्या चुका शोधून काढल्या तर हा चित्रपट ज्यांना खऱ्या अर्थाने झोबला त्या कॉम्रेड समीक्षकानी वाज्दावर टीकेची झोड उठविली.

मात्र बऱ्याच समीक्षकांनी वाज्दाच्या या चित्रपटाचे स्वागत केले आणि हे स्वागत करताना काहीनीत्यात समान्तर घटना शोधल्या. फरेंच कम्युनिस्ट पक्षाच्या 'ला हयुमॅनिट' या मुखपत्रात मिचेल् व्हॉवेले हा मार्क्सवादी इतिहासतज्ज्ञ म्हणतो, प्रत्येक क्रातीला सर्वाधिकारशाहीचे व्यक्तिमत्त्व असते, हे ठसविण्यासाठीच या पोलिश दिग्दर्शकाने 'दाँतों' ची पोलिटिकल ट्रायल आणि शिरकाण याचा वापर केला आहे. आपल्या कल्पनाप्रणालीबाबतचा अपराधीपणा लपविण्यासाठी स्टालिनच्या व त्यानतरच्या काळातही रशियात ज्या पद्धतीने विरोधकाची राजकीय चौकशी केली गेली त्याच्याशी या 'ट्रायल' चे साम्य आहे आणि त्याचमुळे काही डाव्या मंडळींना हे खटकणारे आहे !'

जीन फ्रॅक्काइस वेव्हेल नावाच्या समीक्षकाच्या दृष्टीने 'दाँतों' हा चित्रपट म्हणजे सर्वाधिकारशाही व एखाद्या तत्त्वाचे हुकुमशाहीविरुद्ध दाखल केलेले एक सणसणीत आरोपपत्र आहे मास्कोमध्ये १९३६-३८ मध्ये झालेल्या किंवा बुडापेस्ट व प्राग् ( Prague ) येथे शीतयुद्धाच्या काळात झालेल्या 'पोलिटिकल ट्रायल्स'शी समांतर असेच या 'ट्रायल'चे वाज्दाने चित्रण केलेले आहे. रशियात बुखरिनची ज्या पद्धतीने चौकशी झाली त्याचे 'प्रोटोटाइप' ट्रायलमध्ये पहायला मिळते

व्हायलेटी आयव्हर्नी या पॅरिसमधील समीक्षकाने हाच सूर लावला आहे. तो म्हणतो, 'दाँताची निराधार चौकशी, त्यासाठी पडद्याआडून चाललेल्या सूचना व डावपेच, अचानकपणे निर्माण केले गेलेले नवे कायदे, बनावट साक्षीदाराची उलटतपासणी आणि एखाद्या गुन्हेगाराप्रमाणे 'दाँतों' गटाला दिलेली वागणूक– सारं काही रशियात किंवा युरोपातील इतर कम्युनिस्ट देशात झालेल्या, घडलेल्या घटनांशी मिळत–जुळतं आहे, परिचयाचं आहे. वाज्दाचा चित्रपट म्हणजे पूर्वेकडून पाहिलेली फ्रेंच राज्यक्राती असाच आहे. खरं तर त्याने आपल्या चित्रपटाचे नाव 'How it all began' असं ठेवलं असतं तर ते अधिक समर्पक ठरलं असतं.

केवळ फ्रान्समध्येच नव्हे वाज्दाच्या मायदेशात या चित्रपटामुळे खळबळ उडाली. तेथील भूमिगत वृत्तपत्रांनी त्याचे स्वागत केले. त्यातील काहीनी दाँतों–रॉबेस्पिअरच्य ठिकाणी लेक वालेसा–जारुझेलस्की अशी समांतर व्यक्तिमत्त्वे शोधली तर काहीना पॅरिसमध्ये त्या काळी ब्रेडसाठी असलेल्या रांगांमध्ये पोलंडची जनता दिसली. या खळबळीचा व्हायचा तोच परिणाम झाला. 'फार काळ परदेशी वास्तव्य' केल्याचे क्षुल्लक कारण दाखवून पोलिश सरकारच्या सास्कृतिक समितीतून वाज्दाची नुकतीच हकालपट्टी करण्यात आली.

मात्र या सर्व टीका–टिपणीबाबत वाज्दा स्वतः अशा प्रकारची समातरता नाकारतो. (कदाचित पोलंडमधील विचारस्वातंत्र्या (?) त्याला तसे बोलण्यास भाग पाडत असावे. ) मात्र वाज्दा 'सिनेइस्ट या मासिकाला दिलेल्या मुलाखतीत म्हणतो, 'दाँता' ची ट्रायल हाच माझ्या चित्रपटाचा मुख्य गाभा आहे. ही 'ट्रायल' म्हणजे यानतरच्या सर्व 'ट्रायल्स्'चे 'आर्केटाइप' आहे. यानंतरच्या क्रातीचे सुकाणू कळत–न कळत दहशतवादाच्या दिशेने वाहू लागते आणि तिच्या नेत्यांना त्याचा 'नैतिक धोका' माहीत असूनदेखील रॉबेस्पिअरसारखा मध्यम प्रवृत्तीचा राजकारणी काही मूलभूत चुका करतो. हेच कोणत्याही क्रांतीचे दुर्दैव ठरते !' ◻

one' आणि पुढे मग अगदी घसा फुटेस्तोवर दाँतॉं बोलत राहतो त्यात सत्ताधाऱ्याचे वाभाडे काढतो. लोकाच्या भावना व्यक्त करतो आणि स्वत चे चारित्र्य कसे निष्कलक आहे याचे समर्थनही करतो. आपल्यावरील आरोपाचा इन्कार करताना तो अखेरीस म्हणतो, 'My lite, I am weary of it. I Long to be quit of it. Men of my stamp have no price. On their foreheads are stamped ineffaceable characters the seal of liberty the genius of republicanism,'

'गिलोटिन 'खाली दाँतॉंच्या एकेक सहकाऱ्यांचा शिरच्छेद केला जात असतो. त्या दृश्यात अखेर दाँतॉंची वेळ येते त्या वेळी शिरच्छेद करणाऱ्या त्या इसमास दाँतॉं म्हणतो, 'Show my head to the people it is worth while: they do not see the like every day.'

अगदी शेवटच्या क्षणीही तो लोकाना प्रेरित करतो. त्या काळी Support that head' या घोषणेच्या भोवती फ्रासमध्ये पुन्हा राजकीय बडाळी माजली होती.

पण वाज्दाचा दाँतॉं केवळ त्या काळापुरता मर्यादित राहत नाही. स्थलकालाच्या हद्दी भेदून तो पलीकडे बघतो एका व्यापक पातळीवर पोचतो. गेल्या शे-दोनशे वर्षांत जगात विविध देशात क्रात्या झाल्या, स्वातत्र्यलढे झाले. त्यातील काहीचे प्रेरणास्थान असलेल्या फ्रेंच राज्यक्रातीतील हा शोकात्म अनुभव आजच्या काळात वेगळेच सदर्भ घेऊन अधिक व्यापक बनतो.

चित्रपटात 'ट्रायल 'च्या सुरुवातीस दाँतॉंला त्याचे नाव विचारतात तेव्हा दाँतॉं त्याचे प्रसिद्ध उत्तर देतो, 'My abode will soon be nothiness. As for my name you will find it in the pantheon of history.' दाँतॉंचे हे भाकित केवळ त्यांच्यापुरते खरे ठरलेले नाही तर त्याची शोकात्मिका आजही विविध क्रातिकारकामध्ये सापडते.

### आजचे प्रश्न

दाँतॉंचा शेवट शोकात्मच का? कारण तो लोकप्रिय असतो. तो वृत्तपत्रस्वातंत्र्याचे समर्थन करतो. लोकमताच्या गिलोटीनला मानणारा असतो. दहशतवादाच्या तो विरुद्ध असतो आणि म्हणूनच त्याला मृत्यु अटळ असतो. प्रत्येक क्रांतीनतर असेच घडते का? दाँतॉंचा वारसा चालविणारे क्रांतिकारक असेच बळी पडतात का? आणि क्रातीलाही काही कालानतर 'सर्वाधिकारशाही 'चं स्वरूप प्राप्त होते का? क्रांतीनतरचा धोका टाळण्यासाठी 'हिंसात्मक' पवित्राच घ्यावा लागतो का? एकेकाळी खाद्याला खादा देऊन क्रातीसाठी झटणारे ते दोघे असे एकमेकाविरुद्ध का लढतात? त्याच्यात समझोता का होऊ शकत नाही? प्रत्येक क्रातीनंतर अशी परिस्थिती निर्माण होते का? आणि होत असल्यास दडपशाहीनेच हे प्रश्न सुटतात का? अशासारखे अगदी आजचे, गुतागुतीचे व्यापक प्रश्न वाज्दा यांचा 'दाँतॉं' कळत-नकळत उपस्थित करतो.

वाज्दा हे केवळ कलात्मकतेचा टेंभा मिरविणारे पोलिश दिग्दर्शक नाहीत तर त्यांच्या याआधीच्या जवळजवळ सर्वच चित्रपटांना पोलडमधील राजकीय परिस्थितीचा आधार आहे. विशेषत: गेल्या दोन-तीन वर्षांतील त्याचे 'मॅन ऑफ मार्बल' व मॅन ऑफ आयर्न' हे चित्रपट पोलंडमधील क्रातीनंतर झालेल्या सामूहिक असंतोषाबद्दलचे आहेत. 'मॅन ऑफ आयर्न' तर अलीकडेच लेच वालेका याच्या नेतृत्वाखाली झालेल्या 'सॉलिडॅरिटी' चळवळीच्या पार्श्वभूमीवर तयार करण्यात आला आहे. शिवाय वाज्दा हे या चळवळीचे क्रियाशील सदस्य आहेत.

पोलंडमध्ये गेली दोन वर्षे चाललेली 'सॉलिडॅरिटी' चळवळ, तिच्या मागण्या, वृत्तपत्र व राजकीय मतस्वातंत्र्याचा आग्रह व या चळवळीला दडपण्यासाठी पोलडच्या जारुझेलस्की सरकारने केलेली दडपशाही, या पार्श्वभूमीवर वाज्दा 'दाँतॉं' च्या व्यक्तिमत्त्वाकडे आकर्षित होतात आणि त्यावर चित्रपट काढतात तेव्हा केवळ एक 'ऐतिहासिक दस्तऐवज' निर्माण करण्याचा त्याचा मनसुबा नाही हे निश्चितच स्पष्टपणे दिसते.

म्हणूनच या पार्श्वभूमीवर केवळ आतरराष्ट्रीय सिनेमाच्या व्यासपीठावर नव्हे तर खुद्द फ्रान्स व पोलंडमध्ये वाज्दा याचा हा चित्रपट वादग्रस्त ठरला आहे. 'माझे सिनेमे म्हणजे मी स्वीकारलेली एक पळवाट आहे' असे म्हणणाऱ्या वाज्दा यांनी 'दाँतॉं' ला रुपेरी पडद्यावर सादर करून पोलंडमधील लाल यंत्रणेवर नेमका आघात केला आहे. 'दाँतॉं' तसा दरएक क्राती झालेल्या देशातील परिस्थितीचा निकष नाही तसेच तो क्रांती-विरोधीही नाही, तर क्रातीनतरही डोके वर काढणाऱ्या सत्तापिपासू, स्वार्थी, दहशतवादी, बिनकाळजाच्या राजकीय यत्रणेविरुद्ध आहे. म्हणूनच हा चित्रपट अगदी आजचा आहे!

—सतीश जकातदार

हे पुस्तक प्रभावी आहे यात शंका नाही. विचार करणाऱ्या माणसाचे लक्ष ग्रामीण समस्याकडे वेधून घेण्याची फार मोठी कामगिरी हे पुस्तक करीत आहे.

—डॉ. स ह. देशपांडे
अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद

**श्रीग्रामायन**

लेखक : श्री. ग. माजगावकर
( दुसरी आवृत्ती )
मूल्य पंचवीस रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३.

# भारतीय संसदेची ढासळणारी प्रतिष्ठा

प्रा. भूषणकुमार जोरगुलवार

भारतात दिवसेंदिवस संसदेची प्रतिष्ठा ढासळत आहे. तिचे महत्त्व कमी होत आहे. देशाची राजकीय संस्कृती निर्माण करणारी आणि घडवणारी एक संस्था म्हणून संसदेकडे बघितले जाते. या पार्श्वभमीवर जेव्हा आपण आपल्या संसदेकडे पहातो तेव्हा फार निराशाजनक चित्र आपल्यात दिसते. आजची संसदेतील वागणूक हीन, असभ्य आणि असंस्कृत होत चालली आहे. गेल्या पिढीने निर्माण केलेल्या साऱ्याच उज्ज्वल संकेतांची व परपरांची सर्रासपणे पायमल्ली होत आहे. लोकशाही-विघातक घटना घडवणारे सत्तारूढ पक्षाचे बेजबाबदार सभासद, त्यांच्या कार्यवाहीकडे दुर्लक्ष करून त्याना पाठीशी घालणारे पंतप्रधान, आपल्या असंघटित दुबळ्या शक्तीने प्रतिकार करणारे विरोधी पक्षीय सदस्य व क्षमाशील मतदार हे सारेच लोकशाहीचे मारेकरी सिद्ध होत आहेत.

याबाबतीत गंभीर विचार केल्यास जे जाणवते ते म्हणजे, संसद ह्या लोकशाहीचा तेजस्वी कळस राहिला नसून त्याचे रंग आता विटू लागले आहेत. ठराविक चाकोरीबद्ध पद्धतीने दर वेळी अधिवेशने पार पडत असून महत्त्वाच्या धोरणांची चर्चा, निर्णयांचे दिशादर्शन त्यात होतच नाही. एकूणच ससदेचा प्रभाव कमी होत आहे. तिचे तेज लोप पावू लागले आहे. सामान्यपणे संस्कृतीच्या ज्या तीन अवस्था असतात–उदय, उन्नती आणि ऱ्हास, त्यापैकी उन्नती ही जी मधली अवस्था आहे त्यास संस्कृतीचा सुवर्णकाळ असे आपण संबोधतो. संस्कृतीसारखीच, एखाद्या व्यक्तीची, देशाची वा शासनसंस्थेची विभागणी तीन अवस्थांमध्ये करता येते. या संदर्भात आपल्या संसदेचा विचार केल्यास असे दिसून येते की, तिच्या पहिल्या दोनही अवस्था अत्यल्प काळात लोप पावल्या आहेत. इंग्लंडच्या पार्श्वभूमीवर येथील संसदेचे चिकित्सक सिंहावलोकन केल्यानंतर आपण अशा निष्कर्षावर येतो की, तिन्ही अवस्थातील उन्नतीचा काळ म्हणजेच सुवर्णकाळ कधी आपल्याकडे आलाच नाही !

दीर्घकाळ चाललेल्या स्वातंत्र्यचळवळीने देशात महान त्यागी व निःस्वार्थी व्यक्तींची फार मोठी परंपरा निर्माण केली. १९५१ ते १९६२ या दशकातील सत्तारूढ व विरोधी पक्षातील संसदसदस्यांकडे दृष्टिक्षेप टाकल्यास असे जाणवते की, ते महान राजकीय योद्धे होते. सत्तारूढ पक्षातील काही ठळक नावे घ्यायची झाल्यास पंडित नेहरू, सी. डी. देशमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गोविंद वल्लभपंत वगैरेंची नावे जितक्या अभिमानाने घेता येतील तितक्याच अभिमानाने विरोधी पक्षातील नेत्यांचीही नावे घेता येतील. उदा. डॉ. राममनोहर लोहिया, बॅ. नाथ पै, हिरेण्य मुखर्जी, मिनू मसानी, आचार्य कृपलानी, एच. व्ही. कामथ वगैरे. या पार्श्वभूमीवर आजच्या संसद-सदस्यांकडे पाहिल्यास असे वाटते की; सत्तारूढ पक्षाचे की विरोधी पक्षाचे, दोन्ही सदस्यानी आपल्या माजी सदस्यांची जागा खऱ्या अर्थाने भरून काढलेली नाही. याचे एक महत्त्वाचे कारण असे जाणवते की, सदस्यांच्या निवडणूकतिकिटांचे वाटप करताना उमेदवाराच्या सचोटीचा विचार न करता त्याच्या जातीचा, धर्माचा, आर्थिक परिस्थितीचा व पक्षनेत्यावरील निष्ठेचाच फार मोठ्या प्रमाणात विचार केला जातो. त्यामुळे अपात्र माणसाच्या हातात निवडून येण्याचा हुकमी एक्का तिकिटाच्या स्वरूपात पडतो. याचा परिणाम असा होतो की; हे लाख मोलाचे ससदेतील एकेक सदस्य, लाखो लोकांचे एकेक प्रतिनिधी (कायद्याने एका खासदाराला निवडणुकीत प्रचारासाठी एक लाख रुपये खर्च करण्याची मुभा आहे व एकेक खासदार साधारणपणे ७ ते १० लाख लोकाचे प्रतिनिधित्व करतो.) ज्या पद्धतीने सभागृहात वागतात, बोलतात आणि कामकाजात भाग घेतात ते पाहिल्यानतर असे वाटते की, नेहरूंच्या काळातील हीच का ती ससद ?

संसदेच्या औचित्याचा ऊहापोह अलीकडेच राजधानीत एका परिसंवादात झाला. इंदिरा काँग्रेसच्या वतीने मंत्री एन. के. पी. साळवी व रामनिवास मिर्धा, जनता पक्षाच्या वतीने मधु दडवते, जनवादी पक्षाच्या वतीने चंद्रजित यादव, लोकसभेचे माजी सचिव श्यामलाल शकधर व प्रख्यात वकील एल. एम. सिंघवी यांनी या परिसवादात भाग घेतला. या प्रसंगी बोलताना मधु दंडवते आणि चंद्रजित यादव यांनी असे सागितले की, संसदेत महात्त्वाच्या चर्चेच्या वेळी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी उपस्थित राहात नाहीत. यावरून त्यांना संसदेबद्दल किती आदर आहे हे स्पष्ट होते. पंडित नेहरू संसदेत दररोज सकाळी ११ ते दुपारी १ पर्यंत उपस्थित राहात. जेव्हा त्याना असे विचारण्यात आले की, ' तुम्ही कशासाठी एवढा वेळ देता ?' तेव्हा त्यांनी दिलेले उत्तर मोठे जबाबदारपूर्ण आहे. ते म्हणाले, ' संसदेच्या म्हणजेच पर्यायाने देशाच्याच नाडीचा मला अनुभव घ्यावयाचा असतो !'

पूर्वीचे संसदसदस्य स्वातंत्र्यसंग्रामाच्या अग्निदिव्यातून बाहेर आलेले होते. या प्रतिभावंतानी पवित्र उद्देशाने संसदेत प्रवेश केला होता. त्यांची भाषणे अत्यत ओजस्वी व अभ्यासपूर्ण असत. तर्कशुद्ध पद्धतीने ते आपली मते माडीत. मत्सरविरहित व परस्पर आदरयुक्त त्यांचे हल्ले व प्रतिहल्ले होत असत. कामकाजात सहभागी होताना विरोधी सदस्यांनासुद्धा समान सधी उपलब्ध होत असे. संसदेत विचार व्यक्त करताना परमतसहिष्णुतेची भावना दोन्ही बाजूच्या सदस्यांमध्ये दिसून येत असे. नेहरूंच्या काळात सत्तारूढ पक्षाच्या

कोणत्याही सदस्याने विरोधी सदस्याच्या भाषणात अडथळे आणलेली उदाहरणे सापडत नाहीत. स्वत: नेहरू विरोधी सदस्यांची भाषणे लक्षपूर्वक ऐकत, प्रसंगी आवश्यक त्या नोंदीसुद्धा घेत. एवढेच नव्हे तर सल्लामसलतीसाठी अधिवेशन चालू असताना संसदेत विरोधी सदस्याच्या जवळ काही काळ बसत. अशाच एका प्रसंगी नेहरू बराच काळ विरोधी पक्षाच्या बाकावर बसलेले बघून खा.श्री.एच.व्ही. कामथ यानी, पंतप्रधानांनी पक्ष बदलल्याची कल्पना सभागृहाला न दिल्यामुळे आश्चर्य व्यक्त करून सभापतींना प्रश्न केला होता. तेव्हा नेहरू गडबडीने फायली सांभाळीत या विनोदावर दिलखुलासपणे हसत आपल्या जागेवर जाऊन बसले. अशा प्रकारचे खेळीमेळीचे वातावरण संसदेतून लुप्त झालेले आपल्याला जाणवते. विरोधी पक्षीयांशी सल्लामसलत तर दूरच, स्वपक्षीयांशी तरी सल्लामसलत केली जाते की नाही शंकाच आहे.

## ४० मिनिटे नुसता गोंधळ !

आज संसदेतील नवीन सदस्य जुन्या सदस्यांच्या तुलनेत शैक्षणिकदृष्ट्या अधिक शिकलेले आहेत; पण काही अपवाद वगळता राजकीयदृष्ट्या सुसंस्कृत नाहीत. श्रीमती तारकेश्वरी सिन्हा यानी म्हटल्याप्रमाणे याचा शब्दसंग्रह 'हा हू' पर्यंतच मर्यादित आहे. परमतसहिष्णुता याच्यातून पूर्णपणे लोप पावलेली दिसून येते. एका अधिवेशनात प्रतिष्ठान प्रकरणावर खा. मधु दंडवते शाब्दिक प्रहार करीत असताना तरुण खासदार श्री. जगदीश टायटलर त्यांची मते नीट न ऐकून घेताच सतत आरडाओरडा करून अडथळा आणीत होते. अनुभवी व चाणाक्ष दंडवतेंच्या जेव्हा हे लक्षात आले तेव्हा त्यांनी अत्यंत खिलाडूपणाने आपल्या उथळ सहकाऱ्याचे पितळ उघडे पाडले. त्यांनी आपले भाषण मध्येच थांबवून सभापतींना विनंती केली की, 'मी माझ्या तरुण सहकाऱ्याला आपले मत मांडण्याची संधी देतो.' चर्चा कोणत्या मुद्द्यावर व कोणत्या दिशेने चालू होती याची जाणीव नसलेल्या टायटलरची मोठी केविलवाणी अवस्था झाली. खासदार टायटलर यांनी संसदेत प्रवेश करताना 'मंदिरासारख्या पवित्र असलेल्या श्रेष्ठ संस्थेत प्रवेश करीत आहे.' असे उद्गार काढले होते. विचार आणि आचार यातील विसंगती हे आजच्या खासदारांचे वैशिष्ट्य यावरून लक्षात येते.

अधिवेशनकाळात आरडाओरडा, गोंधळ, कामात व्यत्यय, सभात्याग, असंसदीय शब्दांचा सर्रास वापर या गोष्टी आता नित्याच्याच झालेल्या आहेत. जनतेचे प्रतिनिधी या नात्याने आपण जबाबदारीने वागले पाहिजे ही वृत्ती हळूहळू नाहीशी होत चालली आहे. २४ जुलै १९८० रोजी 'विरोधक बलात्काराचे राजकीय भांडवल करीत आहेत.' या पंतप्रधानांच्या विधानामुळे राज्यसभेत ४० मिनिटे गोंधळ चालू होता. लोकसभेतही अर्धा तास गोंधळ झाला. सभासदांनी शांत व्हावे यासाठी सभापतींनी खूप सांगून पाहिले; पण उपयोग होईना ! शेवटी ते म्हणाले की, 'आपले प्रतिनिधी कसे वागत आहेत हे एकदा मतदारांनी पहायलाच हवे. या आपल्या वर्तनाबद्दल मतदार आपल्याला क्षमा करणार नाहीत.' ३ ऑगस्ट १९८० रोजी लोकसभेच्या सभापतींनी भोपाळ येथे भाषण करताना म्हटले की, 'लोकसभेत आणि राज्यविधिमंडळात अलीकडे कामकाजाचा दर्जा घसरत चालल्याबद्दल अनेक लोकांनी माझ्याकडे पत्रे पाठवून चिंता व्यक्त केली आहे. लोकसभेत बेशिस्तीचे जे प्रकार होतात ते पाहून तर लोकांना उद्वेग आलेला आहे लोकप्रतिनिधींनी लवकरच या वर्तनाला आळा घातला नाही तर लोकशाहीच धोक्यात येईल.' ऑगस्ट १९८० च्या पहिल्या सप्ताहात लोकसभेत झालेल्या अपूर्व गोंधळामुळे सभापती सभासदांना उद्देशून काय म्हणाले ते 'पेट्रियट'मध्ये पुढीलप्रमाणे दिले आहे. 'अशा तऱ्हेचा आरडाओरडा तुम्हाला शोभत नाही. तुम्ही जबाबदारीचे थोडे तरी भान ठेवा. स्वत:वर थोडे तरी नियंत्रण ठेवा, थोडा तरी शहाणपणा दाखवा. अशा प्रकारे वागणे हे सभागृहाची अपप्रतिष्ठा करणारे आहे !' या प्रसंगाची माहिती 'हिंदुस्थान टाइम्स'मध्ये पुढीलप्रमाणे होती. 'हे तुमचे बेजबाबदार वर्तन किती काळ चालणार आहे ? या सभागृहाने कामकाजासंबंधी जी नियमावली तयार केली तिचा या सभागृहातच भंग व्हावा हे खेदजनक आहे. तुमचे वर्तन असंस्कृत आहे.' संसदेत वारंवार होणाऱ्या गोंधळाबाबतची तीव्र नापसंती अनेक समंजस सभासदांनी व्यक्त केली आहे. राज्यसभेचे सभासद श्री. खुशवंतसिंग यानी राज्यसभेत स्वत: जे पाहिले त्यासंबंधी ते लिहितात. 'एकमेकावर ओरडावे आणि भांडावे यासाठीच का आपण या विदूषकांना त्या महनीय सभागृहावर निवडून दिले ? असे लोक रास्तपणे विचारू शकतील.'

जनता पक्षाच्या राजवटीत तत्कालीन लोकसभा सभापती श्री. के. एस. हेगडे यांनी सांगितले होते की, लोकसभेच्या बैठकीच्या एका सेकंदासाठी देशाचे ९००/– रुपये खर्च होतात ! गेल्या पाच–सहा वर्षांत किंमती वाढलेल्या आहेत म्हणजे आता हा खर्च दर सेकंदाला एक हजार रुपयांपेक्षा जास्तच होत असेल. या संदर्भात खरी अडचणीची बाब म्हणजे मतदार लोकप्रतिनिधींना सतत क्षमाच करीत आलेले आहेत. लोकप्रतिनिधींच्या बेजबाबदार वर्तनामुळे आपल्या देशाचा किती पैसा बरबाद होतो याचा हिशेब न करणेच बरे. अर्थात अशा प्रकारच्या वर्तनाच्या संदर्भात पैशाचा मुद्दा सर्वात गौण ठरतो. इतर गोष्टी अधिक महत्त्वाच्या आहेत. मुख्य म्हणजे लोकप्रतिनिधींकडून होत असलेला अधिकारांचा दिवसेंदिवस अधिकाधिक दुरुपयोग होत चालला आहे. सभागृहात प्रत्यक्ष काय चालले आहे हे निर्भीडपणे छापण्यासाठी आजही वृत्तपत्रे कचरतातच

*With Best Compliments from*

**RAM ELECTRICALS**

**Station Road, MIRAJ**

लोकप्रतिनिधींच्या तोंडून उच्चारले गेलेले अभद्र शब्द कामकाजाच्या वृत्तातातून गाळून टाकतात. त्यामुळे तेथे कोणत्या पातळीवरची भाषा वापरली जाते हे मतदारांना कळत नाही. आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे आपले हे लोकप्रतिनिधी भांडणाच्या दरम्यानच्या वेळात कायदे मंजूर करीत असतात. असे कायदे की जे तुमच्या आणि माझ्या जीवनावर परिणाम करतात.

स्वातंत्र्य–चळवळीच्या काळात व स्वातंत्र्योत्तर एक दशकापर्यंत व्यक्ती राजकारणात पडणे याला पवित्र असा एक अर्थ प्राप्त झालेला होता. त्याभोवती राष्ट्रसेवा व राष्ट्रभक्तीचे वलय निर्माण झालेले होते. परंतु आज एखादी व्यक्ती राजकारणात पडणे याला वेगळाच अर्थ प्राप्त झालेला आहे. पूर्वीचे राष्ट्रसेवा व राष्ट्रभक्तीचे वलय नाहीसे झाले आहे. एकदंरीत या देशातील निवडणुका व त्या लढवण्याची विकसित झालेली पद्धती लक्षात घेतल्यास सामान्यपणे विद्वान व्यक्तींना त्यात काही वाव आहे असे वाटत नाही यामुळे आपण होऊनच ही मंडळी निवडणुकी व घाणेरड्या राजकारणापासून दूर जात आहेत त्यामुळे धंदेवाईक राजकारणी लोकांचे फावत आहे त्याचाच भरणा फार मोठ्या प्रमाणात या क्षेत्रात दिसून येत आहे. समाजात वेगवेगळ्या व्यक्ती ज्याप्रमाणे उदरनिर्वाहासाठी वेगवेगळे व्यवसाय निवडतात त्याप्रमाणे समाजातील एक विशिष्ट गट आपली पात्रता असो की नसो, राजकारण हा आपला व्यवसाय म्हणून निवडीत आहे व त्यामुळे प्रत्येक येणाऱ्या निवडणुकीत ठराविक मंडळीच निवडणूक–रिंगणात दिसतात, निवडून येतात, सत्तास्थाने उपभोगतात. प्रसंगी पडतात. त्यामुळे अत्यंत सामान्य कुवतीची माणसे संसद व विधिमंडळावर निवडून जातात. म्हणूनच तर स्वतःला लोकप्रतिनिधी म्हणवून घेणाऱ्यांना सेनापती बापट कोण याची कल्पना नसते तर मोहसिना महमद किडवई व गायक महमद रफी यांच्यातील फरकही समजत नसतो !

## उन्नतीपूर्वीच ऱ्हास

संसदेत फार मोठ्या प्रमाणात होयबाची भरती करण्यावर सत्तारूढ नेत्यांचा भर असतो. सत्तारूढ पक्षाचे सदस्य आपल्या नेत्यावर दडपण आणू शकतील व काही अंशी नियंत्रण ठेवू शकतील अशी परिस्थिती आज राहिलेली नाही. उलट प्रत्येक सभासद आपापल्या परीने नेत्यांना खूष ठेवण्याचे प्रयत्न करतो, नव्हे या क्षेत्रातील इतरांनी प्रस्थापित केलेले उच्चांक मोडण्याच्या स्पर्धेत तो उतरतो. ज्या देशाचा खुद्द राष्ट्रपती 'पंतप्रधान इंदिरा गांधींनी झाडू मारण्याचे आदेश दिल्यास मी आनंदाने झाडू मारेन.' असं म्हणतो तिथे खासदाराची काय कथा ?

अशा सामान्य कुवतीच्या सदस्यांची अधिवेशनकाळातील संसदेतील उपस्थितीसुद्धा जेमतेमच असते. या संदर्भात सत्तारूढ व विरोधी सदस्य दोघेही जबाबदार आहेत. त्यामुळे सर्वांनाच चर्चेत कितपत स्वारस्य आहे असा प्रश्न पडतो. शून्य प्रहर संपला की, मग संसदेची उभय सभागृहे ओस पडतात. बऱ्याच वेळा जेवढे वक्ते असतात तेवढेच श्रोते असतात. गेल्या पावसाळी अधिवेशनात लोकसभेत वाढत्या किंमतीबाबत चर्चा होती. एकूण खासदार उपस्थित होते अवघे १८ ! स्वराज्य पॉल यांच्या विषयावर चर्चा सुरू झाली तेव्हा एकूण खासदार उपस्थित होते ६३ व शेवटी हळूहळू कमी होऊन २६ झाले सध्या संसदेत एकूण अर्थसंकल्पाच्या फक्त १३% मागण्यांवर चर्चा होते. कोटयवधी रुपयांच्या अर्थसंकल्पीय तरतुदी तशाच मंजूर होतात व त्याही गणपूर्तीपेक्षा कमी म्हणजे १० ते १५ सदस्यांच्या उपस्थितीत! सभागृहातच नव्हे तर संसदीय सल्लागार समित्यातही अनुपस्थितीचे प्रमाण अनेकदा मोठे असते. संसदेत गणपूर्तीसाठी १०% सदस्य उपस्थित असावे लागतात. त्यापैकी कमी सदस्य हजर असले तरी जोवर कोणी गणपूर्ती नाही असा मुद्दा सभापतीपुढे उपस्थित करीत नाही तोपर्यंत कामकाज चालू राहाते. तेव्हा फार कमी सदस्य उपस्थित असले तरी गणपूर्तीचा विषय सहसा कोणीच उपस्थित करीत नाही गेल्या पावसाळी अधिवेशनात बेकायदेशीर शस्त्रास्त्रे दुरुस्ती विधेयक चर्चेस आले तेव्हा गमतच झाली. सभागृहात गणपूर्ती नव्हती. तेव्हा धनबादचे अपक्ष सदस्य श्री. ए के. रॉय यानी आक्षेप घेतला. त्यावर तुम्ही असा आक्षेप घेऊ नका अशी त्याना इतर सदस्यांनी, खुद्द सभापतींनी व एका कॅबिनेट मंत्र्यांनीही विनंती केली. त्या वेळी रॉय म्हणाले, 'सभागृहाबाहेर नाही तरी निदान सभागृहात तरी कायद्याचे राज्य चालावे !'

देशातील सामान्य माणसाला ज्या खासदाराना आपण निवडून दिले ते संसदेत कोणत्या पद्धतीने कामकाज करतात याची प्रत्यक्षात कल्पना नसते. संसदेतील प्रोसिडिंग चाळले तर असे दिसून येते की, कित्येक खासदार असे आहेत ज्यानी आपल्या सबंध कार्यकालात एकदाही संसदेच्या कामकाजानिमित्त वक्तव्य केलेले नाही किंवा चर्चेत भाग घेतलेला नाही ! बॅक बेंचर्सची उपाधी कित्येक सदस्य मोठ्या अभिमानाने संसदेत मिरवतात. संसदेनील कामकाजाच्या नियमांची बहुसंख्य खासदाराना तोंडओळख देखील नसते व ओळख करून घेण्याची त्यांना आवश्यकताही वाटत नाही. कारण आपले नेते एखाद्या ठरावावरील वा विधेयकावरील मतदानाच्या वेळी हात वर करतात का खाली हे पाहून त्याचे अंधानुकरण करण्यापलीकडे त्याचा सक्रिय सहभाग नसतो. काही सदस्य तर आपले श्रेष्ठी हसत असतील तर आपणही कारण लक्षात न घेता हसतात व ते जर गंभीर मुद्रेने बसले असतील तर स्वतःही गंभीर मुद्रा करून बसतात. आपल्या नेत्याच्या हालचालीबरहुकूम वागण्याची ज्यांनी सवय लावून घेतली आहे तिथे संसदेतील कामकाजाच्या नियमांच्या अभ्यासाची गरज उरतेच कुठे ?

आज देशात सर्वत्र आकाशवाणीचा प्रसार झालेला आहेच; पण मोठ्या प्रमाणात दूरचित्रवाणी–क्षेत्राचाही विस्तार होत आहे तेव्हा प्रत्येक अधिवेशन हे दूरचित्रवाणीवरून संपूर्ण देशाला दाखवले पाहिजे क्रिकेटच्या कॉमेन्ट्रीसारखे सतत संसदेतील कामकाजाचे प्रत्यक्ष वर्णन आकाशवाणीवरून प्रसारित केले पाहिजे. त्यामुळे आपण निवडून दिलेले प्रतिनिधी कोणत्या पद्धतीने व किती जबाबदारीने आपले कामकाज पार पाडतात व देशातील सर्वश्रेष्ठ अशा संसदसंस्थेची प्रतिष्ठा कशी काय राखतात हे या देशातील सामान्य लोकाना (ज्यांना हे खासदार जबाबदार आहेत) जवळून बघायला मिळेल; पण एवढे नैतिक धैर्य त्यांच्याकडे आहे असे वाटत नाही.

एकंदरीत या संसदेची प्रतिष्ठा फार मोठ्या प्रमाणात ढासळत असलेली आपल्याला जाणवते आहे ही प्रतिष्ठा सावरण्याच्या दृष्टीने सर्व पातळीवरून हालचाली जितक्या लवकर होतील तितके आवश्यक आहे. आज इंग्लंडमधील संसदेची प्रतिष्ठासुद्धा पूर्वीसारखी राहिलेली नाही; परंतु त्याना किमान एवढे तरी समाधान आहे की, संसदेच्या सुवर्णकाळाच्या सुमारे शंभर वर्षांनंतर ऱ्हासाला सुरुवात झाली; पण आपले दुर्दैव असे की, म्हणावा असा सुवर्णकाळ आपल्या संसदेच्या गेल्या तीस–पस्तीस वर्षांत निर्माण झालेलाच नाही. उलट लवकरच ऱ्हासाला सुरुवात झाली! उदयानंतर उन्नतीचा काळ येण्याआधीच ऱ्हासाला सुरुवात झाली. देशाचे धोरण ठरविण्यात संसदेचा मोठा वाटा असला पाहिजे ही प्रभावी भूमिका पार पाडण्यासाठी काय करता येईल याचा सर्वच घटकानी सखोल विचार करण्याची वेळ आलेली आहे ! □

# यात्रा आणि दिंडी – दोन अनुभव

## गंगाखेड–निलंग तालुका

रचनात्मक संघर्ष समिती व ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठानच्या वतीने गंगाखेड व निलंगा तालुक्यात ग्रामीण महिला प्रबोधन भ्रमण-यात्रा काढली होती. महिलांच्या समस्या, सामाजिक कुरीती, दुष्ट परंपरा, अज्ञान व अंधश्रद्धा याच्या निर्मूलनासाठी ग्रामीण महिलांचा व्यापक सहभाग असणे आवश्यक आहे. तसेच आज समाज पुरुषप्रधान आहे म्हणून स्त्री एक उपभोगाची, वासनापूर्तीची व आर्थिक उत्पादनास कारणीभूत ठरणारी वस्तू म्हणून पाहिली जाते. या पुरुषी दृष्टि-कोनाचेसुद्धा निर्मूलन होणे आवश्यक आहे. या दोन समस्याचे प्रबोधन व्हावे व स्त्री-पुरुष-सहजीवनासाठी जाणीव-जागृति होऊन महिलामुक्तीचा हा लढा सामान्य जनापर्यंत पोहोचवावा, या हेतूने ही भ्रमणयात्रा काढली होती.

निलगा तालुक्यातील केळगाव या गावी 'गोरीबी' वय १७ या मुस्लिम नवविवा-हित तरुणीचा गळा दाबून, तोंडात बोळे घालून, खून करण्यात आला व तिचे प्रेत दोन दिवस घरी ठेवले होते. नतर तिसऱ्या दिवशी ते प्रेत विहिरीत टाकण्यात आले. मुलीचे माहेर त्याच गावचे. नवऱ्याने बायको बेपत्ता झाली असे वडिलांना सांगितले. त्यानी पोलीसस्टेशन गगाखेडला फिर्याद दिली. पोलिसांनी प्रेत शोधून काढून 'आत्म-हत्या' म्हणून केस नोंदविली. नंतर रचना-त्मक संघर्ष समितीच्या व ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी गावात जाऊन भेट देऊन चौकशीसाठी आवाज उठविला, तेव्हा आत्महत्येस जबाबदार म्हणून नवरा व सासू यांना पोलिसांनी अटक केली. बऱ्या-चशा नवविवाहित वधू, स्त्रिया या हुंड्याच्या दुष्ट परपरेमुळे त्रास भोगत आहेत. त्यांना सासू, नवरा, नणंद यांच्याकडून त्रास, जाच, टोचून बोलणे सहन करावे लागते.

आनंदवाडीमधील वडारवस्तीमध्ये स्त्री अनौपचारिक वर्ग चालू असतो. तेथील दलित मुलीस सहा महिन्यांपासून नवरा नादवत नाही. कारण काय तर लग्नात बोललेला पलंग मिळाला नाही म्हणून. तीही मुलगी या वर्गाला येते. हळूहळू शिक्षणाचे महत्त्व वाढते आहे.

अजनी येथील दलित महिला दोरखंड तयार करण्याच्या कामी पटाईत आहेत; पण 'पत' नाही, भांडवल नाही व बँकापण कर्ज देण्यास तयार नाहीत आणि सोबत मार्केटही नाही. चर्चा करून, इंडिया बँकेतर्फे (शाखा शिरूर अनतपाळ) कर्ज मिळवून द्यावयाची व्यवस्था केली. बैठकीत फक्त सास्वाच जमा झाल्या होत्या. सुना बोलावून आणा म्हटल्याबरोबर आढेवेढे घेत कुज-बुज करीत त्यानी त्याना अक्षरशः बोलावून आणले. आम्ही त्यांना आरोग्यशिक्षणाबाबत माहिती सांगितली. बुजरुकवाडी येथील वडारवस्तीतील स्त्रियामध्ये गेलो. त्या गाडी-मागे घोडे काढत, खडी फोडत जातात वा गायरानाला कामाला जातात. त्याच्या वस्तीवर लाइट नाही. पिण्याचे पाणी नाही. या प्रश्नावर मोर्चा काढून प्रश्न मिटविण्याचे ठरले. नवरा घरीदारी पिऊन मारहाण करतो. त्याच वेळेस आम्ही सांगितले की, 'आपणास दोन्ही बाजूनी झगडावे लागेल. नवरा दारू पिऊन आला तर सरळ थडीमध्ये झोपू द्या!' सल्ला पटला किंवा नाही हे काही सांगता आले नाही.

हलगरा येथे कैकाडी जमातीच्या वस्ती-वर गेलो. या वस्तीमधील महिलांनी आज-पर्यंत मतदान केले नाही. तीन–चार महिन्या-पासून ते तिथे स्थायिक झाले. ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठानच्या व रचनात्मक संघर्षसमि-तीच्या सहकार्याने त्यांनी टोपली विणणारी सहकारी संस्था काढलीय. त्यांना आवश्यक तो माल मिळत नाही. कासारशिर्सी येथे कॉलेजच्या मुलीसोबत चर्चा केली व औसा येथे सर्व स्तरातील महिलाची बैठक होती. बैठकीला सौ. चौधरी, 'मानवलोक'च्या शैला लोहीया व अरुणा तायडे आल्या होत्या. एकंदरीत निलंगा तालुक्यामध्ये अभियांत्रिकी व तंत्रनिकेतन तसेच D farmary कॉलेज आहे. विकासाच्या नावावर प्रचंड पैसा खर्च होतो आहे. दुसरीकडे स्त्रिया! दलित भटक्या जमातीतील स्त्रिया दारिद्र्यामुळे, अज्ञानामुळे आणि पुरुषी वर्चस्वामुळे पिचत आहेत!

दि. १४।१२।८३ ते २२।१२।८३ या काळात गंगाखेड तालुक्यामध्ये भ्रमणयात्रा काढण्यात आली. गंगाखेड तालुका हा मुळा-तच मागासवर्गीय तालुका आहे. विकासाची वा शिक्षणाची कुठलीही भरीव योजना अद्यापपर्यंत या तालुक्यात आली नाही. जमीनदारी आणि सरंजामशाही याचे वर्चस्व फारच आहे.

'केरवाडी' 'शेकाप' चा बालेकिल्ला. तिथे मागवस्तीमध्ये बालवाडी चालते. सर्व स्त्रिया जमल्या. प्रथम कोणी बोलायलाच तयार नाही. सावित्रीबाईविषयी माहिती सागितली. नतर त्या बोलू लागल्या कोणी म्हणते हापसा बिघडला, आम्हाला काम नाही; पण कोणी आमचा नवरा मारतो असे म्हणत नाही; एका स्त्रीने सागितले, आपल्या नवऱ्याचे आपण काय सांगावे? तिला नीट सागितले शेवटी राजाराम व हापसा यासबंधी माहिती सांगून तहसिल-दारांना निवेदन पाठवून दिले. ऐनवाडी येथे गायरान अतिक्रमण केल्यामुळे वातावरण तग आहे. पुरुष कामासाठी वा अन्य गोष्टीसाठी बाहेर पडतात. मार सर्व स्त्रियाना सहन करावा लागतो. मरडजगाव येथे तेथील सरपच सखाराम साबळे यानी स्वतः प्रयत्न करून महिला प्रबोधनासाठी पुरुषाची बैठक घेतली, त्यात बऱ्याच पुरुषानी येथे महिला मंडळ स्थापन करा असा आग्रह धरला. मरडजगाव येथे काही ठिकाणी बुरखापद्धत आहे. त्या-नंतर सौ. सुशीलाबाई कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली महिला सभा घेतली. सायाळा येथे मुस्लिम समाजाचा भरणा जास्त होता. तदनंतर तेथे मुस्लिम गरीब स्त्रिया जमल्या. श्रीमन्त स्त्रिया बुरख्यामध्ये होत्या.

राजूर हे गंगेच्या काठचे गाव. वडूरही

त्याप्रमाणेच. दोन्हीही गावांत मराठा समाज जास्त. त्यांतील स्त्रियांस बारामाही बुरखा असतो. इतकेच काय, कासार बागड्या भरावयास आला तर एका मोठ्या भिंतीला कोनाडा असतो. त्यातून हात बाहेर काढावा आणि बागड्या भराव्यात. बालविवाह सर्रास होतात. हुंडापद्धती सगळ्यात जास्त.

बालविधवा भरपूर आहेत. तरीपण महिला मंडळाची सभा म्हणल्यावर काही मोजक्या पांढऱ्या धोतरांचा गोषा करून आल्या. बोलल्याच नाहीत. सरपंचाच्या घरी जेवणाची व्यवस्था केली. महिला कार्यकर्त्यांना महिलांनी जेवण नाही वाढले, वाढले ते त्यांच्या नोकरांनी. महिलांच्या शिक्षणाचे प्रमाण देखील अत्यल्प.

गंगाखेडमध्ये महिलांसाठी नगरपरिषदेने बांधलेली एकदेखील मुतारी अथवा संडास नाही. अतरवेली खूनखटल्यातील विधवा महिलांना शासनाने अद्याप जागा दिली नाही.

राणीसावरगाव परिसरामध्ये दर ५–१० हुंडाबळी होतात. रचनात्मक संघर्ष समितीच्या वतीने या वर्षी हुंडा घेऊन किंवा देऊन चालू असलेल्या लग्नावर निदर्शने करण्यात येणार आहेत.

दि. २४–१२–८३ रोजी भ्रमणयात्रेमध्ये सहयोग दिलेल्या सर्व कार्यकर्त्या महिलांची एक बैठक घेण्यात आली. फेब्रु. ८४ च्या शेवटी महिला मेळावा गंगाखेड येथे होणार आहे.

एकंदरीत व्यापक व प्रभावी लोकशिक्षणाचा अभाव जाणवतो.

**सौ. मंगला कुलकर्णी**
रचनात्मक संघर्ष समिती
गंगाखेड (जि. परभणी)

□

## औंढानागनाथ ते हिंगोली

१६ डिसेंबरची सकाळ. शेतकरी संघटनेच्या घोषणांनी सारा औंढागाव खडबडून जागा झाला. मंदिराच्या लाउडस्पीकरवरून गावकऱ्यांना नम्र निवेदन करण्यात आले. 'भीक नको हवे घामाचे दाम. चलो हिंगोली!' आणि शेतकऱ्यांच्या घरात एकच गडबड सुरू झाली. प्रत्येक घरामधून कुणी तरी एकजण शेतकरी संघटनेच्या दिंडीत सामील होऊन आज शेतकऱ्याच्या प्रश्नासाठी लढायला निघणार होता. २ डिसेंबरला औंढा विभागातील शेतकरी संघटनेचा भव्य मेळावा नागनाथमंदिराच्या सभागृहात झाला, जिथे एकमताने आपल्या दुःखाला आपणच वाचा फोडावी म्हणून आपल्या हक्काने मागावे, शेतकरी संघटनेची आपल्या भागातली शक्ती व निष्ठा दाखवावी ह्यासाठी १६ डिसेंबर १९८३ शुक्रवारी औंढानागनाथ ते हिंगोली २५ कि. मी. अंतर पायी शेतकरी दिंडी नेण्याचा एकमताने निर्णय घेतला होता. १५ गावची शेतकरी मंडळी त्या मेळाव्यास हजर होती. सर्वांनी ह्या दिंडीत सहभागी व्हायचं व सरकारला व राजकीय सर्वच पक्षांना शेतकरी संघटनेची ताकद दाखवायची या दृष्टीने अनेक तरुण कार्यकर्ते कामाला लागले होते. दिंडीत येताना आपण आपल्या जेवणाचा डबा घेऊन यायचा, येताना एका माणसाचा जादा डबा आणायचा. कुठल्याही राजकीय पुढाऱ्याला किंवा सरकारी अधिकाऱ्याच्या दबावाला न भिता स्वाभिमानाने सहभागी व्हायचं असं ठरलेलं. नुसतं मुक्याने दिंडीत सहभागी व्हायचं, नाही तर शेतकरी संघटनेच्या घोषणा देत–शेतकरी संघटनेची गाणी म्हणत 'भीक नको हवे घामाचे दाम' हालगी, ढोल, ताशे वाजवीत संघटितपणे औंढ्या लोकमान्यचौकातून १६ डिसेंबरला ८ वाजता शेतकरी–दिंडी हिंगोलीकडे पायी कूच करणार होती. हिंगोलीहून १५ ला रात्री मुक्कामाला एक टांगा लाउडस्पीकर लावून गावात दाखल होणार होता; पण तो १६ ला सकाळी ८.३० वाजता आला. टांग्याला शेतकरी संघटनेचे ध्वज 'शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव द्या.' असे फलक लावण्यात आले. आठ वाजल्यापासूनच शेतकरी चौकात जाऊ लागले. प्रत्येकाची नावनोंदणी होऊन त्यांच्या छातीवर शेतकरी संघटनेचा बिल्ला लावण्यात येऊ लागला आणि ८.३० वाजता शेतकरी दिंडी वाजतगाजत शेतकरी संघटनेचे ध्वज खांद्यावर घेऊन, कापडी फलक हातात घेऊन दिंडीने हिंगोलीकडे कूच केले. गावच्या लोकांनी दिंडी पाहण्यास एकच गर्दी केली. काही जण कोण पुढे येतो चालायला हे पाहायला आले. काही बरोबर चालले. सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायतचे सर्व सदस्य, प्रतिष्ठित नागरिक, व्यापारी, दलित, मुसलमान जात–धर्म–पंथ–पक्ष सोडून 'शेतकरी तितका एक एक' समजून दिंडीत सहभागी झाले. म्हातारी माणसे तरुणांच्याही पुढे निघाली. औंढासर्कलमध्ये सर्वच गावात दिंडीत जाण्याची तयारी पूर्ण झाली. मी व दत्तराव शेवटच्या दिवसापर्यंत गावोगावी फिरत राहिलो. प्रत्येक गावात आपल्या गावातून जास्तीत जास्त माणसे दिंडीत सामील करायचे ठरले होते. कोणी कुठं थांबायचे, दिंडी किती वाजता मार्गावरील कोणत्या गावात पोहोचेल, सर्व ठरल्याप्रमाणे लोक आपआपल्या गावच्या शेतकऱ्यांच्या टोळीसह दिंडीचे स्वागत करण्यासाठी येऊन बसले होते.

शेतकरी दिंडी पहिल्यांदा पोहोचली ती गलंडी ह्या आदिवासी खेड्यावर. प्रत्येक घरातून एक असे १०० आंध आदिवासींनी दिंडीचे स्वागत केले व शेतकरी संघटनेच्या दिंडीत नारे देत सहभागी झाले. दुसरे गाव सुरेगाव ह्या ठिकाणी श्रीगंगाप्रसादजींनी शेतकरी संघटनेचा मेळावा घेतल्यापासून हे अधिकच जागृत असलेलं गाव. एकटेच आले नाही तर तुर्क पिंपरी, देवाळा, सुरवाडी, धारखेडा, तळणी ह्या गावचे प्रत्येक घरातून एक असे शेकडो शेतकरी हालगी वाजवत सुरेगावला आले. दत्तराव नाईक शेतकरी संघटनेचे तरुण कार्यकर्ते आपल्या अनेक तरुण मित्रांसह दिंडीत सहभागी झाले. वाळकी जाम, राजापूर ही रोड सोडून आडवाटेची गावे. वाळकीचे यादवराव नाईक यांनी जाम व राजापूरच्या लोकांना हालगी वाजवीत सुरेगावला आणले होते. ब्राह्मणवाडा, अंजनवाडा, सुकापूर, गोळेगाव, माथा, सावंगी ही गावे औंढ्याच्या अतिशय जवळ पण त्यांना येण्यास जरा उशीर झाल्याने व दिंडी वेळेवर हिंगोलीकडे निघाल्याने ह्या गावची माणसे अक्षरशः पळत सुटली व त्यांनी सुरेगाव येथे शेतकरी दिंडी गाठली. बघता बघता सुरेगावला हजारो शेतकरी दिंडीत सहभागी झाले. एव्हढ्या लोकांना सारखे सांभाळायचे कसे म्हणून सर्वांनी रस्त्यानं चालताना माझ्याबरोबर गाणी म्हणतच राहावे असे ठरविले. १) सुदर ते ध्यान जाई शेतावरी २) भांडवलशाही, हुकूमशाही

नष्ट कराया पळा रं, घरात बसून भागायचं नाही आता रस्त्यावरी चला रं, ३) चल माझ्या रे शेतकरीराजा निट नेट धरून, एकजूट करून, ४) जागा धरती का भगवान, जागा धरती का भगवान, अब न चलेगा राज तुम्हारा भागो रे सैतान ॥ अशी अनेक शेतकऱ्यांच्या अन्यायाला वाचा फोडणारी राष्ट्रसेवादलात शिकवलेली गीते सर्वांच्याकडून खड्या आवाजात म्हणत असताना रस्ता केव्हा इतक्या लवकर संपला हे दिंडीतील लोकांना कळलेच नाही. शेतकरी ही गाताना अतिशय दाद देत असल्याने वरील सर्व गीते हिंगोलीपर्यंत अनेक वेळा म्हटल्याने पाठ होऊन गेली होती.




**शेतकरी दिंडी हिंगोली शहरात आली तेव्हा शेतकरी संघटनेचे डॉ. अ. ना. पातुरकर व माजी आमदार द. य. गलांडे दिंडीत सहभागी झाले तेव्हाचे छायाचित्र.**

छाया : गजानन फोटो स्टुडिओ, हिंगोली

## टाळ्यांच्या गजरात संमती

येहळेगाव हे राजकीय पुढाऱ्यांच्या दबावाखालचं गाव. त्या गावातून मोठ्या संख्येने शेतकरी दडपणापोटी येतील की नाही अशी शंका. आदल्या दिवशी कॉंग्रेसचे या भागातील ज्येष्ठनेते केशवराव सोळंके, स्वातंत्र्यसैनिक, त्यांना सर्वजण तात्या म्हणून ओळखतात. त्यांना दिंडीत सामील होण्याची विनंती केली. शेतकरी संघटनेचा विचार हा देशाला, खेड्यांना, सर्व शेतकऱ्यांना तारणारा विचार आहे. राजकीय मतभेद बाजूला ठेवून संघटित आवाज उठविला तर आपल्याला शेतकऱ्याच्या मुक्तीसाठी लढलेले पाईक म्हणून भावी पिढी ओळखील व आपण आपले कर्तव्य केले नाही तर शेतकऱ्यांचे शोषण करणाऱ्या सरकारचे दलाल म्हणून ओळखेल. तात्यांना हा विचार पटला आणि तात्यांनी दिंडीत सहभागी व्हायचं ठरवलं. तात्या सामील होणार ह्या बातमीने गावाचे रूपच बदललं. राजकीय दडपण झुगारून अनेक तरुण पोरं व जवळपास घरटी एक माणूस दिंडीत येण्यास तयार झाला होता. दिंडी येहळेगावला आली तेव्हा तात्यांनी दिंडीचं स्वागत केले. दिंडीबरोबर हजारो शेतकरी, शेतकरी संघटनेचे ध्वज खांद्यावर घेऊन स्वाभिमानाने शेतकरी तितका एक एक, शरद जोशी लाखात एक, 'भीक नको हवे घामाचे दाम', 'ओला दुष्काळ जाहीर करो', 'शेतीमालाला उत्पादनखर्चावर आधारित रास्त भाव द्या', कृषी मूल्यआयोग बरखास्त करा' अशा घोषणा देत हिंगोलीकडे मोठ्या उत्साहाने कूच करीत असलेले शेतकरी पाहून तात्या म्हणाले, 'खरंच ३५ वर्ष आम्ही पुढाऱ्यांच्या थापांना भुललो. खुर्चीच्या नादाला लागून शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष झाले. शेतकरी भाव नसल्यामुळे अर्धवस्त्र होत आहे, आता नको पक्ष अन नको पुढारी, शेतकरी संघटना मजबूत करण्यासाठी माझा वेळ देईन. तात्यांना डॉक्टरांनी चालण्यास मनाई केली असतानाही काही वेळ दिंडीबरोबर ते चालले व बसने पुढे जाऊन शिष्टमंडळात सहभागी झाले. त्यानंतर त्यांनी सभेत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. शेतकरी संघटनेचे महत्त्व जाणा व संघटित होऊन सर्व शेतकऱ्यांनी आपल्या घामाचे दाम मिळविण्यासाठी लढावे असे आव्हान केले. येहळेगावचे असंख्य शेतकरी दिंडीत सहभागी झाले टांगा दिंडीच्या पुढे जाऊन दिंडी येत आहे त्यात सामील व्हा! दिंडीसोबतची संख्या बघा! असे आव्हान करायचा. अनेक शेतकरी शेतात काम करीत होते. शेतकरी दिंडीचे विराट रूप पाहून तेही काम सोडून दिंडीत सहभागी झाले. बोरजा, जडगाव, पिंपळा हिवरा ह्या गावची शेतकरी मंडळी मोठ्या उत्साहाने दिंडीत सहभागी झाली. डिग्रस हे गाव आमच्या सर्कलमधील मोठे गाव. पांडुरंग कन्हाळे, शेतकरी संघटनेचे खंदे कार्यकर्ते. त्यांनी आपल्या गावात १५ ते २० गावचा शेतकरी मेळावा शेतकरी संघटनेच्या वतीने घेतलेला. शेतकरी संघटनेचा विचार येथे बरा मुरलेला. रोडपासून ३ कि. मी. आत डिग्रसचे सरपंच, चेअरमन, व त्या गावचे सर्व ग्रा. पं. सदस्य, व्यापारी, तरुण शेतकरी मोठ्या संख्येने संघटनेचे ध्वज व कापडी फलक घेऊन वाजत-गाजत शेतकरी संघटनेच्या दिंडीत सहभागी झाले. आता दिंडीमध्ये शेतकऱ्यांची संख्या २ हजाराच्यावर गेली होती. पिंपरी व लिंबाळा ही हिंगोलीजवळची गावे. त्याही गावातून कुठलेही निमंत्रण नसताना बरीच मंडळी दिंडीत सामील झाली. बसवाहतूक व वाहने दिंडी पूर्ण पास होईपर्यंत थांबत. कारण शेतकऱ्यांचा नारे देण्याचा उत्साह जसजशी हिंगोली जवळ येत गेली तसतसा वाढत होता. बस थांबवून बसमधील लोक शेतकरी दिंडी डोळे भरून पाहताना दिसले.

एक टोक कयाधूनदीच्या पुलाजवळ तर दुसरे टोक लिंबाळ्याच्या पुलाजवळ (२ कि. मी. अंतर) होते असे बसमधील लोक सांगत. आम्ही दिंडीसोबत असल्याने जिथपर्यंत नजर जाईल तेव्हढेच दिसायचे; पण

सर्वजण शिस्तीत चाललेले पाहून आनंद झाला. शहरात जाण्यापूर्वी हिंगोलीच्या अलीकडे सर्वांनी आपल्या बरोबरचे डबे एकत्र बसून खाल्ले. मागचे लोक येईपर्यंत विश्राती घेतली आणि शहरात पाच–पाचच्या रांगेने शिस्तीत जायच्या सूचना देण्यात आल्या. प्रत्येकाने जबाबदारीने वागायचं, आपल्या घोषणाशिवाय दुसरी घोषणा द्यायची नाही. पोलिसांना भिण्याचे नाही. शांततेने चालायचे असे ठरले, बघता बघता सर्वजण रांगेत उभे राहिले. हलग्या पुन्हा मोठमोठ्याने चढा-ओढीने वाजू लागल्या. परत नव्या जोमाने शेतकरी संघटनेचा विजय असो ह्या नाऱ्यांनी हिंगोलीचा परिसर निनादला. शेतकरी संघटनेची दिंडी शहराजवळ दुपारी २ वाजता आली. त्या वेळी शेतकरी संघटनेचे डॉ. अ. ना. पातुरकर, माजी आमदार द. य. गलाडे, डॉ व. द. भाले, डॉ. सोनी आपल्या कार्य-कर्त्यांसह दिंडीच्या स्वागताला आले होते. दिंडीचे एव्हढे विराट रूप पाहून सर्वच चकित झाले. दिंडी वंजारवाडा, मंगळवारा, मारवाडगल्ली, ब्राह्मणगल्ली, जुने पोलीस-स्टेशन ह्या रस्त्याने हिंगोलीच्या मुख्य रस्त्याने म. गांधीच्या पुतळ्याजवळ आली. दिंडी पाहण्यासाठी असंख्य स्त्री–पुरुष मुलांनी रस्त्यावर, घराच्या माड्यांवर, गच्चीवर, दुकानांसमोर सर्वच लोकांनी दिंडीच्या मार्गा-वर खचाखच गर्दी केली होती. शेत-कऱ्याचे घोषणायुद्ध व गीतांनी सारी हिंगोलीनगरी ढवळून निघाली. औंढ्याचे सरपंच मा. आ. देशमुख ह्यांनी शेतकरी दिंडीच्या वतीने महात्माजीच्या पुतळ्यास हार घातला. परत दिंडी जवाहररोडवरून मोंढ्यातून उपजिल्हाधिकारी कार्यालयावर गेली. पोलिसांनी दिंडी अडविली. शेतकरी संघटना कुठले निवेदन उपजिल्हाधिकारी ह्यांना देणार ते डॉ. पातुरकर ह्यांनी सर्व शेतकऱ्यांच्या समोर वाचून दाखविले. टाळ्याच्या कडकडाटात सर्वांनी त्याला समती दिली. आता शिष्टमंडळात कुणी जायचे ? सर्व गावचे सरपंच, चेअरमन व शेतकरी संघटनेचे प्रमुख कार्यकर्त्यांनी जावे असा एकमुखी निर्णय शेतकऱ्यांनी घेतला. तेव्हा ३५ गावचे सरपंच व चेअरमन ह्या शिष्टमंडळात निवेदनावर सह्या करण्या-साठी आले होते. मी, डॉ. पातुरकर, काजी बशिरोद्दीन, दत्तराव नाईक, तात्यासाहेब सोळंके माजी आमदार गलंडे ह्या सरपंच व चेअरमन ह्यांच्या शिष्टमंडळात सहभागी झालो; पण तिथे उपजिल्हाधिकारी गैरहजर नायब तहसीलदार पुरोहित आमची वाट पाहात बसलेले. २५ कि. मी. अंतर औंढा ते हिंगोली हजारो शेतकरी पायी चालत येणार ह्याची कल्पना १५ दिवसापूर्वी लेखी व वृत्तपत्रांमधून दिली असतानाही जाणीव पूर्वक उपजिल्हाधिकारी व तहसीलदार ह्यांनी दिंडीला सामोरे जाण्याचे धाडस न झाल्याने पळ काढल्याबद्दल शिष्टमंडळाने तीव्र निषेध व नापसंती व्यक्त केली. त्यानंतर शेतकरी दिंडी शिवाजीनगरमार्गे रामलीला मैदानावर आली व त्या दिंडीचे जाहीर सभेत रूपांतर झाले, ह्या शेतकरी संघटनेच्या सभेत मी, डॉ. अ. ना. पातुरकर मा. आ. देशमुख (केशवराव) तात्यासाहेब सोळंके ह्यांची भाषणे झाली. शासनाच्या शेतीविषयक धोरणाचा तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. दत्तराव नाईक ह्यानी सर्व शेतकऱ्यांचे आभार मानले. तसेच शेतकरी संघटनेचे दुसरे अधिवेशन अखिल भारतीय पातळीवर आपल्या मराठवाड्यात होत असल्याने, मराठवाड्यातील परभणी जिल्ह्या-वर फार मोठी जबाबदारी असल्याने, सर्व शेतकऱ्यांनी अतिशय मोठ्या संख्येने जमेल त्या वाहनाने, पायी कसेही करून दिनांक १७ ते १९ फेब्रुवारी १९८४ मध्ये होणाऱ्या परभणी येथील अधिवेशनास येऊन शरद जोशी ह्यांचे व शेतकरी संघटनेचे विचार समजावून घेण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राह-ण्याचे आवाहन करण्यात आले. शेतकरी संघटनेचा विजय असो अशा तीन वेळा घोषणा देऊन शेतकरी दिंडीची समाप्ती करण्यात आली. एस. टी. महामंडळाने हिंगोली ते औंढा वेळेच्या व्यतिरिक्त शेत-कऱ्यांसाठी जादा गाड्या पाच वाजल्या-पासून ते रात्री दहा वाजेपर्यंत सोडल्या. शेतकऱ्यांना पोलिसांनीही अमोल सहकार्य केले. संपूर्ण दिंडीसोबत औंढा ते हिंगोली एक फौजदार देसाई व तीन शिपाई एवढेच लोक होते. कुठेही बंदोबस्तासाठी पोलिसांची गरज शेतकरी संघटनेला वाटली नाही. हिंगोलीकरांनी प्रतिक्रिया व्यक्त केली की, एव्हढा विराट मोर्चा आजपर्यंत हिंगोलीच्या इतिहासात निघालेला नाही ! एव्हढा शिस्तबद्ध मोर्चा २५ कि. मी. पायी चालत आलेला मी माझ्या पूर्ण सर्व्हिसमध्ये बघितला नाही अशी औंढ्याचे फौजदार ह्यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली. शेतकरी सघ-टित होऊन आवाज उठविण्याच्या तयारीला लागला आहे. आम्ही एक वर्षापासून या भागात शेतकरी संघटनेचे काम करीत आहोत. ह्या दिंडीच्या निमित्ताने शेतकरी संघटनेची ताकद किती आहे, ती लढण्यास योग्य झाली की नाही ते पाहण्याची संधी मिळाली. अतिशय अल्प वेळात एवढा प्रचंड प्रतिसाद शेतकरी देतील किंवा नाही अशी शंका होती. विचार टाकण्याचं काम चालू होतं. किती लोक ह्या विचारानं झपाटले ते शेतकरी दिंडीने कळलं. आता शेतकरी संघटनेचे आंदोलन जेव्हा केव्हा सुरू होईल तेव्हा याहूनही मोठं विराटरूप संघटितपणे शांततेच्या मार्गाने लढाईत उतरल्याशिवाय राहणार नाही असा विश्वास वाढला. त्यामुळे शेतकरी संघटनेची ताकद कमी होणार नाही हे बेजबाबदार व धंदेवाईक पुढाऱ्यांनी आजपर्यंत पक्षाच्या नावाने मतांची भीक मागणाऱ्यांनी लक्षात ठेवावे. आता शेतकरी संघटनेचा विचार वणव्या-सारखा नऊ प्रांतामध्ये पसरला आहे. निवडणुका १४ महिन्यांनी होतील तेव्हा राजकीय पुढारी, सर्व पक्षांचे एकत्र मिळून जरी गावात गेलात तरी आपली काय किंमत होईल ते काळ ठरविणार आहे.

ब. ल. तामसकर
पत्रकार, औंढानागनाथ
ता. हवेली
( जिल्हा परभणी )

# अरब-प्रश्न, हिंदू-एकता, वृत्तपत्रे आणि मुस्लिम कायदा

७ जानेवारी अंकापासून मिरज–इचलकरंजी वार्तापत्रं सुरू झाली. मागच्या दोन अंकांत मिरजेतल्या अरबांच्या वास्तव्यामुळे तिथल्या जनजीवनावर पडलेलं सावट आणि त्यामागची कारणं यांचा विचार केला होता.

अरबांना मुली पुरवणारी दलालयंत्रणा आणि मिरजेतल्या काही डॉक्टरांची विकृत हाव याबद्दलची माहिती मागील दोन अंकात सविस्तरपणे पुरविण्यात आली.

या अंकात. . . .

सुभाष काळे

अवघी एक लाख पाच हजार लोकसंख्या असलेल्या मिरज शहरात पंचतारांकित दर्जाची म्हणता येतील अशी ३५ लॉजेस आहेत. त्यापैकी तीस लॉजेस सुरू आहेत. काहीत फक्त राहण्याची सोय तर काहीत बिअर-बार, सामिष भोजनाचीही सोय आहे. यातील निम्म्यापैकी अधिक लॉजिसमध्ये फक्त अरब राहतात. हिरा, रमता, गणेश, आरफा, गुलमोहर, सन्मान, सन्मुख, विजय, लोकमान्य, राज, भूपाल, सदासुख, किस्मत ही खास अरबांची लॉजेस. लॉजिंगचे भाडे रजिस्टरात कितीही नोंदले गेले असले तरी प्रत्यक्षात दिवसाला ८० रुपयांपासून १०० रुपयापर्यंत कितीही भाडे घेतले जाते. बऱ्याच वेळा एजंटाने गिऱ्हाईक पटवून आणण्यावरही ते अवलंबून असते.

भूपाललॉजवर मागे हिंदू एकताच्या कार्यकर्त्यांनी छापा घालून पोलीसअधिकाऱ्यांना बोलावून घेतले होते. त्या वेळी सात–आठ नग्न अरब व सात–आठ नग्न मुली सापडल्या. विशेष म्हणजे या लॉजवर तसेच अन्य तीन–चार लॉजेसवर असे प्रकार घडल्यानंतर त्याचे परवाने रद्द केले गेले होते. ते काही काळानंतर परत देण्यात आले. कोणताही दंड न करता अधिकाऱ्यांनी हे परवाने कसे काय परत केले ? परवाने परत केलेल्या सर्व लॉजेसवर सध्याही हे प्रकार सर्रास चालू असतात !

मिरजेतील बऱ्याच लॉजवर मी जाऊन पाहणी केली. राज, हिरा, मयूर, विजय, लोकमान्य, गुलमोहर या लॉजच्या मालकांनी स्वत: होऊन आपापली लॉजेस दाखवली. या सर्व लॉज-मालकांशी चर्चा केली. त्यात त्यांनी काही ठिकाणी अनैतिक व्यवहार चालतात हे मान्य केले. त्यासाठी त्यांनी ‘तब्बक’ पद्धतीवर कडक नियंत्रण करणे आवश्यक असल्याचे दाखवून दिले. मग मी, ‘तुम्ही स्वत: होऊन तसे का करीत नाही ?’ असे विचारल्यावर ‘सर्वांनी मिळून जर निर्णय केला तर आम्ही तंतोतंत पाळू; परंतु एकाने हा निर्णय पाळायचा व दुसऱ्याने चालू ठेवायचा त्यामुळे धंदा मार खातो !’ असे सांगितले. ‘तब्बक’ पद्धत सर्वांनाच कटकटीची असल्याने ती बंद होणे सर्वांच्याच हिताचे ठरणार आहे, हे ‘मयूर’चे मालक श्री. प्रभाकर साळुंके यांनी आवर्जून सांगितले त्यांनी आमच्या लॉजमध्ये ‘तब्बक’ ना एका ठराविक मर्यादेपर्यंतच येऊ दिले जाते, त्यानंतर सर्वव्यवस्था पुरुष वेटर पाहतात, हे प्रत्यक्ष त्या ठिकाणी नेऊन दाखविले.

यात सर्वांत कौतुक वाटले ते उडप्यांचे. तेथे अरबाचा अजिबात शिरकाव झालेला नाही. याबाबत मी सुखनिवास लॉजच्या श्रीपाद आचार्यला विचारले तर तो म्हणाला, ‘अरबांना आमची ना नाही. कायद्याप्रमाणे आम्ही त्यांना नको म्हणू शकत नाही. त्यांनी यावे; पण येथे आमची शिस्त असेल त्याप्रमाणे राहावे लागेल ! बाई, बाटली, मास–मच्छर काही चालणार नाही !’

जुलै ते ऑक्टोबर हा अरबाचा सिझन. या काळात मिरजेतले सर्व लॉजेस फुल्ल असतात. लाखो रुपये मिळवीत असतात आणि हे ‘उडपी’ स्लॅक सिझन म्हणून रिकाम्या खोल्या बंद ठेवून चक्क झोपतात; पण अरबांना देत नाहीत !

## सरकारचं दुर्लक्ष

पूर्वी अरबांबरोबर निकाह लावलेल्या तसेच तब्बक म्हणून काम करणाऱ्या मुलींना भेटण्याचा मी प्रयत्न केला. भीती, दडपण या कारणाने अनेक जणी भेटू शकल्या नाहीत. एक–दोघी भेटल्या; पण त्या देखील भीत–भीतीनेच. त्यांनी आपले अनुभव सांगितले. त्यांच्या म्हणण्याचा सारांश असा की, हा आमच्यावर लादला गेलेला व्यवसाय आहे. पैसा खूप मिळतो; पण तो खैरनिसासारखी सांभाळणारी बाई किंवा मालक, पोलीस, लॉजमालक, एजंट यांच्यातच अधिक वाटला जातो. व्यसने फार. मिळकतीतले बरेच पैसे त्यातही जातात. ‘निकाह’ झालेल्या किंवा तब्बक झालेल्या कोणीही मुली

श्रीमंत नाहीत; पण त्यांना तसे करायला भाग पाडणाऱ्या खैरुन्निसासारख्या स्त्रिया, त्यांचे एजंट मात्र चिक्कार श्रीमंत झाले आहेत. अनेकांनी चार चार मजल्याच्या इमारती उठविल्या आहेत.

अरबांबाबतचे अनुभव विचारता त्यांची राहणी फार घाणेरडी, किळसवाणी असते. ते फार छळतात, अंगाला सिगारेटचे चटके देण्यासारखे प्रकार करतात, विकृत चाळे करायला लावतात असे दोघी-तिघी म्हणाल्या. त्यातल्या एकीने फोटोही दिला. आमचे सेक्सजीवन दहा वर्षांपेक्षा अधिक काळ टिकू शकत नाही असे एकीने सांगितले.

रेल्वे, पोस्ट, बँकांत अरबांना टॉप प्रयॉरिटी दिली जाते असे अनेकांनी सांगितले. कोणत्याही अरबाला कधीही रेल्वेचे रिझर्व्हेशन उपलब्ध होते; पण भारतीय माणूस गेला की, अडचणींचा पाढा वाचला जातो, हा अनेकांचा अनुभव आहे. तसेच काही रिक्षावाले फक्त अरबांना नेतात. फक्त अरबांसाठी वापरल्या जाणाऱ्या रिक्षांची एक युनियन आहे. मिरजेतल्या रिक्षा हा एक और प्रकार आहे. मला पुण्या-मुंबईत देखील तशा रिक्षा पाहायला मिळाल्या नाहीत. अलिशान कुशन्स, टेपरेकॉर्डर, खास परदेशी बनावटीचा ट्यून असलेला हॉर्न–एकेक रिक्षाची किंमत ६० ते ७० हजार रुपये आहे! या अरबांसाठी चालविल्या जाणाऱ्या रिक्षाबाबत सर्वसामान्य लोकांच्या अनेक तक्रारी आहेत. त्याचप्रमाणे इतर रिक्षावाल्यांच्याही आहेत; पण त्याची आर. टी. ओ. किंवा पोलीस दाद घेत नाहीत.

मिरजेतील परिस्थिती ही चार-आठ दिवसांत अचानक उद्भवलेली परिस्थिती नाही. शासनाचा आणि शासकीय अधिकाऱ्यांचा गेल्या पधरा-वीस वर्षांचा गलथानपणा व भ्रष्टाचारातून उद्भवलेला हा भस्मासुर आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात भारत 'अरब' राष्ट्रांचा पुरस्कर्ता आहे. त्यामुळे सरकारी पातळीवर अरबांच्या संदर्भात कडवी भूमिका स्वीकारता येत नाही, हा एक भाग आणि अरबांचा धर्म मुस्लिम असल्याने, भारतीय मुस्लिमांची मते आपल्या विरोधात जातील या भीतीपोटी सत्ताधारी पक्ष, त्याचबरोबर विरोधी पक्ष याबाबतीत मूग गिळून गप्प बसलेले आहेत. नेमका सत्ताधारी पक्षाच्या व विरोधी पक्षाच्या या अडचणीचा गैरफायदा शासकीय अधिकाऱ्यांनी घेतलेला आहे. त्यामुळे मिरजेची स्थिती नाजूक बनली आहे. कुठे तरी छापा घालून पाच-पन्नास लिटर हातभट्टी पकडल्याची, एखाद्या मटक्याच्या खोक्यावर छापा घालून पाच-पंचवीस रुपये जप्त केल्याची किंवा पोट जाळण्यासाठी शरीर-विक्रय करणाऱ्या आठ-दहा पोरींना पकडल्याची बातमी मोठ्या बहादुरीने वृत्तपत्रांकडे पोचविणारे हे मिरजेचे पोलीस गप्प का बसतात? मिरजेत आज काय चालत नाही? स्मगलिंग चालते, शहराच्या मध्यवर्ती वस्तीत असलेल्या लॉजेसमधून अरबांना मुली विकल्या जातात, ठिकठिकाणी व्हिडिओकॅसेटवर ब्ल्यू-फिल्म्स दाखविल्या जातात, भर रस्त्यावर तीन पानी जुगार चालतो, हे काय पोलिसांना दिसत नाही? दिसते आहे. नाही कसे? हे सर्व उद्योग चालवणारे पोलिसांचे हात ओले करू शकतात हाच त्याचा अर्थ. इतरांप्रमाणेच मिरजेच्या पोलीस-खात्यानेही अरबांना लुबाडलेले आहे.

काही पोलिसांची ड्यूटी रेल्वेस्टेशनवर असते. अरब रेल्वेतून उतरतो न उतरतो तोच हा पोलीस तिथे टपकतो. इंग्रजी येत नसले तरी पासपोर्ट उलटा-सुलटा करून बघतो आणि उगीचच पोलीस-स्टेशनवर चला म्हणून दरडावतो. या म्हणण्याचा अर्थ सोबतचा एजंट अरबाला समजावून सांगतो. अरब नोटांचे पुडके बाहेर काढतो. शभर-शभराच्या पाच-दहा नोटा त्याच्या हातात ठेवतो. काही क्षणापूर्वी अरबावर गुरगुरणारा हा पोलीस जादूची कांडी फिरावी तसा त्या अरबाला खाडकन सॅल्यूट ठोकतो व निघून जातो. नतर त्या अरबाने मिरजेत वाटेल तसा गोंधळ घातला तरी हा पोलीस नावाचा प्राणी तिकडे फिरकतदेखील नाही! अगदी फारच झाले तर त्या अरबाला ताब्यात घ्यायचे, कोणती तरी किरकोळ कलमे लावायची आणि कोर्टापुढे हजर करायचे. या किरकोळ तपासाच्या काळात त्याची उत्तम बडदास्त ठेवली जाते आणि त्याच प्रकारासाठी पकडलेला मिरजकर मात्र लाथाबुक्क्यांचा मार खात असतो! असे हे सद्‌रक्षणाय-खलनिग्रहणाय. केवळ पोलिसांनी दुर्लक्ष केल्याने अरबांचे मिरजेतील चाळे वाढतच राहिले आहेत.

मुली पळविणारे गुंड, त्यांची लग्ने लावणारी काझी-मंडळी, एजंट, त्यांना सहकार्य करणाऱ्या यंत्रणेकडून भरपूर लाच घेऊन त्यांच्याकडेही पोलिसांनी दुर्लक्ष केले आहे. रस्तोरस्ती चाकू विकणारी ही खैरुन्निसा आज जी इतकी वाढली त्याचे मूळ कारण पोलिसांचे दुर्लक्ष हेच होय. विशेष म्हणजे 'तब्बक' म्हणून काम करणाऱ्या ज्या वेश्या आहेत त्यातील निम्म्याजणींचे मालक हे पोलीसच आहेत असे खुद्द एका पोलिसाने मला सांगितले. ड्यूटीच्या निमित्ताने गांधीपुतळ्याभोवती भटकणारे हे पोलीस गैरकृत्यांवर लक्ष ठेवण्याऐवजी त्या तब्बकला सरक्षण देत उभे असतात! एका पोलिसाने दिलेल्या माहितीप्रमाणे मिरज हे 'इनकम सेंटर' मानले जाते. मिरजेत येण्यासाठी, पोलीस, फौजदार आणि इन्स्पेक्टर-साहेबांना वर बिदागी द्यावी लागते!

मिरजेतील सर्व माहिती गोळा केल्यानतर पोलीस-सबइन्स्पेक्टर श्री. पी. व्ही. काळे आणि पोलीस-सबइन्स्पेक्टर मिराशी यांची भेट घेतली. हे दोघेही अलीकडेच आलेले असल्याने त्यांना मिरजेतील परिस्थितीच्या बाबतीत जबाबदार धरता येणार नाही. उलट या दोघांनी, विशेषतः मिराशी यांनी अत्यंत तडफदारपणे काम करून खैरुन्निसा व तिच्या सहकाऱ्यांवर वचक बसविला आणि त्यांना हद्दपार करण्यासाठी म्हणून शिफारस केली. मिराशी हे अत्यंत 'स्ट्रेट फॉरवर्ड' व अभ्यासू आहेत. त्यांच्यामुळे मिरजेची परिस्थिती थोडी तरी सुधारू शकली असे माझे अनेकांना भेटल्यानंतर मत बनले आहे. नुकतीच त्यांची सातारा येथे प्रमोशनवर बदली झाली आहे. त्यांच्या जागेवर आलेले श्री. देसाई (मोठे) हेही चांगले तडफदार आहेत. त्यांनी सातारा भागात आपली कारकीर्द चांगली गाजवली आहे. ते आणि श्री. काळे, पो. इ. गोडसे यांच्या मार्गदर्शनाखाली यापुढे भरीव काही तरी करतील अशी अपेक्षा आहे. या अरब प्रकरणाच्या सदर्भात पोलीस अधिक कार्यक्षम कसे बनतील, त्यांच्या कामात काय काय अडचणी आहेत हे जाणून घेण्यासाठी डी. एस. पी. सरणसिंग यांना भेटा-

यला गेलो त्यानी कलेक्टरसाहेबांना भेटलेले बरे होईल असे मला सांगितल्याने हा विषय न चर्चिता इतर विषयावर गप्पा मारून परतलो

## जिल्हाधिकाऱ्यांची भेट

सांगलीचे जिल्हाधिकारी आहेत श्री. रत्नाकर वाघ. पूर्वपरिचय असल्याने सांगलीत आल्या आल्या त्यांची भेट घ्यायची असे मी ठरविले होते; पण लोकसभा-निवडणूक, त्यानंतर मत-मोजणी होईतो नोव्हेंबरची १५ तारीख उजाडली. त्यानंतर ते मुंबईला गेले. मी भेटायला गेलो त्या वेळी बुधगाव-प्रकरणाने वातावरण तापलेले होते; पण त्यांनी मला चागला तासभर वेळ दिला.

'गेल्या वर्षी अरबांच्या लग्न-संदर्भात संसदेत काही खासदारांनी चर्चा घडवून आणली होती. त्यानंतर शासनाने 'वफ्फबोर्डाला' विवाहासंबंधी काही सूचना दिल्या आहेत असे वृत्तपत्रात मी वाचले ते खरे आहे का? खरे असेल, तर त्याची अंमलबजावणी का होत नाही?'–माझा प्रश्न.

'तशी कोणती सूचना आलेली नाही; पण मी मध्यंतरी काझी व लग्न लावणाऱ्या संबंधित मंडळींना तशी कडक ताकीद दिलेली आहे.' —श्री. वाघ.

'कडक ताकीद म्हणजे?'

'परस्पर लग्न न लावण्याची, त्याची नोंद ठेवण्याची.'

'ठीक आहे लॉजेस व डॉक्टरांबाबत आपण काय करणार आहात?'

'मिरजेतील लॉजमालक, डॉक्टर आणि संबंधित इतर लोकांना एकत्रित करून एक आचारसंहिता ठरवणार आहे.'

'पोलिसानी खैरुन्निसा आणि तिच्या टोळीतील लोकांवर हद्दपारी-बाबत आपल्याकडे शिफारस केली आहे काय?'

'होय केली आहे; पण आपण त्या संदर्भात श्री. सांगले यांना भेटलात तर बरे होईल. कारण ते त्यांच्या क्षेत्रात मोडते.'

'आपण सागले याचे नाव काढले म्हणून विचारतो. आपल्या प्रांतांनी 'हिंदु एकता ही काळाची गरज आहे' अशा प्रकारची भाषणे स्टेजवरून करावीत का? त्याचे परिणाम इतरत्र होऊ शकतात हे त्यांच्या लक्षात कसे आले नाही?'

'हो आले. ते तरुण आहेत. उत्साहाच्या भरात बोलले असतील. मी आपला अभिप्राय त्यांना सांगतो.'

जिल्हाधिकारी श्री. रत्नाकर वाघ यांच्या भेटीनंतर सहाय्यक जिल्हाधिकारी मिरजेचे प्रांत श्रीयुत माधवराव सांगले यांच्या भेटीला गेलो ते नुकतेच कोठून तरी परतले होते; परंतु माझा निरोप मिळताच लगेच तत्परतेने मला आत बोलावले. थोडक्यात परिचय करून देऊन येण्याचा हेतू मी सांगितला. लगेच चर्चेला सुरुवातही झाली.

'खैरुन्निसा आणि तिच्या टोळीला हद्दपार करण्याची केस आपल्या-कडे पडून आहे असे मला समजले. ते खरे आहे काय?'

'हो आहे ना!'

'त्यासाठी एवढा विलंब का?'

'त्याचे मुख्य कारण म्हणजे माझ्यामागील कामाचा व्याप आणि ही केस १९५६ च्या बॉबे अॅक्टखाली घेतली असल्याने वेळ हा लागतोच.'

'पण किती वेळ? त्याला काही मर्यादा आहे की नाही?'

काय करणार? दुष्काळ. दुष्काळ संपला की विधानसभा निवडणूक, त्यापाठोपाठ लोकसभा-निवडणूक.'

'पण तो प्रश्न महत्त्वाचा आहे असे आपल्याला वाटत नाही का?'

'वाटतो; पण त्यासाठी वेळ हा लागतोच ना!'

'दोन दोन वर्षे जर अशा शिफारसी पडून राहिल्यावर गुन्हे-गारांचे फावते त्याचे काय?'

'हे पहा काळे, माझ्याकडे पेंडिंग वर्क फार आहे. मागच्या जवळ-पास पंधरा केसेस मी काढल्या आहेत. त्यामुळे मागचे काम करीत रूटिन-वर्क करावे लागते.'

'आपण हिंदु एकताच्या सभेत 'हिंदु एकता ही काळाची गरज आहे' असे भाषण केल्याचे ऐकले. मी काल जिल्हाधिकाऱ्यांच्या भेटीत देखील नापसंती व्यक्त केली. असे आपण उद्गार कसे काय काढलेत?'

'मी तसे बोललो नाही. भाषण केले; पण ते उद्गार मी काढले नाहीत.'

'मग आपण वृत्तपत्राकडे तसा खुलासा करायला हवा होता.'

'कामाच्या गडबडीत राहून गेले.'

'आपले भाषण नेमके काय होते?'


Gram : "MIRAJGLASS"

Phone : 2647 & 2648

*With Best Compliments from*

**MIRAJ GLASS PVT. LTD.,**

Crystal House, Devi Bhavan Place
MIRAJ – 416 410

*Manufacturers of :–*

Glass Tumblers, Table Wares with 'Miraj' & 'Ogale' Brand. Jars and Wide Mouth Jars with 'Janata' Brand and Glass Vials for Injection and Pharmaceuticals Bottles.

'शिवाजीमहाराजांनी जे कर्तृत्व केले ती त्या काळाची गरज होती हिंदु एकतानेही त्याचा आदर्श समोर ठेवावा असे मी म्हणालो'

आमची सुमारे अर्धा तास चर्चा झाली. श्री. सांगले मोकळेपणाने बोलले; पण खैरुन्निसाची हद्दपारी व हिंदु एकताच्या सभेतल्या भाषणाबाबत माझे ते समाधान करू शकले नाहीत. श्री. सांगले यांनी खैरुन्निसाच्या घराला १८ डिसेंबर ८१ रोजी (सि स. न. ६४/६५) सील ठोकले होते; पण त्यांना नगरप्रशासकांनी सहकार्य दिले नाही हा सांगले यांचा आरोप आहे. पोलीसअधिकारी, प्रांतप्रशासक या सर्वांच्या भेटीत एकच गोष्ट वारंवार ऐकायला मिळाली. ती म्हणजे परस्परावरचे आरोप. त्यामुळे कोण खरे, कोण खोटे याचा निर्णय करणे अवघड आहे.

मिरजेतील अरबांच्या प्रश्नावर जनमत जागृत करण्याची महत्त्वाची भूमिका पार पाडली ती 'हिंदु एकता आंदोलन' या संघटनेने. १० फेब्रुवारी १९८० रोजी अस्तित्वात आलेल्या या संघटनेने जन्मल्या-बरोबर या प्रश्नावर रस्त्यावर येऊन संघर्ष केला. त्यामुळ संघटना झपाट्याने फोफावली. या संघटनेचे मिरज शहराचे अध्यक्ष आहेत श्री. प्रभाकर चौगुले बुरुड समाजातील हा तडफदार तरुण स्वत:च्या घरची जबाबदारी सांभाळून हिंदु एकताचे कार्य करतो मिरजेतील काही लोकाकडून हिंदु एकताच्या कार्यकर्त्यांवर अनेक आरोप केले जातात. त्यांपैकी एक आरोप म्हणजे हे 'एकतावाले' श्रीमंतांची पोरे आहेत.पण 'घरची स्थिती'व्यवस्थित असलेला एकही जण मला भेटला नाही उलट हिंदु एकताच्या प्रांताध्यक्षापासून सामान्य कार्यकर्त्यां-पर्यंत सर्वजण सर्व जातीधर्मांचे आणि कष्टकरीवर्गातलेच आहेत. त्यासाठी मिरज, सांगली, इचलकरंजी या भागात फिरलो; पण तरी श्रीमंत मुले कोणी आढळली नाहीत.. हिंदु एकतेत मुस्लिम व ख्रिश्चन मुस्लिम तरुण देखील आहेत.

दुसरा आरोप हे आपत्य कोणाचे हा. कोणी सांगतात संघाचे, कोणी भा. ज. प.चे, तर भा. ज. प. वाले सांगतात कॉंग्रेसवाल्याचे व

## 'अरब हटाव' मोहिमेस धर्मनिरपेक्ष दलाचा पाठिंबा


पश्चिम महाराष्ट्रातील सांस्कृतिकदृष्टया महत्वाच्या. सांगली जिल्ह्यातील मानवी आरोग्याचा विडा उचलून त्या वाटेने वाटचाल करणाऱ्या मिरजेला गेल्या १० वर्षांपासून अरबी लोकाची कीड लागली असून सबंध गावाचेच नव्हे तर या जवळपासच्या परिसराचे मानसिक, सांस्कृतिक, सामाजिक आरोग्य धोक्यात आले आहे. एवढेच नव्हे तर सबंध समाज अस्वस्थ झालेला आहे. या समाजाचे स्वास्थ्य जर टिकवायचे असेल तर शरीरशास्त्राच्या (डॉक्टरी) भाषेत म्हणावे लागेल की, ही कीड ऑपरेशन करूनच घालविणे भाग आहे. गेल्या पाच वर्षांत अरबस्थानातून मिरज मिशन हॉस्पिटलमध्ये शारीरिक उपचार करून घेण्याकरिता आलेल्या अरबी लोकानी पैशाच्या जोरावर समाजविघातक कृत्ये करण्याचा सपाटाच लावला आहे.

नैसर्गिक तेलातून मिळालेल्या पैशाच्या जोरावर गावातील काही समाजकटकाना हाताशी धरून, पैशाची लालूच दाखवून गरीब समाजातील मुलीना आणून, अरबी लोकाशी लग्न लावून देऊन, काही दिवसानी मुलीना तेथेच टाकून पळून जाणे इ. घटना दररोज घडत आहेत. जोपर्यंत हे थोड्या प्रमाणात होते तोपर्यंत लोकांना विशेष जाणीव झाली नव्हती; परंतु आता हे मोठ्या प्रमाणात वाढत चालले आहे. प्रत्येकाला या घटनाची काळजी वाटू लागली आहे. यांच्याच अरब देशात अरबी स्त्रीबरोबर एखाद्या दुसऱ्या राष्ट्रातील पुरुषाने प्रामाणिक प्रेम केले किंवा तिच्याशी लग्न करण्याचा प्रयत्न जरी केला तरी त्याला दगडाने ठेचून मारण्यासारख्या क्रूर शिक्षा दिल्या जातात आणि हीच माणसे आमच्या देशात येऊन आमच्या भारतीय स्त्रियांची अब्रू बेदकारपणे बाजारात मांडतात! हे सर्व समाजाला, राष्ट्राला अत्यंत लाजिरवाणे आहे म्हणून प्रत्येक भारतीय स्त्री-पुरुषाचे कर्तव्य आहे की, यांचे हे समाज व देशविघातक कृत्य हाणून पाडले पाहिजे आणि त्यांना येथे येण्यापासून मज्जाव केला पाहिजे आणि त्यांना या मिरजेतून ताबडतोब हाकलून लावले पाहिजे हाच विचार तेथील 'हिंदु एकता' या संघटनेने केला असून तो स्तुत्यच आहे म्हणून आम्ही त्यांच्या विचाराचे अभिनंदन करतो व त्याना पाठिंबा व्यक्त करतो. आम्हाला कल्पना आहे मिरजेतील व आसपासच्या परिसरातील डॉक्टर्स, औषधेविक्रेते, इतर प्रोव्हिजन स्टोअर्सवाले, स्वार्थी मंडळी पैशाच्या लालसेने अरबी भाषेत बोर्ड लिहून त्यांना आपल्याकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न करतात आणि त्यांच्यापासून अनैतिक मार्गाने अधिक प्रमाणात सांपत्तिक प्राप्ती करून घेतात; परंतु ती मंडळी समाजावर होणाऱ्या या वाईट परिणामांकडे डोळेझाक करतात आणि म्हणून आज त्याचा परिणाम या थरापर्यंत येऊन पोचला आहे. त्यांना आम्ही अशी विनंती करू इच्छितो की त्या मंडळींनी अशा प्रकारे आकर्षित करून अरबी लोकांना प्रोत्साहन देऊ नये व समाजहिताच्या कार्याला सहकार्य करावे. कारण सध्या समाजामध्ये सामाजिक व जातीय तेढ वाढत चाललेली दिसत आहे. काही वेळेला दोषी माणसे सुटून त्या ठिकाणी 'जखम एका पायाला व मलमपट्टी एका पायाला' या उक्तीप्रमाणे इतर जमाती-जमातीमध्ये दंगे होताना दिसतात. म्हणून प्रत्येकाने आज डोळसपणे पाहण्याची गरज आहे व खरी कीड काढून टाकन समाजात शांतता राखणेची गरज आहे. हा दृष्टिकोन ठेवून 'अरब हटाव' ही मोहीम ताबडतोब यशस्वी करणेची आहे, ही विनती.

आपले नम्र

(१) बी. बी. बिरनाळे– अध्यक्ष, (२) भिमराव अतिग्रे–उपाध्यक्ष (३) अनिल दंडगे (४) मुबारक मोमीन (५) रामचंद्र हावळ (६) हुसेन फरीद मुजावर (७) विश्वनाथ अग्रवाल

ऑगस्ट ८३ मध्ये इचलकरंजी धर्मनिरपेक्ष दलाने काढलेले पत्रक



¤

मिरजेतील अरबांच्या गैरप्रकारांना
आळा घालण्याबाबत राज्यपाल लतीफ
यांना निवेदन सादर करताना
हिंदू एकताचे कार्यकर्ते

¤

काँग्रेसवाले म्हणतात समाजवादी काँग्रेसचे. हे हाल हिंदु एकताचे सर्व ठिकाणी होत आहेत. संघ, भा. ज. प. इंदिरा काँग्रेस, जनता पक्ष हे सर्वच हिंदुएकताच्या नावाने लाखोली वाहतात. नुकत्याच पार पडलेल्या सांगली लोकसभा निवडणुकीच्या वेळी मी सांगली भागात होतो. त्या वेळी सर्व पक्षांच्या सभा मी ऐकल्या. सभेत हिंदू एकताचा उमेदवार असावा तशी टीका सर्व पक्षांनी हिंदु एकतेवर केली. ते काही असो. हिंदु एकताच्या कार्यकर्त्यांनी 'मिरज अरब' प्रकरणात सर्व जातीधर्माच्या लोकांची सहानुभूती मिळविली आहे हे मला जागोजाग दिसून आले.

एकंदर हिंदु एकतेचे धोरण काय हे समजून घेण्यासाठी मी मिरज शहर अध्यक्ष या नात्याने श्री. प्रभाकर चौगुले यांची भेट घेतली. त्यांनी मागील आंदोलन, त्यानंतर त्यावर उमटलेल्या प्रतिक्रिया याची सविस्तर माहिती दिली. हिंदु एकतेचे कार्य कोणत्याही जाती-धर्माविरुद्ध नसल्याचे आणि 'मिरजेतील अरब' प्रकरणात बहुसंख्य मुस्लिमांचा हिंदु एकतेला पाठिंबा असल्याचे त्यांनी दाखवून दिले.

हिंदु एकता आंदोलनाचे प्रांताध्यक्ष श्री. नारायणराव कदम हे सांगलीत राहतात. मिरजेतील अरबांच्या प्रकरणात त्यांनी स्वीकारलेली भूमिका नेमकी काय आहे हे समजून घेण्यासाठी त्यांनाच भेटण्याची गरज होती. म्हणून श्री. प्रभाकर चौगुले यांच्या मध्यस्थीने भेट ठरवली व एका रात्री खणभाग पोलीसचौकीजवळ असलेल्या हिंदु एकताच्या कार्यालयात मुक्काम ठोकला.

निरनिराळ्या अनेक संघटनांचे प्रांतपातळीवरचे मी अनेक नेते पाहिले आहेत. अध्यक्ष–उपाध्यक्ष पाहिले आहेत; पण नारायणराव कदमांचा खाक्या काही औरच आहे. अत्यंत सरळ, साधे, थंड वृत्ती ठेवून वागणारे, बोलणारे असे हे गृहस्थ आहेत. त्यांचा व्यवसाय आहे लाँड्रीचा. शिक्षण जेमतेम मॅट्रिकपुरते; पण वाचन, चिंतन आणि वक्तृत्व या बाबतीत भल्याभल्यांना मागे टाकतात. असे हे हिंदु एकतेचे अध्यक्ष आपले लाँड्रीचे काम सांभाळून संघटना चालवितात. त्यांच्यामागे कोणी पैसेवाले नाहीत, कोणत्या पक्षाचे पुढारी नाहीत किंवा इतर कोणाचे त्यांना पाठबळ नाही. फक्त त्यांच्या खातयावर जमा आहे ती प्रखर राष्ट्रनिष्ठा, हिंदुत्वप्रेम. अशा या व्यक्तीने पुण्यात येऊन गेल्या दोन–तीन वर्षात 'ज्ञानप्रबोधिनी', 'गायकवाड वाडा' या ठिकाणच्या वक्तृत्वसभा गाजविलेल्या आहे.

माझा परिचय चौगुले यांनी करून दिलेला असल्याने येण्यामागचे कारण वगैरे प्राथमिक गप्पा न करता सरळ मुलाखतीलाच सुरुवात केली.

'आपले म्हणजे हिंदु एकतेचे 'अरबप्रकरणात' नेमके धोरण काय ?'–मी.

'हे पहा काळे,, अरब हे धर्माने मुस्लिम आहेत म्हणून आमचा त्यांना विरोध नाही, की त्यांनी येथे येण्यालाही विरोध नाही; पण ते येथे येथून आमच्या भगिनींशी जे गैरव्यवहार करतात, लग्ने लावून त्या अबलांना मुंबईपर्यंत नेऊन वाऱ्यावर सोडतात हे आता कुठे तरी थांबविणेची गरज आहे.'

'पण हे आंदोलन हिंदु एकतेने आताच कसे काय सुरू केले ?'

'आमची संघटनाच मुळी १० फेब्रुवारी ८० ला स्थापन झाली आणि त्यानंतर गेली तीन वर्षे आम्ही अरबांच्या गलिच्छ चाळयांविरुद्ध आवाज उठवीत आहोत.'

'परंतु आपली अरब हटाव भूमिका मला चुकीची वाटते.'

'मिरजेत येणाऱ्या किंवा असणाऱ्या सर्वच अरबांविरुद्ध आमची तक्रार नाही. जे अरब खरोखरच औषधोपचारासाठी आले आहेत, त्यांना खुशाल मिरजेत राहू द्या. परकीय पाहुणे या नात्याने त्यांची कोणी पिळवणूक करीत असतील तर त्याला प्रतिबंध करणे हे आमचे कर्तव्य समजतो. मात्र औषधाच्या नावाखाली जे अनैतिक चाळे करीत आहेत त्यांच्या विरोधात आमचा लढा आहे.'

'पण तुम्ही हे लक्षात घेत नाही की अरबांना सहकार्य करणारे लोक हे आपले आहेत. त्यांना लुबाडणारे डॉक्टर, लॉजवाले असे किती तरी लोक हिंदु आहेत. त्यांच्या विरुद्ध हिंदु एकता का आवाज उठवीत नाही ?'

### चळवळीतल्या व्यक्ती

हिंदु एकता आंदोलन हे कोणत्याही धर्माविरुद्ध नाही. मुस्लिम बांधवही आमच्याच देशाचे नागरिक आहेत. त्यांनीही हा परवयांचा

हस्तक्षेप सहन करू नये. त्यांनी या कामी आम्हाला मदत करावी. समाजकटक, मग तो कोणीही असो, त्याची जात–धर्म पाहण्याची गरज नाही. अरबांना लुबाडणाऱ्या डॉक्टरांविरुद्ध, तसेच अनैतिक व्यवहार करणाऱ्या लॉजवाल्याविरुद्धदेखील प्रथम आम्हीच आवाज उठविला आहे. ते हिंदु असले तरी त्यांच्या विरोधात आम्ही उभे ठाकलो आहोत. 'भूपाल' सह अनेक लॉजेसवर आमच्या कार्यकर्त्यांनी छापे घालून गैरप्रकार उजेडात आणले आहेत मिरजेतील काही प्रतिष्ठित डॉक्टर पैशाच्या लालचेने, मेडिकल ट्रीटमेन्टच्या नावाखाली अरबांना दवाखाना-ॲडमिशन देतात; परंतु हे दवाखाने म्हणजे एक प्रकारचे लॉजच असते. अशा हॉस्पिटलावर व संबंधित डॉक्टरावर त्वरित कारवाई करण्यात यावी, तसेच अशा डॉक्टरांच्या आर्थिक प्राप्तीची चौकशी करण्यात यावी अशी मागणी हिंदु एकताने दि. १७ ऑगस्ट ८३ ला पत्रकारपरिषदेत केलेली आहे व हा मजकूर प्रसिद्ध झालेलाही आहे.

'या प्रकरणात तुम्हाला 'अरब हटाव' न म्हणता परिस्थिती सुधारण्याच्या दृष्टीने काही सूचना करता येतील का?'

'हो. का नाही?

१) केंद्र सरकारच्या मॅरेज–ॲक्टप्रमाणे जी स्त्री त्या अरबाची पत्नी असेल तिलाच लॉजमध्ये प्रवेश दिला जावा. तव्बक किंवा अन्य स्त्रीला प्रवेश दिला जाऊ नये.

२) अरबलोक येथील काही एजटामार्फत मुलींशी लग्ने करतात. ते भारतीय मुस्लिम कायद्याप्रमाणे एखाद्या काझीसमोर करारपत्र करून करतात व त्या मुलीचा उपभोग घेऊन त्याना सोडून देतात. याकरिता यापुढे कोणत्याही अरबास येथे विवाह करावयाचा असेल तर त्या मुलीचा व्हिसा त्या अरबाने त्याच्या देशाच्या सरकारकडून मागितला पाहिजे व त्यानंतर ते लग्न कोर्टात रजिस्ट्रारपुढे झाले पाहिजे.

३) मिरजेतील काही घरांत बेकायदेशीररीत्या खोल्या भाड्याने देऊन तेथे मुली पुरविल्या जातात. अशा घरांत अरबांना राहण्यास मज्जाव केला जावा व अशा घरमालकांना कडक शिक्षा देण्यात याव्यात.

४) मिरजेत येणाऱ्या प्रत्येक अरबाची नोंद व तो कोणत्या उद्देशाने येथे आला आहे याची माहिती पोलिसांनी वेळोवेळी नोंदवून घ्यावी.

५) 'तव्बक' वर कायदेशीर बंदी घालावी. हे एवढे जरी केले तरी परिस्थिती बदलू शकेल. काळे, तुम्ही, मिरजेतील अरब म्हटले की, हिंदु–मुसलमान प्रश्न, जातीय प्रश्न हा चुकीचा अर्थ घेऊ नका. अरब–प्रश्न म्हणजे भारतदेश व परराष्ट्र व परराष्ट्रातील नागरिक यांच्यातील प्रश्न असा याचा अर्थ आहे आणि दुसरी बाब म्हणजे भारतात आमचे अंतर्गत काहीही मतभेद असतील तर ते आम्ही भारतातच आपापसात सोडवू; पण भारतातील मुस्लिमांना म्हणजेच पर्यायाने भारतीयांना जर परराष्ट्रीय मुसलमानाकडून अपमानास्पद वागणूक मिळत असेल तर भारतीय म्हणून आम्ही ती कदापी खपवून घेणार नाही! विशेषतः आमच्या भारतीय भगिनींची, त्यांच्या स्त्रीत्वाची जर अवहेलना कोणाकडून होत असेल तर तो भारताच्या स्वाभिमानाचा प्रश्न आहे आणि याची जाण दुर्दैवाने जरी मुस्लिम समाजाला नसली तरी भारतीय म्हणून आम्ही आमच्या भारतीय भगिनींच्या शील रक्षणासाठी उभे राहणे आवश्यक आहे आणि सरकारलाही उभे करणे आवश्यक आहे. मिरजेतीलच नव्हे तर भारतातील ठिकठिकाणी अरबांच्या वास्तव्यामुळे भारतीय स्त्रियांच्या स्त्रीत्वावर मोठाच अन्याय होत आहे, हेही तुम्ही लक्षात घ्या!'

'नारायणराव, हे ठीक; पण गेल्या निवडणुकीच्या वेळी मज्जिदीत धमक्या देणारे एक पत्रक मिळाले आहे, त्याचे काय? हे बरोबर आहे काय?'

'हे पहा काळे, त्याबाबत मी पत्रक काढलेले आहे. ते वाचा म्हणजे विषय अधिक स्पष्ट होईल.' 'पूज्य एलाचार्य अथवा अन्य साधूंना त्रास दिल्यास हिंदु एकता धावून येईल,' या पत्रकाच्या शेवटच्या परिच्छेदात नारायणराव कदम म्हणतात–

'गेल्या निवडणूककाळातही सांगली–मिरजेतील मुस्लिम-बधूंच्या प्रार्थनामंदिरात धमकी देणारी पत्रके पाठवून काही स्वार्थी राजकारणी मंडळींनी दोन समाजात संघर्ष निर्माण करण्याचा प्रयत्न केला, तोही निषेधार्ह आहे. प्रार्थनामन्दिरे कोणत्याही धर्माची असोत ती पवित्र रहावीत अशीच भावना हिंदु एकता संघटनेची राहील!' सर्व धर्मीयांनी गुण्यागोविंदाने रहावे; समाजकटकांना खड्यासारखे वेचून फेकून द्यावे, असेही आवाहन या पत्रकात करण्यात आले आहे.'

रात्रीचे दोन वाजून गेले होते. दिवसभराच्या कामाने नारायणरावही थकले होते. चहा पिऊन मी त्यांचा निरोप घेतला.

## चळवळ चालूच राहणार

हिंदु एकताच्या जन्मापूर्वी ज्यांनी अरब-प्रकरण हातात घेतले ते बापूराव साठे हिंदु एकताचे अखिल भारतीय संघटक आहेत त्यांची आतापर्यंत दोन-तीन पुस्तकेही प्रसिद्ध झाली आहेत. एक वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध, तपस्वी, स्वातंत्र्यकाळात व नंतर गोवा मुक्ती आंदोलनात झुंज घेतलेला एक क्रांतिकारक अगदी सकाळीच जाऊन त्यांना गाठले.कारण ते दिवसभर कोठे असतील हे सांगता येत नाही, असे आधीच मला सांगण्यात आले होते. तशी आधीची थोडी ओळख होतीच. चहापानानंतर 'आपण या आंदोलनाकडे कसे वळलात?' असा प्रश्न केला. त्यावर त्यांनी शिवसेना–कार्यकर्त्यांनी एका मुलीबद्दल माहिती दिली, त्यानंतर डी. एस्. पी. वेंकटाचलम यांची भेट घेतली वगैरे सविस्तर माहिती दिली. ती मागे दिलीच आहे. बापूंचे विशेष कार्य म्हणजे त्यांनी राष्ट्रवादी विचार मुस्लिमापासून ते समाजातील खालच्या स्तरापर्यंत नेण्यासाठी केलेली धडपड. ते सावरकर–प्रतिष्ठानचे अध्यक्ष आहेत. गोवावीर मोहन रानडे यांच्या मुक्ततेसाठी आंतरराष्ट्रीय रेडक्रॉसपर्यंत बापूंनी केलेले प्रयत्न सर्वश्रुतच आहेत. अरब प्रकरणात चळवळ नेटाने चालविण्यात बापू अग्रभागी आहेत. इतर अनेक विषयांवर गप्पा होऊन मी त्यांचा निरोप घेतला.

हिंदु एकता आंदोलनाच्या उभारणीत आणि अरबप्रकरणीचे आंदोलन नेटाने पुढे चालविण्यात सिंहाचा वाटा असलेली महत्त्वाची व्यक्ती म्हणजे प्रकाश जगताप. संपूर्ण हिंदु एकतेत सर्वांत जास्त शिक्षण असलेला हा एकमेव तरुण आहे. ते बी ई. इलेक्ट्रिकल आहेत. प्रकाश जगताप म्हणजे हिंदु एकतेची चैतन्यमूर्ती! हजरजबाबी, विनोदी आणि विशेष म्हणजे या माणसाचे असे एकही क्षेत्र नाही की, तिथे त्याचे हात पोचलेले नाहीत. त्यामळे हिंदु एकताचा कार्यविस्तार फार झपाट्याने होत गेला. या प्रकाश जगतापांचेदेखील श्री. बापू



पैगंबरजयंतीनिमित्त
सांगलीत निघालेल्या मिरवणुकीत
हिंदु एकताचे कार्यकर्ते सहभागी झाले

साठ्यांसारखेच आहे. एकदा सकाळी गायब झाले की संध्याकाळीच भेटणार ! त्यांनाही त्यांच्या घरीच गाठले. मग आम्ही दोघे मिळून अतिथिगृहात येऊन गप्पा मारीत बसलो.

तुम्ही ही चळवळ चालवता. मग व्यवसायाचे नुकसान होत नाही का ?'

'होते ना; पण ते सहन करावे लागते.'

'अरबप्रकरण सध्या थंड दिसते आहे. आता हे येथेच संपणार का ? कारण तुमची काहीच हालचाल दिसत नाही.'

'सध्या थंड आहे ते निवडणुकीमुळे. थंड ठेवण्याचा प्रश्नच येत नाही. जोपर्यंत अरबांचे चाळे बंद होत नाहीत, खैरुन्निसा आणि तिच्या गँगला शिक्षा होत नाहीत तोपर्यंत ही आमची चळवळ चालूच राहणार !'

'तुमच्या हिंदु एकतेत मला एकही मुस्लिम दिसला नाही हे कसे ?'

'आमच्या संघटनेत बरेच मुस्लिम युवक आहेत; पण आम्ही सर्वच मिळून असल्याने व त्यांचे वेगळेपण असे नसल्याने तुमच्या लक्षात ते आले नसावे.'

'तुमच्या कार्यक्रमाला ते येतात. मग त्यांच्या कार्यक्रमाला तुम्ही जाता की नाही ?'

'होय. येथल्या पैगंबरजयंतीत आमचे हिंदु एकताचे कार्यकर्ते प्रचंड संख्येने सहभागी झाले होते.'

साधारणतः तासभर गप्पा मारून कामाचा व्याप असल्याने गप्पा आटोपत्या घेतल्या.

## वृत्तपत्रांची कामगिरी

हिंदु एकताने 'अरब-प्रश्न' तेवत ठेवला तरी पहिला निषेध नोंदविला तो मुस्लिम समाजातील लोकांनीच. १९७७ मध्ये बळजबरीने अरबस्तानला मुलगी नेण्याचा प्रयत्न बापू साठे आणि डी. एस. पी. वेंकटाचलम् यांच्या प्रयत्नानंतर अयशस्वी होताच, १९७७ च्या इदनिमित्त, करीम नूरमहंमद बेग, इम्तियाज नजिर हकिम, मजहर हुसेन मुल्ला, जुबेर अब्दुल मुजीर शिलेदार, इम्तियाज खलील शिलेदार यांनी एक पत्रक काढून अरबांच्या चाळ्यांकडे मुस्लिम समाजाचे लक्ष वेधले. त्यानंतर सांगलीच्या जिल्हाधिकाऱ्यांना या प्रकरणी सांगलीतील मुस्लिम बांधवांनी एक निवेदनही सादर केले. हिंदु एकताची स्थापना होण्याआधी तीन वर्षांपूर्वी मुस्लिम समाजातील सुजाण कार्यकर्त्यांनी केलेले हे प्रयत्न आहेत हे लक्षात घ्यायला हवे. त्यानंतर अनेक मुस्लिमांनी वृत्तपत्रांत पत्र लिहून, सार्वजनिक सभांत भाषणे करून, बैठका घेऊन हा विषय सतत जागता ठेवला आहे. त्यांनी समाजजागृतीचे केलेले हे प्रयत्न हिंदु एकता आंदोलनाने केलेल्या कार्याइतकेच मोलाचे आहेत हे विसरता येत नाही. वास्तविक पाहता मुस्लिम नागरिकांनी सुरू केलेल्या प्रयत्नात त्याच वेळी हिंदूंनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेऊन संघटितरीत्या प्रयत्न करायला हवे होते; पण दुर्दैवाने तसे झालेले नाही. तरी देखील हे मूठभर मुस्लिम कार्यकर्ते तेव्हापासून झुंजत आहेत. हिंदु एकताने या प्रकरणी पुढाकार घेतल्यानंतर या सर्व मुस्लिमांनी हिंदु एकतेला फार मोठ्या प्रमाणात सहकार्य केलेले आहे.

अरबप्रश्नी या सर्वांइतकाच महत्त्वाचा वाटा वृत्तपत्रांचाही आहे. भारतात परकीय नागरिकांसंबंधी दोन ठिकाणी आंदोलने चालू आहेत. पहिले आसाम आणि दुसरे ठिकाण मिरज. मिरजेचा प्रश्न अर्थात फार मर्यादित आहे; पण महाराष्ट्रातील वृत्तपत्रांनी तो जागता ठेवला. पुण्याच्या 'दै. तरुण भारत'ने हा प्रश्न प्रारंभापासून निर्भीडपणे मांडला. त्यापाठोपाठ दै. केसरी, दै. सकाळ, म. टाइम्स, लोकसत्ता, कोल्हापूर सकाळ, पुढारी, सत्यवादी, सांगलीचा दै. नवसंदेश मिरजेच्या दै. प्रतिध्वनीने तर अक्षरशः या विषयावर तोफाच डागल्या. एकंदर मराठी वृत्तपत्रांनी घेतलेली भूमिका व बजावलेली कामगिरी कौतुकास्पद आहे.

वृत्तपत्रांनी हा विषय गाजविला असला तरी या प्रश्नाकडे अजिबात फिरकले नाहीत ते निरनिराळ्या राजकीय पक्षांचे पुढारी. इंदिरा काँग्रेस, जनतापक्ष, समाजवादी, काँग्रेस, शे. का. पक्ष इतकेच कशाला भा. ज. प. देखील मुस्लिमांची मते मिळणार नाहीत म्हणून

गप्प बसला. मुस्लिम कार्यकर्ते आणि हिंदु एकतावाल्यांनी हा प्रश्न धसाला लावला नसता तर अरबांनी आणखी कुठपर्यंत धुसकोरी केली असती हे सांगता येत नाही.

विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे हा स्त्रियांचा प्रश्न असून देखील एकाही महिला संघटनेने, महिला आमदाराने, महिला खासदाराने मंत्रीपदावर चमकणाऱ्या महिलेने याचा साधा निषेध देखील केलेला नाही! गेल्या वीस-पंचवीस वर्षांच्या काळात बळी पडलेल्या आठ-दहा हजार तरुणींकडे त्यांचे लक्ष कसे गेले नाही याचे आश्चर्य वाटते. एअरकंडिशण्ड बंगल्यात बसून फुरसतीच्या वेळात गरिबी, पिळवणूक, समाजवाद, राष्ट्रवाद हे विषय तोंडी लावणाऱ्या या महिलानेत्यांना या मुलींचे अश्रू दिसले नाहीत की काय? 'अरब प्रश्नामुळे' चांगल्या चांगल्या घरातील मुलींची कोंडी झालेली आहे. लग्नाची वये झाली तरी त्यांना तसेच थांबावे लागत आहे. ही कोंडी फोडण्या साठी निदान महिलानेत्यांनी तरी पुढे यायला हवे होते झाले ते झाले; पण या प्रश्नाकडे अजूनही दुर्लक्ष झाल्यास हा भस्मासुर आणखीच घरांत घुसणार आहे हे त्यांनी आता तरी समजून घ्यावे आणि त्या दृष्टीने संघटित होऊन पावले उचलावीत.

### मूळ प्रश्नाला फाटा

अरबांच्या प्रश्नात हिंदु–मुस्लिम एकत्रितपणे संघर्ष करीत असताना त्याला खीळ घालण्याचा कोणी खटाटोप केला असेल तर तो सा. मुनादीने. दिनांक ६ ऑगस्ट ८३ रोजी खैरुन्निसावर छापा घातल्यानंतर पंधरा दिवसांनी म्हणजे २२ ऑगस्ट ८३ ला सा. मुनादीचा अंक बाहेर पडला. या अंकात खैरुन्निसाच्या गैरकृत्यांचा एका शब्दानेही निषेध नाही. उलट त्यांनी हिंदु स्त्रिया मुस्लिम स्त्रियांपेक्षा अधिक चारित्र्यभ्रष्ट आहेत. अरबांच्या चाळचात हिदु स्त्रियांचा जास्त वाटा आहे, अशा प्रकारची निराधार आणि हिंदु–मुस्लिमात फूट पाडणारी विधाने केली आहेत. अरबांच्या संपर्कात येणारी स्त्री हिंदू आहे की मुस्लिम आहे, अरबांचे दलाल हिंदू की मुस्लिम असा भेदभाव करण्याचे कारण नाही. हा लढा आहे तो नीच कृत्ये करणारी परदेशी माणसे व त्याला विरोध करणारी भारतीय माणसे असा असताना त्यांनी दिशाभूल करून या लढ्याला धर्मवादी स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. सा. मुनादीने २२ ऑगस्ट ८३ चा हा अंक महाराष्ट्रातील अनेक दैनिकांकडे, साप्ताहिकांकडे, मासिकांकडे पाठविला तसा तो 'सा. माणूस'कडेही आला होता.

या साप्ताहिक मुनादीचे संपादक आहेत हरुन इनामदार. ते बी. कॉम. आहेत आणि अतिशय बुद्धिमान गृहस्थ आहेत; पण दुर्दैवाची बाब अशी की, त्यांनी आपल्या बुद्धीचा उपयोग हिंदु-मुस्लिम संघर्ष वाढविण्यासाठीच जास्तीत जास्त करावयाचा असे ठरविलेले दिसते. त्यांनी उपस्थित केलेले मुद्दे वस्तुस्थितीला किती धरून आहेत, त्यांनी छापलेली माहिती किती खरी आहे हे पाहणे प्रथम क्रमप्राप्त ठरते. मिरजेत मी प्रथम त्यांची भेट घेऊन त्यांची मुलाखत घेतली. मुलाखतीत मी विचारलेले प्रश्न आणि त्यांनी दिलेली उत्तरे हे ते नाकारू शकतात म्हणून त्यांच्या मुलाखतीपेक्षा त्यांनी मुनादीमधून दिलेल्या माहितीचा समाचार घेणे मी योग्य समजतो.

ते हिंदु एकता आंदोलनाचा उल्लेख जातीयवादी पोरकटांची टोळी असा करतात. त्या संघटनेविषयी त्यांचा काय दृष्टिकोन आहे, याचा मात्र विचार करण्याचे कारण नाही आणि हिंदु एकता संघटनेचे स्वरूप नेमके कोणते आहे व कसे योग्य याचे देखील मी समर्थन करण्याचे कारण नाही. त्या संघटनेचे नेते व ते बघून घेतील. मुद्दा असा की, हिंदु एकता ही जातीयवादी आहे की धर्मवादी? त्यांच्या ध्येयधोरणात तर सर्व जाती-पाती, वर्णभेद विसरून एकत्र येण्याचे आवाहन आहे. असे असताना हिंदु एकता जातीयवादी असेल तर मुनादीवाल्यांनी फिकीर करण्याचे कारण नाही. कारण ते जाती-जातीच्या भांडणात आपोआप नष्ट होतील आणि ते हिंदु धर्मवादी असतील तर 'जातीयवादी पोरकटांची टोळी' म्हणण्याचे कारण काय? हरुन इनामदारांना जसे 'जमियते उलमा-ए-हिंद'चे कार्य करावे वाटते, मुस्लिम संघटित करावे वाटतात, तसे हिंदु एकतावाल्यांनाही वाटते. हा काय 'वन वे ट्रॅफिक' आहे काय? फक्त मुनादीवाल्यांना जमियते उलमा ए-हिंदचे कार्य करायला परवानगी आणि हिंदु एकतावाल्यांनी हिंदुधर्माचे काम केले की तो जातीयवादी माकडे. त्यांना बंदी.

त्यांनी अरब–प्रकरणाच्या संदर्भात दिलेला मजकूर पाहण्याजोगा आहे. ते लिहितात... 'गेल्या पंधरवाडयात अरबांच्या लग्नप्रकरणाबद्दल स्थानिक वर्तमानपत्रांतून बराच गाजावाजा झाला आहे. हे प्रकरण इतके वाढण्यात आणि परिणामापर्यंत येण्यात स्थानिक अधिकारीच बहुतांशी जबाबदार आहेत. हे प्रकरण नेहमीचेच आणि इतके जुने झाले आहे की, याची वेगळी चर्चा करण्याची आवश्यकताच नाही; परंतु काही हलक्या आणि सत्य व आजपर्यंत जाणून-बुजून लपविण्यात येत असलेल्या बाबींची वाचकांसमोर चर्चा करणे आवश्यक आहे.





वृत्तपत्रात खैरुन्निसाच्या गैरकृत्यांचा गाजावाजा झाला यामागे ' मुनादी 'वाल्यांना नेमके काय म्हणायचे आहे ? हा गाजावाजा चुकीचा होता, खोटा होता की योग्य होता ? परिस्थिती हाताबाहेर जायला स्थानिक अधिकारी बहुतांशी जबाबदार आहेत, या त्यांच्या मताशी मी सहमत आहे; पण त्यापुढे ते जे म्हणतात, ' हे प्रकरण नेहमीचेच व जुने झाले आहे ', म्हणजे यापूर्वी खैरुन्निसावर धाडी घालण्याची अशी नाटके झाली होती काय ? नेहमीची म्हणजे नेमकी कशी ? आणि त्यांनी 'जुनी झाली' हा शब्द कोणत्या प्रकरणासाठी वापरला ? ६ ऑगस्टला खैरुन्निसावर छापा घातल्यानंतर त्याच महिन्यात २२ ऑगस्टला निघणाऱ्या मुनादीत हे प्रकरण जुने कसे काय होते ? आजपर्यंत मुनादीवाल्यांनी खैरुन्निसाच्या गैरकृत्यांवर प्रकाश टाकणारे किती अंक छापले हे समजेल काय ? खैरुन्निसाच्या घरी मुनादीवाल्यांचे उठणे-बसणे आहे. खैरुन्निसाच्या भावाच्या -मोहिद्दिनच्या सा. सत्यसमाचारची छपाई मुनादीवाले करतात. अर्थात हे त्यांचे वयक्तिक संबंध आहेत. त्यात कोणी नाक खुपसण्याचे कारण नाही; पण तिचे आडून समर्थन मुनादीवाल्यांनी करण्याचे कारण काय ? ' अरब–संदर्भात मुस्लिम समाजाची बदनामी करणाऱ्यांना ' सा. मुनादी 'ची ही ' चपराक पुरेल काय ?' हा जसा ' संशोधन ' पर अंक काढला तसा खैरुन्निसाच्या गैरकृत्यांवर प्रकाश टाकणारा अंक मुनादीवाल्यांनी यापूर्वीच काढायला हवा होता. ते का थांबले हे समजेल काय ? मुनादीवाल्यांना मरियनबी, खतेजा यांच्या डोळ्यातले पाणी दिसले नाही का ? एका मुलीचे तीन-तीन चार-चार विवाह इस्लामला मान्य आहेत का ? तेही दोन-तीन दिवसांच्या अंतराने मान्य आहेत का ? मुली थापा मारून, फूस लावून, फसवून पळवून आणणे, त्यांची बळजबरीने लग्ने लावणे हे इस्लामला मान्य आहे काय ? याची उत्तरे मुनादीवाल्यांनी आधी द्यावीत !

मुनादीवाल्यांनी डॉक्टरमंडळींची व लॉज-मालकांची नावे छापलीत ती मंडळी हिंदु आहेत म्हणून दिली आहेत. ते खरे आहे. मुनादीवाल्यांनी प्रत्यक्ष भेटीत मला सांगितलेल्या डॉक्टरांच्या बाबतीतले गैरप्रकारही खरे आहेत. लॉजवाले अनैतिक मार्गाने व्यवसाय करतात हेही तपासून ते सत्य निघाले; पण त्यांनी तव्बक म्हणून दिलेल्या हिंदु महिलांची नावे खरी आहेत काय ? तव्बक हा अलीकडचा प्रकार; पण तत्पूर्वी अरबांबरोबर विवाह करणाऱ्या मुली पूर्णपणे मुस्लिम आहेत. हिंदु मुली म्हणून त्यांना जी नावे दिली आहेत ती कशी ओळखायची ? भारतातच नव्हे तर इतरत्र देखील कोणतीही व्यक्ती एका नावाने ओळखली जात नाही. त्या व्यक्तीचे नाव त्यानंतर बापाचे नाव आणि नंतर आडनाव ही परिपूर्ण ओळख झाली. ' नागा, भागा, सुमती ' वगैरे वगैरे जी नावे आहेत ती कोणाची ? अशा नावांच्या कमीत कमी पाच हजार मुली निघतील. मुनादीवाल्यांनी पूर्ण नावे द्यावीत. पोलिसांनी या नावांपैकी कोणाला अटक केलेली नाही. पोलिसांनी ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यात पकडलेल्या (१) सतव्वा कल्लाप्पा कांबळे (२) कस्तुरी आडव्याप्पा बाग (३) मुन्ना नबाबली पठाण (४) मीरा रंगराव पवार (५) शालिनी शिवाजी माने (६) रहेजा जैबुद्दीन मणेर (७) अलका बाबुराव गद्रे (८) अरुणा शंकर पवार (९) मंगल यशवंत कांबळे (१०) सुरय्या हनीफ शेख (११) मुन्नी हनीफ शेख (१२) शमसाद जैनुद्दिन बागवान (१३) शामा शिवप्पा जाधव (१४) मीरा श्रीपती खोत (१५) मीरा रंगराव पवार (१६) कांताबाई बाब कांबळे (१७) सक्साना रमजान अली शेख (१८) मिलीना बी. टी (१९) ऑलिव्हा बी. टी. (२०) उमा प्रामाणिक गायकवाड (२१) कमल तुकाराम गायकवाड (२२) राधाबाई भागवत कांबळे (२२) शबीना फरीद मोमीन (२४) नागाबाई सदाशिव गद्रे (२५) मारतन मरबुसकर (२६) इंदिराबाई अंबादास व्हटकर (२७) खातमा महंमद हुसेन मौला (२८) सिंधु दामू गाढवे (२९) नंदा यशवंत पांडव (३०) सुशील बसप्पा नाईक (३१) इंदू पांडू (३२) जैतुनबी. या बत्तीसजणी आहेत. या सर्व वेश्याव्यवसाय करणाऱ्या आहेत. येथे जातीधर्माचा प्रश्न येतो कुठे ? वेश्येला हिंदु, मुस्लिम आणि अरबदेखील सारखेच आणि पोलिसांनी या सर्वांना कोर्टात उभे केलेले आहे. त्यांना दंडदेखील झालेला आहे. ' नागा, ' भागा, उमा, सुमती, मीना, सखु, अबु, माला, बेबी ही सर्व नावे काल्पनिक आहेत. तेव्हा मुनादीवाल्यांनी परत एकदा अरबांबरोबर लग्ने केलेल्या हिंदु मुलींची, हिंदु एजंटांची, तसेच दुभाषा व संबंधितांची पूर्ण नावे प्रसिद्ध करावीत. नावे रजिस्टरलीच आहेत, तेव्हा त्यांचे पत्तेही छापणे शक्य आहे.


## ' अरब हटाव ' की ' वेश्या हटाव '

किती हिंदु तरुणींनी मुस्लिम नावे धारण करून लग्न लावले ? ते लग्न लावणारे काझी कोण ? याची सविस्तर माहिती द्यावी. खैरुन्निसाच्या घरी ज्या पोरी सापडल्या त्या सर्व मुस्लिमच आहेत. गरीबीयन, नत्राज, फोटोवाली फातिमा व अन्य दोघी-तिघी लग्ने लावणाऱ्या मुस्लिम स्त्रियांनी आतापर्यंत जी लग्ने अरबांच्या बरोबर लावून दिली आहेत त्या सर्व मुली मुस्लिमच आहेत. शासकीय अधिकाऱ्यांनी घेतलेल्या ' सँपल सर्व्हे ' मध्ये किंवा १९७७ ते ८१

किसी ने पूछा, मुहब्बत है क्या बता, ऐ 'अश्क' ।
जबाँ कह न सकी, बस्, आँख भर आयी ।।

गुलशन-ए-ग़ज़ल



मराठी मुक्तार्थासहित
ग़ज़ल संग्रह
प्रा. टी. के. जाधव
किरण प्रकाशन, पुणे ३०
प्रमुख विक्रेते :
मॅजेस्टिक बुक स्टॉल पुणे.



श्रीपद्मा

मूल्य २० रुपये । सर्व प्रमुख पुस्तक-विक्रेत्यांकडे उपलब्ध

या काळात झालेल्या ८४१ लग्नाच्या नोंदीत एकही हिंदु मुलगी नाही. लग्न लावणाऱ्या चार-पाच काझींना भेटलो. त्यांनी देखील एकाही हिंदु मुलीचे नाव दिले नाही. मुनादीवाल्यांना माहीत असतील तर त्यांनी ती अवश्य छापावीत; पण, उमा, छाया, कला असे न छापता संपूर्ण नावे छापावीत.

मुस्लिमांची, मुस्लिम धर्माची बदनामी हिंदु एकतेने किंवा अन्य कोणी केली नाही तर ती परकीय अरबांनी केली आहे. अरबांच्या गैरकृत्याचे समर्थन करायचे आणि बदनामी करता म्हणून इतरांना झोडपत सुटायचे ही कुठली नीती ? अरब जे करतो त्यापेक्षा अरबाबद्दल जो बोलतो तो गुन्हेगार हा कोठला तर्क ? मुनादीला माहीत नसेल तर माहीत करून घ्या. 'अरब हटाव' ही पहिली घोषणा आणि आंदोलन प्रथम कोणी केले असेल तर मुस्लिमांनी, त्या वेळी हिंदु एकतेचा जन्म देखील झालेला नव्हता. हिंदु एकतेच्या आधी १९७७ च्या इद निमित्ताने मुस्लिम समाजातील सुजाण लोकांनी एक पत्रक काढून अरबांवर पहिली तोफ डागली हे तुम्ही जाणून घ्या. भाषेचा फुलोरा निर्माण करून सत्य दडपता येत नसते.

हिंदु एकताने आतापर्यंत जे 'अरब हटाव' आंदोलन केले त्यात कुठेही हिंदु स्त्री किंवा मुस्लिम स्त्री असे म्हटलेले नाही. प्रत्येक ठिकाणी त्यांनी भारतीय स्त्री असा उल्लेख केलेला आहे. हा सर्व प्रश्न भारतीय विरुद्ध परदेशी अशा संदर्भातच लढविला जात आहे. आंदोलनात जातीधर्माचा कुठेही उल्लेख नाही हा भारतीय स्त्रियांच्या पिळवणुकीचा प्रश्न आहे असे स्पष्टपणे नमूद असताना त्यांना मुनादीवाले झोडपत सुटले आहेत लेखात त्यांनी ठिकठिकाणी 'पतिव्रता, शुद्ध भारतीय नारी' असे शब्द वारंवार टवाळी करण्याच्या उद्देशाने वापरून त्यांनी स्वतःच्याच समाजातील स्त्रियांची हेटाळणी केली आहे. महमद पैगंबराच्या आवडत्या आणि अखेरच्या पत्नीला 'मादरे उम्मत' म्हणजे सर्व मुस्लिम धर्मीयांची माता असे म्हटले जाते. ऊठसूट 'कुराण' 'शरीयत'चे दाखले देणाऱ्या मुनादीवाल्यांच्या डोक्यात कुराणात सांगितलेले स्त्रीसमतेचे विचार कधीच कसे डोकावत नाहीत याचे आश्चर्य वाटते. मुलगी ही पापाची निशाणी समजून तिला जन्मताच ठार मारण्याची प्रथा ज्या काळात होती त्या काळात महमद पैगंबरांनी स्त्रियांचा छळ थांबविण्यासाठी संघर्ष केला आणि त्यांचे अनुयायी म्हणणारे मुनादीवाले स्त्रियांच्या अत्याचाराकडे सरळ डोळेझाक करून त्यांची टवाळी करतात हे समजून घेणे गरजेचे आहे. हिंदु एकताचे काही कार्यकर्ते चुकीच्या मार्गाने गेलेही असतील. त्यांनी केलेल्या गुंडगिरीचे, अरेरावीचे किंवा गैरवर्तनाचे मी कुठेही समर्थन करीत नाही; पण त्यासाठी 'अरब हटाव' मोहिमेवर त्यांनी दुगाण्या झाडण्याचे कारण नाही.

अरबांचा मूळ प्रश्न समजून न घेता वेश्याव्यवसाय हटविणे आणि 'अरब हटविणे' याची मुनादीवाल्यांनी घातलेली सांगड हास्यास्पद आहे. अरब परदेशी आहेत आणि ते ज्या स्त्रियांचा छळ करतात त्या स्त्रिया भारतीय आहेत हे मुनादीवाल्यांनी प्रथम लक्षात घ्यावे. या देशातली स्त्री मग ती कोणत्याही जाती-धर्माची असो किंवा वेश्या असो ती आम्हाला परकीय अरबांपेक्षा निश्चितपणे जवळची आहे. तिच्या संरक्षणासाठी आम्ही धडपडणारच ! तेव्हा 'अरब हटाव' पेक्षा 'वेश्या हटाव' मोहीम हाती घेण्याचा शहाजोग सल्ला मुनादीवाल्यांनी देऊ नये !

मुनादीवाल्यांनी सदर अंकात, 'मुस्लिमांनी देखील अरब हटाव मोहिमेत सहभागी व्हावे कारण त्यामुळे बिगरमुस्लिमांचे अधिक नुकसान होईल' असे जे आवाहन केले आहे ते अत्यंत चुकीचे आहे. हिंदु-मुस्लिम समाजात दुरावा उत्पन्न करणारे आहे. या त्यांच्या विचारावरून मुनादीवाल्यांची अराष्ट्रीय प्रवृत्ती स्पष्ट होते. निदान त्यांनी अरबाकडून घेतलेल्या पैशांशी तरी इमान ठेवावे. आजपर्यंत अरब लोकांनी एकट्या मिरजेत शभराच्या वर मज्जिदींचे नूतनीकरण केलेले आहे. त्यासाठी पन्नास लाख रुपयांवर रक्कम खर्ची पडलेली आहे. सबंध महाराष्ट्रात ५ अब्जांपेक्षा अधिक रक्कम गेल्या काही वर्षांत मज्जिदींच्या बांधकामासाठी उपयोगात आणलेली आहे. हा सर्व पैसा अरबाकडून आहे आणि तो केवळ मुस्लिम समाजासाठीच वापरला गेला आहे. हे मुनादीवाले सोयिस्करपणे विसरतात. सौदीअरेबियातील जेद्दाह येथून 'मुस्लिम वर्ल्ड' या मक्का येथील संघटनेने दि नॅशनल कमर्शियल बँकेच्या नावावर पाठविलेले व मुंबईतील बँक ऑफ अमेरिकामधून ते सहा ड्राफ्ट वटविले गेल्याचे वृत्त यापूर्वीच प्रसिद्ध झालेले आहे. हा पैसा मुस्लिम समाजासाठी नाही तर कोणासाठी येतो याचे उत्तर 'मुनादी'वाले यांनी द्यावे.

दिनांक १० ऑक्टोबरच्या 'सा. मुनादी' च्या अंकात इनामदार यांनी, 'मुस्लिम पर्सनल लॉच्या दृष्टिकोनातून निकाह, तलाक, खुला' या मथळ्याचा लेख लिहिला आहे. त्यात ते काय म्हणतात ते पाहू. 'तलाक आणि न्यायालय' या परिच्छेदात ते म्हणतात—

...' पति योग्य कारणास्तव कोणत्याही न्यायालयातन जाता देखील शरीयत अॅक्टप्रमाणे आपल्या पत्नीला तलाक देऊ शकतो. तथापि न्यायालयात जाऊन तलाक घेण्याबाबत जमियेत–उलमा–ए–हिंदने स्पष्टपणे म्हटले आहे की, '–जमियते–उल्मा–ए–हिंद हे स्पष्ट करू इच्छिते की, अगर एखाद्या गैरमुस्लिम न्यायाधिशाने एखादा विवाह संपुष्टात आला आहे असा निकाल दिला असेल तरीही शरीयतच्या दृष्टिकोनातून तो विवाह संपुष्टात आला असे समजले जाणार नाही. तसेच एखाद्या स्त्रीने एखाद्या गैरमुस्लिम न्यायालयातून तलाकचा निर्णय घेऊन दुसऱ्या व्यक्तीबरोबर विवाह केल्यास त्यास शरीयतप्रमाणे व्यभिचार समजण्यात येईल'

## शरीयतचा आधार कशाला ?

याचा अर्थ, समजा भारताचे सर्वोच्च न्यायमूर्ती श्री. चंद्रचूड यांनी एखाद्या मुस्लिम स्त्रीचा तलाकचा अर्ज विचारात घेतला तर ते जमियते–उल्मा–ए–हिंदला मान्य नाही. तसेच मुस्लिम स्त्रीने श्री. चंद्रचूड यांच्या न्यायालयात तलाक घेऊन दुसरा विवाह केला तर तो व्यभिचार समजला जाईल. थोडक्यात कोणत्याही हिंदु न्यायाधिशाला हा अधिकार पोचत नाही असे त्यांचे म्हणणे आहे.

जमियते–उल्मा–ए–हिंद ही काही सर्व मुस्लिमांची प्रातिनिधिक संघटना नाही. काही मूठभर माथेफिरूंचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संघटनेला 'विवाहाच्या' संदर्भात लक्ष घालण्याचा मुळी अधिकारच काय ? जमियते–उल्मा–ए–हिंदच्या आदेशानुसार लग्ने लावावीत, तलाक घ्यावेत, काजीची नियुक्ती करावी असे कुठे शरीयतमध्ये

लिहिले आहे का ? सर्व काही शरीयतच्या आदेशाप्रमाणे करायचे असे असताना 'जमियते–उलमा–ए–हिंदला–लग्ने लावण्याचे, तलाक देण्याचे अधिकार कोणी वहाल केले ? याची उत्तरे मुनादीवाल्यांनी द्यावीत आणि मग आदेश काढावेत.


'मुस्लिम पर्सनल लॉच्या दृष्टिकोनातून परदेशीयांची भारतात लग्ने' या मथळ्याखाली ते लिहितात– लग्नाची लेखी नोंद ठेवणे आवश्यक नाही. मुस्लिम विचारांचे मक्तेदार असल्याच्या थाटात हा आदेश देऊन ते पुढे लिहितात.......

...'मुस्लिम पर्सनल लॉ हा कायदा सर्व जगभरात किरकोळ अपवाद वगळता एकसारखाच आहे. लग्नाबाबत तर जगात सर्वत्र मुस्लिम शरीयत अॅक्ट हा एकच कायदा लागू आहे. या कायद्यानुसार मुसलमानांच्या लग्नाबाबत कोणतीही लेखी टाकी नोंद रजिस्टर करण्याची अजिबात आवश्यकता नाही. वधू–वरांना आवश्यक वाटल्यास त्यांना स्वत: तशी नोंद ठेवता येईल. सरकारदरबारी याची नोंद झालीच पाहिजे असा आग्रह कोणासही धरता येणार नाही. भारतात येणाऱ्या कोणत्याही परदेशी व्यक्तीने शरीयत कायद्यानुसार मुसलमान स्त्रीने पुरुषाशी योग्य प्रकारे लग्न केल्यास त्याच्यावर देखील नोंद किंवा रजिस्टर करण्याचे बंधन घालता येणार नाही. समाजाकडून अथवा एखाद्या मान्यताप्राप्त संस्थेकडून मान्यता मिळालेल्या काझीने हे लग्न लावल्यास व हे लग्न सर्व प्रकारे योग्य असल्याचे मान्य केल्यास प्रचलित शासनास यात हस्तक्षेप करता येणार नाही. जर कोणी मुस्लिमांची लग्ने नोंद–रजिस्टर झालीच पाहिजेत असे म्हणत असतील तर ते उघड उघड शरीयत कायद्याला आव्हान देत आहेत असेच समजण्यात येईल.ज्या प्रसंगी लग्नाबाबत पेच निर्माण होईल त्या वेळी मान्यताप्राप्त काझीच त्याचा निर्णय देईल व मुस्लिमांवर तो बंधनकारक राहील.

मुस्लिमांच्या लग्नाबाबत, ते लग्न भारतीय असो वा परदेशीय मुस्लिम असो वर नमूद केल्याप्रमाणे, वधू–वराच्या आवश्यकतेनुसार दाखला हवा असल्यास त्याने मान्यताप्राप्त काझीचाच दाखला घेतला पाहिजे व तो दाखलाच अंतिम मानला जाईल. काझीनेदेखील लग्ने लावताना कायदेशीररीत्या आवश्यक त्या सर्व बाबींची दखल घेऊन हा दाखला द्यावा लागतो. जमातीची अथवा संस्थेची काझी केव्हाही याबाबतीत गफलत करू शकत नाही. कारण त्याच्यावर याबाबत समाजाचे आणि धर्माचे फार मोठे दडपण असते.

'मुस्लिमांच्या लग्नप्रकरणात जर ते शरीयत अॅक्टनुसार तंतोतंत होत असेल व तरतुदीची योग्य पूर्तता होत असेल तर कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याला यात हस्तक्षेप करता येणार नाही. जर अशा प्रकारच्या लग्नाबाबत काही वाद उत्पन्न झाल्यास त्याचा निवाडाही शरीयतप्रमाणेच झाला पाहिजे. इत्यादी ! इत्यादी !


# आणखी एक पेन्शन !



**निवृत्ती नंतर, आपण आयुष्यभर केलेल्या सेवेची भरपाई म्हणून आपल्याला, निवृत्ती वेतन, प्रॉव्हिडंड फंड ग्रॅच्युइटी इ. फायदे मिळणारच!**

**पण मिंटीच्या सदाफुली सारख्या योजनेत काही वर्ष बचत केलीत तर आणखी एक हक्काची पेन्शन सुरु होईल**

**केवळ आपल्यालाच नव्हे तर वारसांना देखील ! अधिक माहितीसाठी आपल्या नजिकच्या आमच्या शाखेस भेट द्या.**

**बँक ऑफ महाराष्ट्र**

(भारत सरकारचा उपक्रम)

मुख्य कचेरी : "लोकमंगल" शिवाजीनगर पुणे – ४११ ००५

## या प्रश्नांची उत्तरे ?

मुनादीवाले प्रारंभी 'काही अल्प अपवाद वगळता जगभर शरीयत कायदा अस्तित्वात आहे असे म्हणतात. एक तर त्याना माहिती नसावी किंवा माहिती असून ते अडाण्याचे सोग घेत असावेत. जगात कुठेही– म्हणजे घोषित मुस्लिम राष्ट्रात–शरीयतची तंतोतंत अंमलबजावणी होत नाही. इतकेच कशाला आपल्या शेजारचे पाकिस्तान हे देखील घोषित इस्लामी राष्ट्र असताना तेथे शरीयत कायद्यात बदल करण्यात आलेले आहेत, हे मुनादीवाल्यांनी कोणाला तरी विचारून घ्यावे. दिल्लीत पंचवीस वर्षे स्पेशलजज्ज म्हणून काम करणारे निवृत्त न्यायमूर्ती एस्. अझीझ म्हणतात, 'शरीयत हा अल्लाचा कायदा असल्याने त्यात बदल करणे खपवून घेतले जाणार नाही अशा वल्गनाना आपण बळी पडलो तर मुस्लिम स्त्रिया कधीच सुधारणार नाहीत.' याच संदर्भात मार्च १९७८ मध्ये 'मुस्लिम समाजातील स्त्रीचे स्थान' या विषयावर अलीगड मुस्लिम युनिव्हर्सिटीत एक चर्चासत्र झाले होते. त्याचे उद्घाटन माजी सरन्यायाधीश न्या. एम. एच. बेग यांनी केले होते. या वेळी बोलताना ते म्हणाले की, 'लग्न आणि फारकत यासारखे प्रश्न मुस्लिम व्यक्तिगत कायद्यान्वये सोडवण्याचा आग्रह धरणे चुकीचे आहे. त्यासाठी समान नागरी कायदा हवा आणि मुस्लिम स्त्रियांनी समान नागरी कायद्याचा पुरस्कार करणे मुस्लिम समाजाच्या हिताचे आहे. त्यासाठी मुस्लिम स्त्रियांनी पुढे यावे' असेही ते म्हणाले. मुनादीवाल्यांनी निदान न्या. बेग यांच्या म्हणण्याचा अर्थ तरी समजून घ्यावा.

'ज्याचे जळते त्यालाच समजते' अशी एक मराठीत म्हण आहे. शरीयतच्या वेदना मुनादीवाल्यानां समजणाऱ्या नाहीत. त्या वेदना मुस्लिम भगिनीच जाणोत ! अल्पसंख्याक आयोगाकडे १९७९ मध्ये अमरावतीच्या मुस्लिम सोशल असोसिएशनच्या 'तलाकपीडित महिला इमदाद' अशा गंगा–जमनी नावाच्या विभागातर्फे बेगम मेहरुन्निसा अब्दुल अजीज बारी, बेगम अहमदी, रझिया मन्सूर बी. ए., रझिया पटेल, शहनाझ परवीन वगैरे स्त्रियांनी निवेदन पाठवून त्यात ज्या मागण्या केल्या होत्या त्यात एक बायको हयात असताना दुसरा निकाह करण्याची परवानगी असू नये. काही विशिष्ट कारणांसाठी असे करायची पाळी आली तर पहिल्या पत्नीची अनुमती त्यासाठी आवश्यक समजावी, जबानी तलाक हा गुन्हा समजण्यात यावा, न्यायालयाच्या समतीने आणि ठोस कारणे असतील तरच तलाक देता यावा, इत्यादी मागण्या केलेल्या आहेत. त्याचा जरा विचार मुनादीवाल्यांनी करावा.

शरीयतमध्ये पब्लिक लॉ, कमर्शियल लॉ, प्रॉपर्टी ट्रस्ट, कॉन्ट्रॅक्ट या सर्वच गोष्टीचा समावेश आहे. इस्लामी कायद्यात गुन्हेगारांचे हात–पाय तोडावे, व्यभिचार करणाऱ्या मुस्लिमास दगडाने ठेचावे, त्याचप्रमाणे व्याज घेणारे व इतर गुन्हे करणाऱ्याना फटके मारण्यापासून डोळे काढण्यापर्यंत अनेक प्रकारच्या शिक्षा सागितलेल्या आहेत; पण मुनादीवाल्यांना सर्व शरीयत नको आहे. त्यांना फक्त शरीयतमधील विवाहाबाबतच्या सवलती तेवढ्या हव्या आहेत. शरीयत लागू करायचा तर संपूर्ण का नको ?

## आणखी काही प्रश्न

या ठिकाणी–१) खैरुन्निसाने पळवून आणलेल्या मुलीचे विवाह शरीयतप्रमाणे आहेत का ?

२) खैरुन्निसाने लग्नाच्या वेळी बोलावलेले काझी मान्यताप्राप्त आहेत का ?

३) एका मुलीचे महिनाभरात चार-चार विवाह शरीयतला मान्य आहेत का ?

४) मुली पळवून आणून विवाह बळजबरीने लावणे शरीयतला मान्य आहे का ?

५) दिले गेलेले तलाक शरीयतप्रमाणे आहेत का ?

हे सर्व शरीयतप्रमाणे नसेल तर मुनादीवाल्यानी आवाज का उठविला नाही ? आणि असेल तर मुनादीवाले तिच्या बाजूने लोकांपुढे का येत नाहीत ? आडून का बोलतात ? खैरुन्निसाची लावलेल्या लग्नाबाबतची प्रकरणे कोणापुढे चालविणे योग्य याचेही उत्तर मुनादीवाल्यांनी देऊन टाकावे

'योग्य तरतुदीनुसार लॉजिंगमध्ये प्रवेश मागणाऱ्या परदेशीय मुस्लिम नागरिकास व त्याच्या भारतीय पत्नीला लॉजिंगवाल्यांनी अग्रक्रम दिला पाहिजे' असे म्हणून मुनादीवाले अरबांचे समर्थन करतात; पण अरबस्थानात तुम्हाला भारतीय नागरिक या नात्याने आणि भारतीय मुस्लिम म्हणून तिथे काय स्थान आहे ? तिथे शरीयतप्रमाणे तशा सवलती आहेत का याचाही त्यांनी विचार करावा. मिरजेतल्या अरबाचा प्रश्न हा कोणत्याही जातीधर्माशी संबंधित प्रश्न नसताना आणि तो पूर्णपणे परदेशीय नागरिकत्वाचा प्रश्न असताना त्याचा धर्मसंघर्षासाठी उपयोग करण्याचा मुनादीवाल्यांचा प्रयत्न केविलवाणा आहे.

सा. मुनादीने २२ ऑगस्ट ८३ चा अंक सर्वांना पाठविला होता. त्या अंकावरून 'मुल्क परम्स' नावाने दै. सकाळमध्ये लिखाण करणाऱ्या लेखकानी आणि 'श्रमिक विचार' ने काही लेख लिहिले आहेत. मिरजेत जाऊन वस्तुस्थिती न पाहता, तेथे कोणालाही न भेटता व परिस्थितीचा अभ्यास न करता असे एकांगी लिखाण कितपत योग्य आहे ? या मंडळींनी मुनादीवाल्यांचे विचार समजून घेण्यासाठी 'मुनादी' चे इतर अंकही वाचायला हवे होते. निदान आता तरी त्यानी ते चाळावेत. १० ऑक्टोबर ८३ चा तरी अंक जरूर चाळावा !

श्री. हुसेन इनामदार सुशिक्षित आहेत, बुद्धिमान आहेत. त्यांनी धर्मपालन करू नये असे माझे म्हणणे नाही. उलट सच्चा मुस्लिमाबद्दल मला निश्चितपणे आदर आहे. समाजाचे, राष्ट्राचे हित लक्षात घ्यावे. हिंदु–मुस्लिम एकसंध राहण्यात, एकात्म बनण्यात देशाचे व समाजाचे कल्याण आहे. त्यासाठी त्यानी जागृती करावी. वर्षानुवर्षे खितपत असलेला समाज वैचारिकदृष्ट्या परिपक्व करण्यासाठी प्रयत्न करावेत. ती काळाची गरजच आहे.

( क्रमशः )

चित्रपट

# उत्कृष्ट अभिनय, अनाकलनीय शेवट—मंडी

वेश्यांच्या कोठीवर एक मुकी-बहिरी मुलगी जबरदस्तीने आणली जाते कोठीच्या मालकिणीने धंद्याला लावायचा प्रयत्न केल्यावर ती मुलगी आत्महत्या करण्याचा प्रयत्न करते. 'नारीनिकेतन'च्या बायका तिला आपल्या ताब्यात घेतात. पुढे त्या मुलीचे काय होते हे काहीही न दाखवता अचानक शेवटी ती मुलगी कोठीच्या मालकिणीकडे परत येते असे कळल्यावर त्याचा नेमका अर्थ काय घ्यायचा? 'मंडी' चित्रपट पाहिल्यावर प्रेक्षक असाच बुचकळ्यात पडतो.

वेश्यांच्या जीवनावरची कॉमेडी 'मंडी' अशी श्याम बेनेगलांच्या नवीन चित्रपटाची जाहिरात वाचली होती बेनेगलांसारख्या समर्थ दिग्दर्शकाची 'कॉमेडी' ही तितकीच उत्कृष्ट असणार (निशांत, अंकुर इतकी) अशा अपेक्षेने काही प्रेक्षक येतात, तर काही 'वेश्या' शब्दाच्या जादूने येतात. दोघेही सारखेच निराश होतात!

दुसऱ्या गटाची निराशा ही मात्र बेनेगलांच्या दृष्टीने जमेची बाजू आहे. याचे कारण असे की, वेश्यावरचा चित्रपट असूनही कुठेही भडक, अश्लील दृश्य सापडत नाही कथेची मागणी या नावाखाली बेनेगलांना हवी ती दृश्यं घेता आली असती; पण काही मोजक्या प्रसंगातूनच ते सूचित केले आहे.

कथा थोडक्यात अशी – रुक्मिणीदेवी (शबाना) या वयस्क वेश्येची एक कोठी. कोठीवर १०–१५ मुली, टुमरुज (नसिरुद्दीन शाह) फोटोग्राफर रामगोपाल (ओम पुरी), एक हवालदार–हे या कोठीचे अविभाज्य भाग गावातला मोठा उद्योगपती गुप्ता (कुलभूषण खरबंदा) पैशाच्या जोरावर राजकारण करत असतो. कॉर्पोरेटर (सईद जाफरी), 'नारीनिकेतन'च्या शांतीदेवी (गीता सिद्धार्थ) हे गुप्ताच्या पटावरचे बाकीचे मोहरे.

कॉर्पोरेटरची अनौरस मुलगी जीनत (स्मिता पाटील) रुक्मिणीदेवीकडे लाडाकोडात वाढते आहे. वेश्येकडे असूनही, वयाच्या विशीतही निरागस राहिलेली ही जीनत. कॉर्पोरेटरचा मुलगा तिच्या प्रेमात पडतो. गुपित फुटू न देता दोघाना वेगळे कसे करायचे हा रुक्मिणीदेवीपुढचा पेच. पुढे ती दोघेजण पळून जातात.

गुप्ताच्या कारवायांनी रुक्मिणीदेवी बेघर होते, गुप्ताच्याच मदतीने पुन्हा कोठी वसवते, त्याच्याच 'कृपेने' परत बेघर होते, मग मात्र एकटीच तिथून बाहेर पडते आणि 'शिवाजी'च्या कृपेने मुकी–बहिरी मुलगी आश्रमातून पळून आल्यावर पुन्हा कोठी उभी करायची स्वप्ने पाहू लागते.

वेश्यांचे जीवन कसे असते, हे या कथेच्या चौकटीत मांडायचा प्रयत्न झाला आहे. हिंदु, मुसलमान, आगाऊ–गरीब सगळ्या मुलींना रुक्मिणीदेवी प्रेमाने वागवते आहे. (रुक्मिणीदेवीच्या भूमिकेतल्या शबानाला पाहताना वारंवार '—आहिस्ताआहिस्ता'तल्या शशिकलाची आठवण येत होती.) आम्ही 'कलाकार' आहोत, पुरुषाकडून फसवलो गेलो अशी तिची कायम तक्रार आहे. राजकारणी डावपेच खेळण्यात हीही पटाईत!

'कॉमेडी' अशी या चित्रपटाची का जाहिरात झाली हे कुठेच कळत नाही. कोठीवरच्या मुलींच्या खोड्या, विनोद– 'विनोद' असले तरी आपल्या मनात कुठे तरी कणव निर्माण करतात. हवालदाराचे पात्र आणि संवाद मात्र केवळ विनोदनिर्मितीसाठीच आहे तसेच कॉर्पोरेटरचा मुलगा–सुशील याने पात्र मात्र दिग्दर्शकाच्या मनात असो–नसो भरपूर विनोद निर्माण करते. हा सुशील इतका नेभळट, कणा नसलेला दाखवला आहे की असेच पात्र निवडण्यामागचे प्रयोजन कळत नाही.

टुमरुज–हा जो रुक्मिणीदेवीचा नोकर दाखवला आहे त्याला रुक्मिणीदेवीच्या पेशाविषयी विलक्षण संताप! रात्री दारू पोटात गेल्यावर तो संताप व्यक्त होतो आणि प्रचंड आरडाओरड करत तो रुक्मिणीदेवीला शिव्या देतो. दुर्दैवाची गोष्ट एवढीच की, नसिरुद्दीनच्या बोलण्यामुळे अथवा वाईट रेकॉर्डिंगमुळे तो काय म्हणतोय हेच कळत नाही. काही बालिश हालचालींतून टुमरुजचे पात्रही विनोदी करण्याचा एक केविलवाणा प्रयत्न झाला आहे.

बेनेगली साच्यात कुठेच न बसणाऱ्या आणि सर्वसाधारण विवेकबुद्धीला न पटणाऱ्या अशा दोन गोष्टी या चित्रपटात घडतात. रुक्मिणीदेवीला राहत्या घरातून हाकलून दिल्यावर एका ओसाड जागी गुप्ता तिची सोय करतो. बांधकाम चालू असताना रुक्मिणीदेवीकडच्या मुली सगळ्या हालांना कंटाळून फुटून निघण्याची भाषा करतात. रुक्मिणीदेवी हताश होऊन एका खडकावर बसलेली असताना एक मांत्रिक (अमरीश पुरी) इथल्या 'बाबा खडकशा'ला नवस बोल असे तिला सांगतो. ती अनेक नवस बोलते आणि 'बाबा खडकशा'च्या कृपेने तिच्या सर्व कामना पूर्ण होतात.

कोठीवरच्या मुली एक होऊन रुक्मिणीदेवीला गुप्ताने दिलेल्या जागेतून तिची हकालपट्टी करतात. हताश रुक्मिणीदेवी टुमरुजसह तिरुपतीच्या वाटेला लागते. त्यांना एक शिवलिंग सापडते ती शिवलिंगाला नवस बोलते. आकाशवाणी होते आणि तत्क्षणी 'नारीनिकेतन'मधली मुकी-बहिरी फूलमणी हिच्याकडे पळून येते.

या सर्व गोष्टींची संगती कशी लावायची असा पेच पडतो. 'नारीनिकेतन'मधली देह विकण्याऐवजी प्राण त्यागायला तयार झालेली मुलगी आपणहून या धंद्याकडे परत येते असे दाखवून बेनेगलांना नक्की काय सूचित करायचे आहे? स्त्री-मुक्तीची टिंगल का वेश्याव्यवसायाची प्रतिष्ठा? हा प्रश्न अनुत्तरितच राहतो.

चित्रपटाची सगळ्यात जमेची बाजू म्हणजे ताकदवान कलाकारांचा देखणा अभिनय. शबाना आझमीने प्रेमळ कोठीवालीची भूमिका चालण्या–बोलण्याच्या, उठण्या–बसण्याच्या लकबींसह अप्रतिमपणे उभी केली आहे. ही भूमिका म्हणजे शबानाच्या कारकीर्दीतली एक महत्त्वाची पायरी आहे.

जीनतच्या भूमिकेतली स्मिता पाटील दिसतेही छान आणि नाचलीही बरी. निरागस मुलीचे काम तिने छान वठविले आहे.

सईद जाफ्री, ओम पुरी, अमरीश पुरी, नसिरुद्दीन शाह आणि कुलभूषण खरबंदा ह्या सर्वच कलाकारांनी आपल्या भूमिकांचे सोने केले आहे.

टायटल्स चालू असताना स्मिता पाटील गाताना दाखवलेली असल्याने तिच्याकडे पाहण्याच्या नादात श्रेयनामावली वाचलीच जात नाही हे मात्र नमूद करावेसे वाटते.

संगीत, चित्रण यात विशेष उल्लेखनीय काही नाही.

—उज्ज्वला लेले

# अर्धसत्य

## – विजय तेंडुलकर

[ मागील अंकात अर्धसत्य चित्रपटावरील परीक्षण– मुलाखती व प्रेक्षकचर्चा प्रसिद्ध झाली. त्या चित्रपटाचे पटकथा लेखक श्री. विजय तेंडुलकराची मुलाखत वेळेवर न आल्याने मागच्या अंकात प्रसिद्ध करता आली नाही, ती या अंकात ]

**प्रश्न** : श्री. दा. पानवलकर यांची 'सूर्य' ही कथा आणि तुमची पटकथा यामध्ये बराच फरक आहे तुमच्या पटकथेचा नायक वेळोवेळी बडखोरी करतो. याउलट पानवलकराच्या कथेचा नायक नौकरीच्या चाकोरीत रुळून जातो. अशा प्रकारचा फरक का झाला ?

**विजय तेंडुलकर** : असा फरक आहे त्याचे कारण माझी पटकथा ही पानवलकराच्या कथेपासून सुरू झालेली नाही. भागलपूर प्रकरण झालं तेव्हा मला जाणवल, वर्तमानपत्रातून येणाऱ्या बातम्या आणि प्रत्यक्ष घडणाऱ्या घटना त्यामागची कारणं यात फरक आहे. पोलिसयंत्रणेच्या कृतीचे धागेदोरे बाहेर असतात. या सगळयाचं चित्र आलं पाहिजे अस मला वाटलं. नेहरू फेलोशिप मिळाल्यावर ब्याहत्तर–चौऱ्याहत्तरमध्ये फिरताना पोलिसाचं जग मी जवळून पाहिलं. मला असं दिसायचं, पोलीसमध्ये येणारी तरुण मुलं अतिशय उमेदीनं यायची. आपण इथं काही तरी करून दाखवावं असा उत्साह त्याना असायचा. नतर ती झपाट्यानं बदलत जायची. साधारण दोन वर्षांत ती बदललेली –नोकरीच्या चाकोरीत –बसलेली दिसली. तेव्हा हे कथाबीज माझ्या मनात रुजलं. गोविंद निहलानीशी मी ते बोललो. पानवलकराची 'सूर्य' ही कथा मी वाचली होती. ती मला अतिशय आवडली होती. पानवलकर माझे मित्र आहेत. तेव्हा या कथेचा संदर्भ घ्यायचा मी ठरवलं. या कथेतले बरेच प्रसग मी घेतले.

**प्रश्न** : म्हणजे श्री. दा. पानवलकरांची कथा तुम्ही आधारभूत म्हणून घेतली असं म्हणता येईल का ?

**विजय तेंडुलकर** : आधारभूत असं म्हणता येणार नाही. त्या कथेत मुलाचा शेवटी बाप होतो तसं माझ्या पटकथेत नाही. पण पानवलकरांची कथा मला अतिशय आवडली होती !

**प्रश्न** : रामा शेट्टी, इतर अनेक पात्रे ही पूर्णपणे तुमची निर्मिती आहे. ज्योत्स्नाचाही मूळ कथेत अगदी उडता उल्लेख आहे तुमच्या कथेत ती एक महत्त्वाची व्यक्ती आहे. याबद्दल काय म्हणाल ?

**विजय तेंडुलकर** : कथेच्या ओघात, पोलीसयत्रणेच चित्र दाखवताना रामा शेट्टी आणि इतर पात्रं येणं हे अपरिहार्यच होत. ज्योत्स्नालाही मी महत्त्व दिलच आहे. ते आवश्यक वाटलं.

**प्रश्न** : ज्योत्स्ना आणि अनंत वेलणकर याच्या ओळखीचा काळ फारच अल्प आहे. अवघ्या पाच–सहाच भेटीनतर तो दारू पिऊन नशेत तिला फोन करतो. अशा वेळी कोणतीही मध्यमवर्गीय मुलगी साधारणपणे घाबरून मित्राला तोडून टाकेल. ज्योत्स्नाही घाबरतेच, तरी त्याच्यात अडकून–गुतून रहाते ते पटत नाही.

**विजय तेंडुलकर** : 'स्त्रीमध्ये एक मातृत्वाचा गुण असतो. दुसऱ्याला समजावून घेण्याचा. त्यामुळे ज्योत्स्ना अनंतमध्ये गुतून रहाणं यात न पटण्यासारखं काही नाही. शिवाय इन्व्हॉल्व्हमेंटचा निश्चित पीरियड कसा मोजता येईल ? ही गोष्ट फार वैयक्तिक असते.

**प्रश्न** : ज्योत्स्ना एकदा अनत वेलणकरच्या घरी येते तेव्हा त्या चाळीत कोणाचा तरी मृत्यू झालेला असतो. प्रेत नेलेले, इतरत्र सगळी रडारड दाखवली आहे या प्रसगाला तसा कोणताच हेतु दिसत नाही. तुमच्यामते या प्रसगाच महत्त्व काय ?

**विजय तेंडुलकर** : या प्रसगाला तस काहीच महत्त्व नाही; पण इतर अनेक प्रसंगाच्या सीक्वेन्समध्ये हा प्रसग घेतला होता, तेव्हा त्याला एक सदर्भ होता. ते बाकीचे प्रसग नंतर वगळले तेव्हा या प्रसगाला तसा काहीच अर्थ उरला नाही; पण हा प्रसग दिग्दर्शकाला चागला वाटल्यामुळे तसाच ठेवला.

**प्रश्न** : अनताच्या भोवतालचे इन्स्पेक्टर सहकारी त्याच्याशी समजुतीने वागताना दिसलात. त्याच्यात आतरिक संघर्ष नाहीच. हे कसे शक्य ?

**विजय तेंडुलकर** : एकाच फिल्ममध्ये काय काय दाखवणार ? किती कोंबणार ? कथेच्या ओघात जेवढं दाखवणं शक्य आहे तेवढं दाखवलं. एकाच फिल्ममध्ये हे सबंध पोलीसजग दाखवणं हे फार कठीण आहे.

**प्रश्न** : अनंताच्या नोकरीला बारा वर्षे झाली आहेत, असा एक उल्लेख येतो. त्या मानाने तो फारच भाबडा वाटतो. आपण मारताना कुठच्या खुणा दिसणार नाहीत याची काळजी घेतली तरी मुद्दाम खुणा सहज निर्माण केल्या जातील एवढंही बारा वर्षांत त्याला समजू नये ? झोपडपट्टीतल्या माणसाचे हात बरपर्यंत कसे, कुठे पोचलेले असतात हेही त्याला कळू नये.

**विजय तेंडुलकर** : तो भाबडा, भोळसट मुळीच नाही. पोलीसलोक असं कैकजणाना मारत असतात. तो त्याच्या व्यवसायाचा भाग असतो. मारण्याची पद्धत असते. त्यात खुणा दिसत नाहीत. त्यात सापडण्याचा प्रश्नही नसतो. त्यामुळे खुणा दिसणार नाहीत म्हणजे आपण निर्दोष अशी अनताची कल्पना होते. मुद्दाम दोषी ठरवण्यासाठी खोटे पुरावे आणले जातील हे त्याच्या लक्षात येत नाही. कारण अशी हवी तेवढी प्रकरणं सहज निभावून नेलेली असतात. तो तसा सामान्यच आहे. फार बडखोर नाही आपण सर्वसामान्य लोक जशा तडजोडी करतो तशाच तोही करतो. त्यातून असहाय्यतेची भावना, मग तिची रिॲक्शन शेवटी शरणागती असं अनंताचं आहे. आपल्या समाजात हेच सगळीकडे दिसतं. तसं चित्र मी काढलं आहे.

**प्रश्न** : अनताच्या एकंदर व्यक्तिमत्त्वाचा एखादा भाग कवितेन घडविला आहे असं त्याच्या वागण्यावरून वाटत नाही. तसा तो रोखठोकच आहे. यामुळे त्याचं कवितेतलं गुरफटण, कवितेन अतर्मुख होण पटत नाही

**विजय तेंडुलकर** : अनता संवेदनाक्षम आहेच. तो स्वतः कविता करणारा नाही; पण कविता वाचतो. या संवेदनाक्षमतेमुळे आधी तो ही नोकरी स्वीकारायला तयारही नाही. मग या नोकरीत आल्यावर जी मारहाण वगैरे त्यात तो बसून जातो; पण मुळात तो संवेदनाक्षम आहे.

**प्रश्न** : चित्रपट ज्या काही पद्धतीने प्रेक्षकासमोर येतो त्याप्रमाणे ही एका समाजचित्राची कथा वाटते. एखादी घटना घडली की पोलिसाच्या जगात काय होतं, रामा शेट्टीच्या भोवताली काय घडतं, पांढरपेशाच्या सभागृहात त्याची प्रतिक्रिया कशी होते हे दिसत जातं; पण चित्रपटाचा शेवट मात्र समाजचित्रांच्या कथेचा न वाटता अनंताच्या कथेशी होतो. त्यामुळे तुटका, अचानक आहे असं नाही का वाटत ?

**विजय तेंडुलकर** : ही समाजचित्राची कथा आहे हे बरोबर; पण शेवट मला खटकत नाही. कारण ही एका व्यक्तीची कथा आहेच. ती व्यक्ती शेवटी काय करते हे दाखवलं.

**प्रश्न** : शेवटी अनंता आणि त्याचा सिनीअर समोरासमोर उभे आहेत. कथा म्हणून पूर्णत्व असेलही; पण पुढे काय याचा, या

समस्येतून मार्ग कोणता यासंबंधी स्पष्ट दिशा किंवा विचार येत नाही.

**विजय तेंडुलकर :** विचार दिलाच पाहिजे असं मला वाटत नाही. माझ्या चित्रपटाच्या शेवटापासून समाजात विचार सुरू झाला एवढंच मला पुरे आहे.

**प्रश्न :** तुम्ही आणि वसंत देव दोघांनी मिळून संवाद कसे लिहिले ?

**विजय तेंडुलकर :** माझ्या मराठी संवादांचं वसंत देव यांनी हिंदीत भाषांतर केलं. वसंत देवांनी माझ्या नाटकांचे हिंदीत अनुवादही केले आहेत.

**प्रश्न :** मी असं ऐकलं की, तुम्ही हिंदी चित्रपटांसाठी हिंदीत संवाद लिहिता पण तुमच नाव देत नाही.

**विजय तेंडुलकर :** नाही. संवाद मी हिंदीत लिहीत नाही. स्क्रिप्ट राईटिंग मी इंग्लिशमध्ये करतो. संवादही मी इंग्लिशमधे लिहून देतो; पण कधीकधी मला मुद्दाम मराठीत संवाद लिहायला लावतात आणि त्याचा हिंदीमध्ये अनुवाद केला जातो.

**प्रश्न :** चित्रपटाला 'अर्धसत्य' हे नाव फार योग्य वाटतं ! ते कोणी दिलं ?

**विजय तेंडुलकर :** ते मी दिलेलं नाही. ती दिग्दर्शक वगैरे लोकांची कामगिरी. मला 'सूर्य' आणि 'अर्धसत्य' ही दोन्ही नावं आवडली.

**मुलाखत – विनया खडपेकर**

# रंगभूमी

## पी. डी. ए. निर्मित

# झेप आणि झुंज

वि. भा. देशपांडे

'झेप आणि झुंज' हे एक नवे नाटक पुण्याच्या प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशन या नाट्यसंस्थेने नुकतेच पेश केले. याचे लेखक आहेत श्री. श्री. पु गोखले.

चरित्रात्मक नाटक ही आता आपल्याला सवयीची गोष्ट झाली आहे. मराठी नाटककाराला आणि मराठी प्रेक्षकालाही ! लोकमानसात गतकाळातील लक्षवेधी व्यक्तींबद्दल जाज्वल्य, उत्कट प्रेम असते. श्रेष्ठ, कर्तृत्ववान व्यक्तींविषयी आत्यंतिक स्वरूपाचे आदराचे स्थान असते, त्या व्यक्तींच्या जीवनचरित्रातून आदर्श जीवनाचा किंवा जीवनमूल्यांचा शोध घेण्याची वृत्ती असते. जनलोक त्या व्यक्तींच्या गुणांचे पूजन मनोमन करीत असतो. त्या पूजनातूनच काही व्यक्तींना विभूतिमत्त्व दिले जाते अथवा लाभते. हळूहळू ती प्रतिमा लोकमानसात आकार घेत जाते आणि पुढे दीर्घकाळपर्यंत स्थिरावते. नाटककार अशा लोकप्रसिद्ध प्रतिमांमधून व्यक्तिरेखनासाठी एखाद्या व्यक्तीची निवड करतो. तशी निवड श्री. पु. गोखले यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांची केली.

प्रस्तुत नाटकात गोखले यांनी सावरकरांच्या जीवनातला एक कालखंड निवडला, तो म्हणजे सावरकर अंदमानवरून परत आले आणि त्यांना रत्नागिरीला एका अर्थाने नजरकैदेत ठेवले गेले. त्यांच्यावर काही बंधने घातली गेली. त्यामध्ये एक महत्त्वाचे बंधन म्हणजे त्यांनी राजकारणाशी संबंधित काहीही करायचे नाही. सावरकरांसारखा गतिमान, कृतिशील, प्रज्ञावंत माणूस अशा महत्त्वपूर्ण कालखंडात सामान्य माणसाप्रमाणे स्थिरचित्त पद्धतीने थंड राहणे शक्यच नव्हता. त्यांनी समाजसेवेचे व्रत स्वीकारले. या व्रताचे सूत्र होते अस्पृश्यांच्या उद्धाराचे. पतितपावनमंदिराची स्थापना ही त्यातली कृतिपूर्ण अशी घटना. या कार्याच्या निमित्ताने सावरकरांनी केवळ रत्नागिरीपरिसरच नाही तर महाराष्ट्रातील सामाजिक जीवन वेगळ्या स्तरावर नेण्याचा प्रयत्न केला. सावरकरांच्या जीवनातील हे एक महत्त्वपूर्ण पर्व होऊन गेले.

या पर्वाला दिलेले नाट्यरूप मात्र प्रभावी होऊ शकले नाही, याला अनेक कारणे आहेत. लेखनाच्या दृष्टीने विचार करायचा तर सर्वप्रथम असे ध्यानात येते की, यातला संघर्ष पुरेशा ताकदीने उभा राहिलेला नाही. हा संघर्ष प्राधान्याने होता तो सावरकर आणि सनातनी यांच्या स्तरांवरचा. रूढीपरंपरेला वर्षानुवर्ष घट्ट चिकटून राहिलेल्या जनसमूहाला हलवायचे आणि त्यांच्यामध्ये समाजजीवनाची एक वेगळी जाणीव निर्माण करायची ही सामान्य गोष्ट नव्हती. तसे पाहिले तर अस्पृश्योद्धाराचे कार्य महाराष्ट्रात याही आधी किती तरी वर्षे आरंभित झाले होते; पण सावरकर ज्या ठिकाणी (रत्नागिरी) हे कार्य करीत होते तिथे प्रतिकूल परिस्थितीच आधिक्याने होती. त्या प्रतिकूलतेतून संघर्षाला येणारी धार महत्त्वाची होती. हा संघर्ष उभा करण्यासाठी नाटककाराने ज्या प्रसंगांची निवड केली ते प्रसंग दर्शनी नाट्यात्मकतेला किंवा संघर्ष–उभारणीला अनुकूल होते; पण संघर्षातली जी कृतिशीलता होती ती कथन, निवेदन, वर्णन ह्याच स्तरांवर मोठ्या प्रमाणात रेंगाळत राहिली. जनसामान्यांचा विरोध आणि त्या विरोधातून तेजाळलेली सावरकरांची व्यक्तिरेखा असे सूत्र नाटककाराला व्यक्त करायचे असावे असे सतत वाटत होते; पण प्रत्यक्षात तसे प्रत्ययाला आलेले नाही कारण अशा संघर्षातून घटना–प्रसंगाच्या पलीकडे जाऊन तो मानसिक संघर्ष प्रखरपणाने उभा राहावा लागतो, या नाटकाच्या संदर्भात तसा तो उभा राहिलेला नाही. शेवटी उरले ते सावरकरांचे शब्द. ते नाटकात इतक्या प्रमाणाने आले की, त्या शब्दांच्या ढिगाऱ्याखाली आणि अर्थातच माऱ्याखाली सावरकरांची व्यक्तिरेखा झाकोळून गेली. बिचारा प्रेक्षक सावरकरांची स्वतःच्या मनातली प्रतिमा जपत, सुन्नपणाने तो शब्दांचा सपकारा सोशीत राहिला. चरित्रात्मक नाटकांच्या संदर्भात नाटककाराला जसा लोकमानसप्रतिमेचा फायदा मोठ्या प्रमाणात मिळतो तसाच तुलनेचा,

अधिक अपेक्षाचा भागही गृहीत धरावा लागतो. सामान्यत: लोकमानसातील प्रतिमेला छेद देण्याचा मराठी नाटककाराचा स्वभाव नाही. छेद देणे याचा अर्थ ती व्यक्तिरेखा विरूप किंवा विकृत करणे असा नाही, तर त्या व्यक्तिरेखेला एक नवे परिमाण देणे, एक नवा अर्थ शोधणे, ती व्यक्तिरेखा खोलवर शोधीत जाणे. चरित्रात्मक नाटक जसजसे वर्तमानाशी येऊन भिडेल तसतसे वास्तवाचे, समीक्षतेचे, हुबेहुबतेचे, कल्पिताचे अनेक प्रश्न परस्पराना छेद देऊन उभे राहतात. त्यातून गुतागुत निर्माण करतात. नाटककाराला अनेक आव्हाने आणि आवाहने निर्माण करतात. गोखले यांनी प्रतिमाछेदनाचे आव्हान स्वीकारले नाही, ते एक आपण समजू शकलो कारण सावरकर–जीवनाशी ते इतके निगडित आहेत की, नाटककाराला अपेक्षित असणारी अलिप्तता त्यांच्याकडे नाही. त्यामुळे उरते ते केवळ प्रसंगदर्शन, सावरकर–जीवनातील प्रसगाची मालिका. एवढी सामग्री सपूर्ण नाटकाचा तोल सांभाळू शकत नाही. परिणामी हाताशी काहीच लागत नाही.

नाटचप्रयोगातून समोर आलेल्या संहितेविषयी इतके विस्ताराने लिहायचे कारण असे की, चरित्रात्मक नाटकाकडे प्रेक्षक आणि कलाकार अद्यापही कलात्म अलिप्ततेने पाहात नाही असे जाणवते एकाच मळलेल्या वाटेने प्रवास घडतो आहे. या नाटचप्रयोगाबाबतही तोच अनुभव आला. दिग्दर्शक म्हणून प्रा. भालबा केळकर याचा दिग्दर्शन-अनुभव दीर्घकाळाचा आहे. नवनवीन संहिता घेऊन 'प्रयोगशील' राहण्याचे आणि आपली मुद्रा त्यावर प्रस्थापित करण्याचे कार्यही त्यानी काही काळ केले आहे; पण त्या दिग्दर्शन–प्रतिभेचा स्पर्श या प्रयोगाच्या दर्शनात जाणवला नाही. संहितेचे संपादन अधिक काटेकोरपणाने व्हायला हवे होते. ही संहिता प्रेक्षकापर्यंत पोहोचवायची म्हटल्यावर त्यासाठी ज्या रंगमचीय गोष्टी प्रभावीपणाने वापरणे अगत्याचे होते, त्या अतिशय ढोबळ आणि क्षीण स्वरूपात वापरल्या गेल्या. वास्तविक पी. डी. ए. च्या चाकोरीबाहेरच्या तीन महत्त्वपूर्ण कलाकाराचे साह्य प्रयोगउभारणीसाठी घेतले गेले होते एक तर नेपथ्यासाठी रघुवीर तळाशीलकर, दुसरे संगीतासाठी सुधीर फडके आणि प्रकाशयोजनेसाठी बाळ मोघे. ह्या तीनही व्यावसायिक मंडळीचे साह्य प्रयोगाच्या गुणवत्तेत अधिक भर टाकील असे वाटत होते; पण तेही घडले नाही. तळाशीलकरांनी स्तरनिविष्ट नेपथ्य तयार केले. असे नेपथ्य प्रथमत: आटोपशीर आणि सोयीचे वाटले. तीन स्तरांवर विशिष्ट स्थलदर्शक घटना–प्रसंग अपेक्षित असतात. त्यासाठी सूचकतेने ती स्थळे प्रस्थापित करावी लागतात. प्रयोगाच्या आरंभी तसे काही केल्याचे जाणवले; परंतु पुढे हालचाली–विरचना यामध्ये इतकी सरमिसळ झाली की, नाटकातील पात्राने सवादाने सूचित करेपर्यंत तिथल्या स्थलाचा पत्ता लागणे अशक्य होऊन बसले. (काही प्रसंगांचा अपवाद वगळता). स्तरनिविष्ट रंगमंचावर स्थलनिश्चिती करण्यासाठी प्रकाशयोजनेचे नेमकेपण मूळच्या प्रसंगाला अधिक उठाव देणारे ठरत असते, तसेही काही घडले नाही. संगीताच्या संदर्भात प्रयोगाच्या अखेरीस सावरकरांची एक काव्यरचना (अवध्य मी, अनंत मी) वापरून जो परिणाम साधण्याचा प्रयत्न केला (त्या वेळी प्रकाशयोजना यथायोग्य होती) तो काहीसा अपवाद वगळता, सुधीर फडके यांच्या सगीताचा परिणाम काहीच जाणवला नाही. ही तिन्ही नावे अकारण खर्ची पडली असे वाटले!

या संपूर्ण प्रयोगात सर्वांत जमेची बाजू जर काही असेल तर अजित सातभाईने सावरकराच्या भूमिकेसाठी केलेल्या प्रयत्नांची! १९३७ च्या सुमारास सावरकर कसे दिसत, बोलत, वागत असतील ते पाहिलेले लोक आजही आहेत. (त्यातले काही प्रयोगाला उपस्थितही होते) ते किंवा त्याच्यासारखे काही लोक त्या वेळची हुबेहुबता वर्णन करू शकतीलही! त्या तपशिलात जाण्यापेक्षा अजितने भूमिकेचा तो भास निर्माण केला किंवा नाही हे महत्त्वाचे आहे. तर तो भास त्याने आपल्या अभिनयगुणाच्या बळावर निश्चितच निर्माण केला. त्यासाठी त्याने अपार श्रम घेतले असावेत हे सतत जाणवत होते. त्याने सावरकराची बोलण्याची स्वीकारलेली पद्धती कदाचित प्रत्यक्षतेला जवळ जाणारी असली तरी नाटचमयतेच्या दृष्टीने एकाच आवर्तात फिरणारी किंवा तोचतोचपणामुळे काही वेळाने कटाळवाणी वाटू लागली. सावरकराची विचारविलसिते किंवा मनोगते यावर त्याने आवाजाची–उच्चारणाची हुकमत ठेवून प्रेक्षकापर्यंत पोहोचवण्याचा यथाशक्ती यत्न केला; पण शेवटी त्या मनोगताना–आत्मनिवेदनाना भाषणाचे स्वरूप आले. त्याचे एकटचाचे बोलणे, अभिनयपद्धती सपूर्ण नाटकाला तारू शकली नाही. त्याच्या साथीला श्रीराम खरे, श्रीपाद आडकर, प्रदीप पानसे, दिलीप वेंगुर्लेकर, दिलीप खरे, अमृता सातभाई, सेवा चौहान, यशवत कुलकर्णी, रवींद्र खरे, मिलिंद शास्त्री, सारंग जोग आणि भालबा केळकर आदी कलाकार होते. ह्या सर्वांनी कधी एक तर कधी त्याहून अधिक छोटचा भूमिका व्यवस्थित केल्या; पण त्या प्रयोगाची उंची वाढवायला त्या अपुऱ्या ठरल्या.

□

## नाटचवार्ता

□ ललितकलादर्शने पेश केलेल्या 'बावनखणी' नाटकाचा शतकमहोत्सवी प्रयोग श्रीमती ज्योत्स्नाबाई भोळे याच्या अध्यक्षतेखाली १ जानेवारीला मुंबई येथे झाला.

□ नाटककार, पत्रकार विद्याधर गोखले यांना नुकतीच साठ वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्ताने त्याचा जाहीर सत्कार खासदार यशवतराव चव्हाण याच्या उपस्थितीत सपन्न झाला या निमित्ताने विद्याधर गोखले याच्या नाटकातील संगीताचा कार्यक्रमही पेश झाला.

□ 'पळा पळा कोण पुढे पळे तो' बबन प्रभूलिखित भेंडे-दिग्दर्शित नाटकाचा शतकमहोत्सवी प्रयोग शतकवीर सुनील गावस्कर याच्या उपस्थितीत मुंबईत सपन्न झाला.

□ 'हॅण्डस् अप' या वसंत कामतलिखित आणि सदाशिव अमरापूरकर – दिग्दर्शित नाटकाचा द्विशतक महोत्सव झाला.

□

# नाट्यपंढरी



## □ मालकांना भेटा

रतीचे जया रूप लावण्य लाभे
कुलस्त्री जसे हास्य ओठांत शोभे
सुधेसारखा नाद स्वर्गीय गाणे
असा बालगंधर्व आता न होणे

ग. दि. माडगूळकर

'नाही आमुच्या नारायणरावांप्रमाणे मी आपल्याला मायबाप. अन्नदाते वगैरे म्हणणार नाही. नारायणरावांच्या लडिवाळ प्रतिभेला ते साजून दिसे. नारायणराव म्हणजे मराठी रंगभूमीवरील एक अपूर्व घटना. फूटलाइटच्या प्रकाशात उगवलेलं इंद्रधनुष्य! सुगंध असलेला स्वर आणि स्वर असलेलं चांदणं !

(नटसम्राट) वि. वा शिरवाडकर
(कुसुमाग्रज)

रसिकहो, दोन कविश्रेष्ठांनी, आपल्या नेटक्या शब्दफुलात साकारलेले हे बालगंधर्वांचे गालिचाचित्र ! यापरती नारायणरावांच्या रूप–गुणांसाठी साजरी अक्षरे कोठून आणायची ? आपल्या देवकोटीतल्या कलावैभवात, मधुमधुरा शब्दसुरात, रसिकांना न्हाऊन काढणारे, बालगंधर्व कलावंत म्हणून जितके थोर, तितकेच माणूस म्हणूनही खूप खूप मोठे होते. ते किर्लोस्कर संगीतमध्ये आल्यापासून, कंपनीचा प्रत्येक खळ चढत्या उत्पन्नाचा होऊ लागला. शकुंतला, सुभद्रा, वसंतसेना, शारदा या साऱ्याच नायिका ते रंगवू लागले. त्यांच्या कामावर प्रेक्षकांच्या उड्या पडत. फार थोड्या अवधीत ते रसिकांचे लाडके झाले. थोरामोठ्यांकडून नि मान्यवर संस्थांकडून त्यांना गाण्यासाठी गळ घातली जाऊ लागली. पुण्यात डेक्कन कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, नूतन मराठी विद्यालय अशा अनेक शिक्षणसंस्थांतून त्यांची खूप गाणी होत. मुंबई, नागपूरमध्ये अशाच बैठकी होत. या बैठकींना जाणत्या रसिकांबरोबरच फुकट्यांचीही खूप गर्दी होई. अशा मैफलींना सर्वांना मुक्तद्वार असे. बालगंधर्वांना पारितोषिके नि बिदागीही चांगली मिळे. परंतु याचा किर्लोस्कर मंडळीच्या नाटकावर परिणाम होईल असे चालकवर्गाला वाटल्याने, कंपनीच्या हिताच्या दृष्टीने, त्यांनी अशा बैठकी करू नयेत म्हणून नारायणरावांना सुचविले. नारायणराव कंपनीचे नोकर होते. लोकप्रियतेची हवा त्यांच्या डोक्यात शिरली नाही नाही तर बालगंधर्वांनी कंपनी सोडली असती तर ? पण चालकांच्या या सांगण्याला क्षणाचाही विलंब न लावता त्यांनी होकार दिला. कुणी मोठी मंडळी मैफलीची अक्षत घेऊन आली, की नारायणराव सांगत, 'मालकांना (नानासाहेब जोगळेकरांना) भेटा. त्यांनी परवानगी दिली तरच मी गाईन. नाही तर नाही !'

## □ मीसुद्धा थर्डक्लासमध्येच बसेन

अण्णासाहेबांपासूनच किर्लोस्करमंडळीचा राजशाही थाट होता. कशाकशात म्हणून कधी कमतरता नसायची; पण पुण्यात 'किर्लोस्कर थिएटर' बांधल्यापासून, कंपनीला खूप कर्ज झाले होते म्हणून थोडीशी काटकसर करण्याची कल्पना मालकांच्या डोक्यात आली. एकदा कंपनी हुबळीहून मिरजेला जायला निघाली. कंपनीचा प्रवास नेहमी सेकंडक्लासने होई. त्या दिवशी जोगळेकर, बालगंधर्व, बोडस इत्यादी प्रमुख नटांची सेकंडक्लासची तिकिटे काढली गेली. बाकी नट नि कामगारांना थर्डक्लासमध्ये बसविण्यात आले. सहाजिकच मंडळी नाराज झाली मिरजेला पोचताच, स्टेशनवरच या कुरबुरीला वाचा फुटली. नेहमी आमची सेकंडक्लासमध्ये सोय असते. या वेळी आम्हाला थर्डमध्ये बसवून आमचा अपमान करण्यात आला आहे. आम्ही काम करणार नाही ! या मसुद्याचा अर्ज मालक जोगळेकरांना द्यायचे घाटत होते. ही गडबड बालगंधर्वांच्या लक्षात आली. ते ताबडतोब त्या मंडळीत मिसळले. तक्रारीचे स्वरूप समजताच म्हणाले, 'मंडळी, तुमचे म्हणणे अगदी रास्त आहे. आपण सर्वांनी नेहमी एकाच वर्गाने प्रवास करायला हवा. या वेळी जरी मी सेकंडक्लासने आलो असलो, तरी तुमच्याइतकेच मला दुःख होत आहे. यापुढे तुम्हा सगळ्यांना सेकंडमध्ये बसविले तरच मी सेकंडक्लासात बसेन; मग झालं ना ?' खुद्द बालगंधर्वांनी पुढाकार घेतल्याने, ते वादळ तिथेच शमले.

लक्षात घ्यायला हवे की, बालगंधर्वही त्या वेळी किर्लोस्करमंडळीचे नोकरच होते; पण त्यांना सगळ्यांचेच मनापासून प्रेम होते. पड्याआडच्या कलावंतांची त्यांना कणव होती. आज 'बॅकस्टेज आर्टिस्टस्'चे जे नि जसे प्रश्न आहेत, ते त्या वेळच्या नाटक मंडळ्यांनाही होते; पण एकत्र कुटुंबाच्या भावनेतून ते सोडविले जात होते. आज नाट्यव्यवसाय अगदीच निराळा झाला आहे.

## □ केवळ मित्रासाठी

बालगंधर्वांना किर्लोस्कर संगीत मंडळीच्या जुन्या माणसांविषयी अत्यंत प्रेम. कारण आपण प्रथम रंगभूमीवर आलो, ते इथेच. याच मातृसंस्थेत. हा एवढाच कृतज्ञतेचा धागा त्यांना पुरेसा होई. गोविंदराव सोरटी हे असेच एक जुने किर्लोस्करचे स्त्रीपार्टी. बालगंधर्वांचे स्नेही. नाट्यव्यवसाय सोडून त्यांनी कुंचला हाती घेतला नि उत्तम चित्रकार झाले. स्वतःची छबी रंगवायची सोडून चित्र रेखाटू लागले त्यांनी काढलेले अण्णासाहेब किर्लोस्करांचे तैलचित्र बालगंधर्वांच्या पहाण्यात आले. ते त्या चित्रावर निहायत खूष झाले. म्हणाले, 'देवा, हे ठेवा आम्हाला !' मग, मोरोबा, बाळकोबा, भाऊराव, आपले गुरू भास्करबुवा बखले अशी एकामागून चित्रे गोविंदरावांकडून काढून घेतली. याचा मोबदला म्हणून सोरटींना बालगंधर्वांकडून पाच हजारांहून अधिक मेहताना मिळाला अर्थात तो सौदा नव्हता, व्यवहार नव्हता, मैत्रीचा मामला होता. गंधर्वांनी आपल्या नेहमीच्या स्वभावानुरूप गोविंदरावांना भरपूर पैसे दिले होते. सोरटींनी ते पैसे हातावेगळे ठेवून, त्या पैशातून पुण्यात एक टुमदार घर बांधले. आपल्या मित्राच्या–बालगंधर्वांच्या–प्रेमाचे प्रतीक म्हणून त्या वास्तूचे नाव ठेवले 'नारायण–आश्रम.'

MANOOS WEEKLY ( Licensed to post without perpayment of postage–No. 11 ) Regd. No. PNCW–28

